सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ वर्ष दुसरे अंक २०३ पाने : ८+४ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## पूर्णा नगर परिषदेचे नवीन मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे रुजू



पूर्णा,प्रतिनिधी/ पूर्णा नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी म्हणून डॉ.उत्कर्ष गुट्टे यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे, त्यांचे कर्मचाऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. पूर्णा नगरपरिषेदेचे यापूर्वीचे मुख्याधिकारी युवराज पौळ यांची जिल्हातील सेलू येथे बदली झाल्यामुळे येथील पद रिक्त झाले होते, या रिक्त पदावर उस्मानाबाद येथे कार्यरत असलेले डॉ.उत्कर्ष गुट्टे यांची पूर्णा नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी म्हणून शासनाने नेमणूक केली असून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार नुकता स्वीकारला आहे. सर्व सामान्य नागरिकांची कामे प्राधान्यांनी केली जातील असे दै.तरुण भारतशी बोलताना त्यांनी सांगितले.

## ममाअर्थ ने मीशो सोबत सहयोग केला

पुणे – ममाअर्थ, भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या वैयक्तिक काळजी ब्रँडने, ममाअर्थ ची दर्जेदार उत्पादने दुर्गम भागात आणण्यासाठी आणि ब्रँडची वाढ नवीन क्षेत्रांमध्ये करण्यासाठी मीशो सह सहयोग केले आहे. टियर ३ शहरे आणि छोटी शहरे ही ई–कॉमर्स वाढीचे मुख्य चालक आहेत. त्यामुळे मीशो च्या विशाल नेटवर्कच्या मदतीने या छोट्या आणि निमशहरी भागात प्रीमियम, नैसर्गिक आणि विषमुक्त वैयक्तिक काळजी उत्पादने पुरवण्याचे ममाअर्थ चे उद्दिष्ट आहे. ममाअर्थ ची रणनीती नवीन बाजारपेठेपर्यंत पोहोचून प्रादेशिक भागात महसूल वाढवणे आहे, जेणेकरून ममाअर्थ सौंदर्य आणि वैयक्तिक काळजी श्रेणीमध्ये विश्वासार्हता आणि उच्च प्रतिष्ठा मिळवू शकेल. मीशो वरील विक्रीदरम्यान या ब्रँडमध्ये पाच पटीने वाढ झाली आहे. आता ममाअर्थ चे पुढील १२ महिन्यांत मीशो वर वार्षिक आवर्ती कमाई रु १०० कोटी साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे.

## पाच मुलांचे स्वप्न झाले साकार

पुणे : क्रिकेट हा भारतात केवळ एक खेळ नसून ती एक भावना, एक आवड आणि लाखो लोकांसाठीचे प्रेरणास्थान आहे. जिथे क्रिकेट ही एकसंध आवड आहे अशा समाजामध्ये वाढताना आपल्यापैकी बरेच जण सामन्यांचे थेट प्रक्षेपण कधीकधी इतरांकडून घेतलेल्या स्क्रीनवर पाहतो किंवा रेडिओवरून समालोचन ऐकतो. आपले आवडते क्रिकेट स्टार्स पाहण्याची किंवा एखाद्या थेट सामन्याचा उत्साह अनुभवण्याची संधी बहुतेकांसाठी एक दूरचे स्वप्न वाटते. परंतु परिक्रमा ह्युमॅनिटी फाऊंडेशनमधील पाच मुलांसाठी हे स्वप्न साकार झाले आहे. त्यांना केवळ त्यांच्या लाडक्या क्रिकेट स्टार्सची झलक बघायला मिळाली असे नव्हे तर भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या खेळाडूंसोबत सराव नेट्समध्ये वेळ घालवण्याची संधी मिळाली.

## अर्बन क्रूझर हायराइडरची 'फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन' सादर

छत्रपती संभाजीनगर – नवकल्पना आणि ग्राहक–केंद्रित दृष्टिकोनाचा वारसा मजबूत करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज अर्बन क्रूझर हायराइडर 'फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन' सादर करण्याची घोषणा केली, ज्यामध्ये खास टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरीज (टीजीए) पॅकेजचा समावेश आहे. अर्बन क्रूझर हायराइडर श्रेणीमधील हे नवीन उत्पादन खास डिझाईन केलेल्या १३ टीजीएसह येते, ज्यामुळे डायनॅमिक आणि प्रीमियम ड्रायव्हिंगचा अनुभव आणखी वाढतो.२०२२ मध्ये लॉन्च झाल्यापासून, अर्बन क्रूझर हायराइडरने अत्याधुनिक तंत्रज्ञान, डायनॅमिक परफॉर्मन्स आणि सर्वोत्तम इंधन कार्यक्षमतेने देशभरातील ग्राहकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. टोयोटाच्या प्रसिद्ध जागतिक एसयूव्ही श्रेणीसह, त्याच्या बोल्ड आणि अत्याधुनिक स्टाइलने ते बी–एसयूव्ही सेगमेंटमधील सर्वाधिक मागणी असलेल्या मॉडेल्सपैकी एक बनले आहे. देशभरातील ग्राहकांची वाढती मागणी पाहता, अर्बन क्रूझर हायराइडर ही परफॉर्मन्स किंवा आरामशी तडजोड न करता अधिक सुरळीत ड्रायव्हिंग पर्याय शोधणाऱ्या ग्राहकांसाठी पसंतीची निवड बनली आहे.

## डेटा-चालित पद्धतीचे अनावरण

पुणे – इंडिया डेव्हलपमेंट फाउंडेशनचे संशोधन संचालक प्राध्यापक शुभशिश गंगोपाध्याय म्हणाले, कायदेशीर ऑनलाइन गेमिंगचे रक्षण करण्यासाठी आणि सट्टेबाजी आणि जुगार प्लॅटफॉर्मच्या प्रसारामुळे होणारे धोके कमी करण्यासाठी कौशल्य आणि संधीचे खेळ यांच्यातील फरक महत्त्वपूर्ण आहे. भारतीय खेळाडूंचे संरक्षण करण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण उद्योगाच्या वाढीस सक्षम करण्यासाठी कौशल्य आणि संधीचे खेळ वेगळे करण्यासाठी एक वस्तुनिष्ठ गेम चाचणी फ्रेमवर्क तयार करणे अत्यंत महत्वाचे आहे. या संदर्भात, आम्ही एक सांख्यिकीय पद्धतीद्वारे या दोन श्रेणींमध्ये फरक करण्यात धोरणकर्त्यांना मदत करण्यासाठी एक व्यापक उद्दीष्ट फ्रेमवर्क विकसित केले आहे इंडिया डेव्हलपमेंट फाउंडेशन (आयडीएफ), एक खाजगी, नफा नसलेली संशोधन संस्था, 'मॉडेलिंग द रोल ऑफ स्किल इन ऑनलाइन गेम्स' वर एक अहवाल प्रकाशित केला आहे जो एक संख्यात्मक चौकट प्रदान करतो .

## 'असंभव' चित्रपटाची घोषणा

छत्रपती संभाजीनगर – मराठी चित्रपटांमध्ये सध्या वैविध्यपूर्ण विषयांबरोबरच कलाकारांच्या बाबतीतही अभिनव प्रयोग अनुभवायला मिळत आहेत. एखादी कलाकारांची जोडी लोकप्रिय झाली की त्यांनाच घेऊन चित्रपट करण्याचा ट्रेण्ड मागे पडला आहे. उलट भिन्न अभिनयशैली असलेल्या कलाकारांना एकत्र घेऊन त्यांच्या आजवरच्या परिचित भूमिकांपेक्षा काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे. असाच एक अभिनयसंपन्न प्रयोग लवकरच प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. मराठीतील नामंवत कलाकार सचित पाटील, मुक्ता बर्वे, सई ताम्हणकर आणि सतीश राजवाडे पहिल्यांदाच एकत्र आले असून त्यांच्या अभिनयाची जुगलबंदी अनुभवण्याची संधी देणाऱ्या 'असंभव' या आगामी चित्रपटाची घोषणा आज दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर झाली आहे. हा चित्रपट पुढच्या वर्षी महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे रोजी प्रदर्शित होणार आहे.

## आयएफएटी इंडिया २०२४

मुंबई – भारताच्या पाणी, सांडपाणी, घनकचरा, आणि पुनर्वापर तंत्रज्ञानासाठी अग्रगण्य व्यासपीठ असलेलेआयएफएटी इंडिया चे ११ वे संस्करण १६ ते १८ ऑक्टोबर २०२४ दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केले जाणार आहे. भारत शाश्वत पाणी आणि कचरा व्यवस्थापनाच्या आव्हानांना सामोरे जात असताना, आयएफएटी इंडिया या क्षेत्रातील नवकल्पना सादर करण्यासाठी, सहकार्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि धोरणात्मक चर्चांना चालना देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे. आयएफएटी इंडिया पर्यावरणीय तंत्रज्ञानातील महत्त्वपूर्ण नवकल्पनांचे सादरीकरण करण्यासाठी एक प्रमुख मंच म्हणून ओळखले जाते. या प्रदर्शनात घनकचरा, पुनर्वापर, पाणी शुद्धीकरण, आणि सांडपाणी व्यवस्थापनातील अत्याधुनिक तंत्रज्ञान सादर केले जाईल. आघाडीच्या कंपन्या, उद्योगतज्ज्ञ, सरकारी प्रतिनिधी, आणि पर्यावरणीय तंत्रज्ञानातील निर्णयकर्ते यांना एकत्र आणून हे व्यासपीठ नव्या व्यवसाय संधी निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची भूमिका बजावते.

## आंतरराष्ट्रीय शिपमेंटसाठी ५0% पर्यंत सूट

मुंबई : डी.एच.एल एक्स्प्रेस ही आंतरराष्ट्रीय एक्स्प्रेस सेवेतील जागतिक आघाडीची कंपनी आहे आणि तिने ग्राहकांना आंतरराष्ट्रीय व स्वदेशी आउटबाऊंड शिपमेंटवर सूट देऊ केल्या आहेत. असे करून ती दिवाळसणी ग्राहकांच्या आनंदात भर घालत आहे. ही ऑफर दिनांक ०२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मर्यादित काळापूर्ती वैध असेल. या ऑफरमुळे ग्राहकांना आंतरराष्ट्रीय शिपमेंटवर ५०% पर्यंत आणि स्वदेशी शिपमेंटवर ४०% पर्यंत सूटचा आनंद उचलता येणार असून जगभरात असलेल्या त्यांच्या प्रियजनांना त्यांना सणासुदीच्या शुभेच्छा आणि भेटवस्तू पाठविता येणार आहेत. ज्या ग्राहकांना इन–स्टोअर ऑफरचा लाभ उचलायचा आहे, त्यांना शिपमेंट बुक करताना फक्त 'दिवाळी५०' प्रोमो कोड वापरावयाचा आहे.

# 'हिंदुत्व टिकले तर संविधान टिकेल' – भाऊ तोरसेकर

## विद्वेष मुक्त महाराष्ट्रासाठी १०० टक्के मतदानाचे आवाहन

पुणे: देशात हिंदुत्व जिवंत ठेवायचे असेल, तर रामायणातल्या खारी प्रमाणे आपली भूमिका निश्चित करा आणि येणाऱ्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत १०० टक्के मतदान घडवून आणा, असे आवाहान ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी आज येथे केले.

केशव माधव प्रतिष्ठान तर्फे आयोजित केलेल्या 'सजग रहो' – विद्वेष मुक्त महाराष्ट्रासाठी आणि देशहितासाठी मतदान ह्या विषयावर एस एन डी टी विद्यापीठातील तारापोर सभागृहात श्री तोरसेकर बोलत होते.

व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास, तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त राजीव बेंद्रे आणि योगेश कुलकर्णी उपस्थित होते. व्याख्यानास मोठ्या संख्येने श्रोतृवर्ग होता.

श्री तोरसेकर म्हणाले: समाजातील एक घटक ठरवून एक–गठ्ठा एका बाजूने मतदान करतो. आपण केवळ असंच म्हणतो पण त्यावर कृती करत नाही. आपण केवळ १०० टक्के मतदान करून उपोयोग नाही, तर ते मतदान योग्य ठिकाणी, योग्य उमेदवार निवडण्याकरीता करावे.

रामायणातील उदाहरण देत ते म्हणाले: सेतू बांधताना खारीने हा विचार नाही केला मी न केल्याने ते काम होणार नाही. त्याच प्रकारे आपण येत्या निवडणुकीत 'खारीचा वाटा' बनून जबाबदारीने काम केले. स्वतःचे मत देऊन काम संपलं असं नाही, तर माझ्या भूमिकेने इतरांना मतदान करायला बाहेर काढणार, घेऊन जाणार,' एवढा तरी आपण करू शकतो. आपलं मत सेक्युर झाल्यावर इतरांना मदत करा. नागरिक म्हणून आपली जबाबदारी



भाऊ तोरसेकर पुढे म्हणाले, हिंदुत्व किंवा हिंदू असणे म्हणजेच सेक्युलारिस्म आहे. जगात कुठल्या इस्लामी राष्ट्रांमध्ये मुस्लिम भारतापेक्षा सुखी आणि सुरक्षित आहे? मुस्लिम भारतात हिंदूमुळेच सुरक्षित आहेत. आणि हिंदुत्व टिकले तर संविधान टिकेल.

सतत होणाऱ्या खोट्या विमर्शच्या बाबतीत भाऊ तोरसेकर म्हणाले की सातत्याने 'संविधान खतरे में है' 'लोकशाही वाचवली पाहिजे' अशा प्रकारची विधाने केली जातात आणि लोकांची दिशाभूल केली जाते. त्यांना वेळीच रोखलं पाहिजे.

कुठलीही संस्कृती, समाज हे अभिमानावर टिकते. कुठलाही राष्ट्र हे अभिमानावर उभं राहतं. तुम्हाला जर कशाचाच अभिमान वाटत नसेल तर तुम्ही डिफेन्ड काय करणार?

हरियाणाच्या ताज्या निवडणुकांवर भाष्य करताना श्री तोरसेकर म्हणाले की विश्लेषक एक्झिट पोलचे योग्य प्रकारे संकलन करण्यात आणि वाचण्यात अयशस्वी ठरले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत त्यांनी वाढलेल्या मतदान पद्धतीचा विचार केला नाही. तीन टक्के वाढ हेच एक सूचक होते. अंदाज आणि निकाल चुकल्यानंतर 'ब्लेम गेम' सुरू झाला. नेहमी प्रमाणे ईव्हीएम वर खापर फोडण्यात आले.

मुस्लिम समाज एक गठ्ठा मतदान विषयी ते म्हणाले: त्यांच्यासाठी त्यांची धार्मिक श्रद्धा महत्त्वाची आहे. ते नेहमी सतर्क असतात. ते एकत्र आहेत. आपण फक्त जिहाद या एका शब्दाचा विचार करतो.

पाकिस्तानचे ब्रिगेडियर एस. के. मलिक यांनी त्यांच्या युद्धाची कुराण संकल्पना या पुस्तकात आधुनिक जिहादचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात – 'एखाद्याला मारणे, जमीन बळकावणे, बॉम्ब फोडायचे इत्यादी जिहाद नसून ती जिहादची साधने आहेत. वास्तविक जिहाद म्हणजे इतर समाजाची इच्छाशक्ती मारून टाकणे. एकदा इच्छा शक्ती नष्ट झाली कि सगळ्या गोष्टी बळकावण्यास मार्ग मोकळा होतो, कारण तुमचं सगळ्या बाजूने खच्चीकरण झालेलं असतं.

## उपजिल्हा रुग्णालयात २९ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

सेलू : जिल्हा परिषदेचे माजी सभापती, बळीराजा संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा जनसेवा मदत केंद्राचे मार्गदर्शक अशोकराव काकडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून येथील उपजिल्हारुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आजोजन करण्यात आले होते. या शिबिरात २९ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. अंडाशय व एक हर्नियाच्या पेशंटसाठी जास्तीच्या सुविधांची गरज असल्याने त्यांना छ. संभाजीनगर येथे रेफर करण्यात आले असून तिथे देखील त्यांच्यावर महात्मा ज्योतिबा फुले योजनेतून मोफत शस्त्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती उपजिल्हारुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जनार्धन गोळेगावकर यांनी दिली.या मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे उदघाटन रविवार १३ ऑक्टोबर रोजी माजी आ. विजयराव भांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. जनार्दन गोळेगावकर, सत्कार मूर्ती अशोक काकडे, डॉ. अरुण रोडगे, डॉ. आलेश बुरेवार, शाफिक अली, दत्तूसिग ठाकूर, बापूसाहेब मोगल, नियाजभाई, गौस लाला,



संतोष ठाकूर,सचिन शिंदे, तौफिक सिद्दिकी, रफिक भाई, बाबा भदर्गे, निर्मल लिपणे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना भांबळे यांनी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले तर आरोग्यासाठी प्राधान्य दिले जाईल असे सांगितले. जनसेवा मदत केंद्राच्या माध्यमातून राष्ट्रवादी पक्ष सतत उपजिल्हारुग्णालयात विविध शिबीर घेऊन गरिबांना मोफत उपचार मिळतील यासाठी कार्य करीत आहे. त्यासाठी या मदत केंद्राचे अध्यक्ष सचिन धापसे व त्यांची सर्व टीम अहोरात्र परिश्रम घेतात असे प्रतिपादन यावेळी अशोकराव काकडे यांनी केले. या शिबिरात छ. संभाजीनगर येथील शल्यचिकित्सक डॉ. अर्जुन पवार, जालनाचे डॉ. श्रीराम वानखेडे, नांदेड डॉ. राजेश आकुलवार, डॉ. आलेश बुरेवार, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. आरती गवई यांनी तर सेलूचे डॉ. अरुण रोडगे यांनी भुलतज्ञ म्हणून जबाबदारी सांभाळली. सूत्रसंचालन व आभार परवेज सौदागर यांनी मानले. जनसेवा मदत सेवा केंद्राचे सर्व सदस्य व राष्ट्रवादीच्या कार्यकत्यांनी यशस्वीतेसाठी पूढाकार घेतला.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

अहिल्यानगर, दि.१४ –जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव हेमा बडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

बैठकीस अशासकीय सदस्य अतुल कुराडे, विलास जगदाळे, शाहूराव औटी, अमित कोहली, दिनेश थोरात, अशोक शेवाळे, रणजित श्रीगोड, उमा म्हेत्रे, बाबासाहेब भालेराव, डॉ.राजेंद्र कळमकर, विलास सोनवणे, सुनिल दळवी, डॉ.गोरख बारहाते व प्रकाश रासकर आदी उपस्थित होते.

ऊर्जा मित्र बैठक पूर्ववत सुरू करणे, अवैध गुटखा विक्री, स्वयंपाक गॅस वितरणातील गैरप्रकार, सेतू कार्यालयातील अवैध सेवाशुल्क, भेसळयुक्त मिठाईची विक्री, एसटी थांबा आदी विषयावर या बैठकीत चर्चा झाली.ग्राहक संरक्षण परिषदेच्या प्रत्येक तालुक्यानिहाय नियुक्त सदस्यांची यादी तहसील कार्यालयाच्या प्रसिद्ध फलकावर लावण्याबाबत सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती बडे यांनी यावेळी दिली.

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–६७० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १४/१०/२०२४

अर्जदार ०:– शेख सलीम रशीद शेख रा. नितीन नगर कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:– नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :–जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ३०–०८–२०१८ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ३०–०८–२०१८ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ३०–०८–२०१८ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७–११–२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ३०–०८–२०१८ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १४/१०/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी–१/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–६५९ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : नवल गोबरू राठोड रा. गारगोटी तांडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :–जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या वडीलच्या मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या वडीलचा मृत्यू दिनांक ३०–०९–२०२२ रोजी ब्राम्हणी ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या वडीलचा मृत्यू दिनांक ३०–०९–२०२२ रोजी ब्राम्हणी ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या वडीलचा मृत्यू दिनांक ३०–०९–२०२२ रोजी ब्राम्हणी येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७–११–२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ३०–०९–२०२२ रोजी ब्राम्हणी येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २७./०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

(Smt.Agrawal Madam Court)

Civil Misc. Application No. ४५२/२०२४

अर्जदार – १. भास्कर कचरू शिरसाठ, रा.प्लॉट नं. २२, फ्लॅट नं. १३, लाभ गार्डन, पैठण रोड, मनपा गार्डन समोर, जालान नगर, औरंगाबाद २. दिनकर कचरू शिरसाठ, ३. भगवान कचरू शिरसाठ, ४. दिलीप कचरू शिरसाठ, रा.घर नं. सी–६९/११, ११ वी योजना, फोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज जवळ, शिवाजी नगर, औरंगाबाद ५. रोहिदास कचरू शिरसाठ, अर्जदार नं. २, ३ आणि ५ रा.अशोक कॉलनी, बुध्द विहार जवळ, लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६. सुमन सुरेश साळवे, रा.राजीव कॉम्पलेक्स जवळ, नागवाडी, पी.एल. लोखंडे मार्ग, चेंबुर, टिळक नगर, मुंबई

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ ते ६ यांची आई नामे यशोदाबाई कचरुजी शिरसाठ यांचा दि.१९/०८/२०२४ रोजी मौजे लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत यशोदाबाई कचरुजी शिरसाठ यांना अर्जदार नं. १ ते ६ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त नयत यशोदाबाई कचरुजी शिरसाठ यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी इेलरू ठशर्सीश्ररींळेप –लीं तखखख १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १४/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कःस्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–५६० उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : फरीदा महेबूब पठाण रा. ब्राम्हणी गराडा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय ब्राम्हणी गराडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :– जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक १९–०८–२००३ रोजी ब्राम्हणी गराडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक १९–०८–२००३ रोजी ब्राम्हणी गराडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक १९–०८–२००३ रोजी ब्राम्हणी गराडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १३–११–२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १९–०८–२००३ रोजी ब्राम्हणी गराडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर ६४३/२०२४ दि : ०१/१०/२०२४,

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– श्री/श्रीमती नारायण अशोक माळे रा. आसेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:–: विरुध्द :–:

गैरअर्जदार :– ग्रामपंचायत कार्यालय आसेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :– जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगा नामे अनिल नारायण माळे यांचा जन्म दिनांक ११/०२/२०१८ रोजी मौजे आसेगांव ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय आसेगांव ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल. आज दिनांक ०१/१०/२०२४ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण : वैजापूर.

दिनांक : ०१/१०/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर ६४२/२०२४ दि : ०१/१०/२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– श्री/श्रीमती अशोक साहेबराव माळे रा. आसेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:–: विरुध्द :–:

गैरअर्जदार :– ग्रामपंचायत कार्यालय आसेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :– जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगी नामे आस्मीता अशोक माळे यांचा जन्म दिनांक ०५/१०/२०१८ रोजी मौजे आसेगांव ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय आसेगांव . गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०१/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :– वैजापूर.

दिनांक :– ०१/१०/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर ६५२/२०२४ दि : ०५/०९/२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– श्री/श्रीमती फरीननाज अतिक शेख रा एस आर टी ६९ मारोती मंदीर जवळ विश्वास नगर जि. छत्रपती संभाजीनगर.

:–: विरुध्द :–:

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :– जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगा नामे शेख अफफान अतीक यांचा जन्म दिनांक १५/०१/२००७ रोजी मौजे लासूरस्टेशन ता. गंगापूर येथे झाला असून मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०५.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण : वैजापूर.

दिनांक : ०५/०९/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू.नोंद/सी.आर ६५३/२०२४ दि : ०५/०९/२०२४,

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– श्री/श्रीमती शेख अलफिया अतिक आजम कॉलनीबडी मस्जीद जवळ हिंगोली हिंगोली

:–: विरुध्द :–:

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर,

विषय :– जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत जन्म २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे मृत्यू नोंद बाबत

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगा नामे शेख अलफिया अतिक यांचा जन्म दिनांक २५/०९/२००५ रोजी मौजे लासूरस्टेशन ता. गंगापूर येथे झाला असून मुख्याधिकारी नगर परिषद गंगापूर ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नाँद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०५.०२.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :– वैजापूर.

दिनांक :– ०५/०९/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०३ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## इस्रायलवर हिजबुल्लाहचा भयंकर हल्ला!

लेबनॉन : लेबनॉनमधील हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेने इस्रायलवर मोठा हल्ला केला आहे. हल्ल्यात इस्रायली लष्कराचे चार सैनिक ठार झाले असून ६० हून अधिक सैनिक गंभीर जखमी झाले आहेत. हिजबुल्लाहने सुसाईड ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हा हल्ला केला आहे, ज्यामुळे इस्रायलच्या उत्तरेकडील सैनिकी तळाला मोठे नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात तणाव वाढत आहे. इस्रायलने हिजबुल्लाच्या नेटवर्कवर पेजर, वॉकीटॉकी आक्रमण करून तोडफोड केली होती. याशिवाय, इस्रायलने हिजबुल्लाच्या एका प्रमुख नेत्याला देखील ठार केले होते.

# महायुती सरकारची शेवटची मंत्रिमंडळ बैठक; घेतले महत्त्वाचे १९ निर्णय!

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व नेतेमंडळींकडून जय्यत तयारी सुरु आहे. अशातच कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू शकते अशा चर्चा सुरु असताना आज सकाळी महायुती सरकारने शेवटची बैठक आयोजित केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील इतर सदस्यांच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले आहे. जाणून घ्या कोणते आहेत ते निर्णय.

मुंबईतल्या ५ प्रवेश मार्गांवरील पथकर (टोल) हलक्या वाहनांसाठी माफ. आज रात्री १२ वाजेपासून अंमलबजावणी.

आगरी समाजासाठी महामंडळ, समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर डव्हान्समेंट स्किम, दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस मान्यता, आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता, वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता, राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित, पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी, खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य, राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) २.० राबविणार, पुणे मेट्रो रेल टप्पा-२ मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता, किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ, अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ, मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची ३ पदे, खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना, मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ अभ्यासगट, 'उमेद'साठी अभ्यासगट, कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव.

## एसटीची दिवाळीतील हंगामी भाडेवाढ रद्द

मुंबई : दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता दरवर्षी एसटी महामंडळाकडून १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्यात येते. मात्र यावर्षी ही १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. दिवाळीनिमित्त एसटी महामंडळाकडून दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला जातो. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान तब्बल एका महिन्यासाठी ही भाडेवाढ लागू करण्यात आली होती. मात्र, प्रवाशांना दिलासा देत एसटी महामंडळाने भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यभरात एसटीने प्रवास करणाऱ्यांना फायदा होणार आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आखतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करत असते. महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ केली जात असते, त्या प्रमाणे या वर्षी देखील निर्णय घेण्यात आला होता. आता तो निर्णय रद्द करण्यात आला आहे.




## प्रकृती बिघडल्याने उद्धव ठाकरे रुग्णालयात दाखल



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१४ ऑक्टोबर : विधानसभा निवडणुकीसाठी येत्या काही दिवसात आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने सर्वच राजकीय पक्षांची धावपळ असताना शिवसेना उध्दव ठाकरे गटाची चिंता वाढवणारी घटना घडली आहे.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची तब्येत बिघडल्याने त्यांना सोमवारी सकाळी रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या विविध तपासण्या करण्यात येत असून त्यांची अंन्जिओप्लास्टी केली जाईल. धमन्यांमधील ब्लॉकेज तपासण्यासाठी त्यांच्या चाचण्या केल्या जात असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे काही दिवस त्यांना सक्तीची विश्रांती घ्यावी लागण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांनी दसरा या दिवशी शिवाजी पार्कवर दमदार भाषण करून विधानसभा निवडणुकीचे रणसिंग फुंकले होते .त्यानंतर रविवारी महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सह हॉटेल ताजदंड येथे पत्रकार परिषद घेत महायुतीच्या भ्रष्ट कारभाराबाबत पत्रिका प्रसिद्ध केली होती.

# आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते आज कंधार तालुक्यातील

## १८५ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण

कंधार - आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्याहस्ते मंगळवारी १८५ कोटी रूपायांच्या विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण करण्यात येणार आहे. यात शहरातील शंभर कॉटच्या उपजिल्हा रुग्णालयाचा समावेश असून सामाजिक कार्यकर्त्या आशाताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात सकाळी साडे अकरा वाजता लोकार्पण सोहळा होणार आहे.

शहरातील उपजिल्हा रुग्णालयासाठी आमदार शिंदे यांनी शासन दरबारी सत्याने पाठपुरावा करून ६६ कोटीचा निधी उपलब्ध करून घेतला. या निधीतून लोहा रोडवर अद्यावत असे रुग्णालयाचे काम झाले आहे. या रुग्णालयामुळे कंधारच्या वैद्यकीय क्षेत्रात क्रांती होणार असून रुग्णांची गैरसोय थांबणार आहे. पानभोसी ते पांगरा ते खुड्याचीवाडी ते लाठ (खु.) पर्यंत रस्ता ११ कोटी, कंधार सार्वजनिक बाधंकाम विभागातील कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाचे बांधकाम २.८० कोटी, वंजारवाडी गावात पुल बांधकाम १.०२ कोटी, घोडज ते कंधार रस्ता, बहादरपुरा ते पानभोसी रस्ता १५ कोटी, बहाद्दरपुरा गावाजवळील मन्याड नदीवरील पुलाचे पोचमार्ग ६ कोटी, कंधार येथील जाधव हॉस्पीटल ते बहाद्दरपुरा गावापर्यंत सी.सी. रस्ता २५ कोटी,

बसवेश्वर महाराज पुतळा ते पांगरा रस्ता बांधकाम १० कोटी, पानशेवडी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम ११.५० कोटी, बहाद्दरपुरा गावातील टॉवर पासुन डॉ. धोंडगे यांच्या घरापर्यंत रस्ता २ कोटी, कंधार येथे शासकीय गोदामाचे बांधकाम ५.७५ कोटी असे एकूण १८५ कोटीच्या विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा आमदार शिंदे यांच्याहस्ते होणार आहे. या कार्यक्रमास मोठ्यासंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांनी केले आहे.





72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | pine labs PAY LATER | HDFC BANK INSTANT CASHBACK UP TO ₹ 5 000 ON CREDIT CARDS*

*नियम आणि अटी लागू. *ऑफर फक्त निवडक मॉडेल्सवर. ऑफर 15 नोव्हेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. ₹10, 000 पर्यंत *बचतीमध्ये मॉडेलवर आधारित ₹5000* कॅशबॅक आणि ₹5000* एचडीएफसी कार्ड कॅशबॅकचा समावेश. एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरविजन अंतर्गत नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून इतर स्थानावर साहसी कृती केली आहे. ह्या साहसाचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे नियम आणि सुरक्षिततेचे नियम पाळा. विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात एएमसी उपलब्ध. अधिक माहिती बजाज डीलरकडून मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षाने दिली आहे आणि त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. कॅशबॅक ऑफर 15 ऑक्टोबर 2024 पर्यंत फक्त पाइन लॅब्स मशिन्सद्वारे एचडीएफसी क्रेडिट कार्डांच्या ईएमआय व्यवहारांवर उपलब्ध आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 9527771795**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kallamb** 8329268718, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Ottur** 8007000790, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959, **Rahata** 9881239140.

## अग्रलेख...

# सामर्थ्यशाली राष्ट्राची आराधना आवश्यक

'धर्म व संस्कृती आणि सनातन मूल्यांच्या रक्षणासाठी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी हिंदूंची एकजुटता अतिशय आवश्यक असून, आताच जर एक झालो नाही तर हिंदू समाज दुर्बल होऊन भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. सद्भाव आणि सहिष्णुतेचे रक्षण बलसंपन्न समाजच करू शकतो. दुर्बलता घातक असून, जग दुर्बल लोकांना महत्त्व देत नाही तर सामर्थ्यशाली, शक्तिसंपन्न लोकांचीच सर्वत्र पूजा होते' हा सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी विजयादशमीच्या पर्वावर दिलेला संदेश समस्त हिंदू समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि हिंदूंना आत्मचिंतन करण्यास व अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करणारा आहे. हिंदू समाजाला व भारताला दुर्बल करणाऱ्या शक्तींचे अंतःस्थ हेतू ओळखून या देशद्रोही शक्तींचा पाडाव करण्यासाठी राष्ट्रभक्त नागरिकांनी सक्रिय होण्याच्या आवश्यकतेवरही सरसंघचालकांनी आपल्या भाषणात भर दिला. हिंदू समाजाला आपले स्वत्व, स्वाभिमान, शौर्य, पराक्रम, उदात्त संस्कृती, शाश्वत मूल्ये, भव्य-दिव्य परंपरा, इतिहास, विजयी वारसा यांचा विसर पडला आणि त्यामुळेच आज विविध प्रकारची सांस्कृतिक व वैचारिक आक्रमणे हिंदूंवर होत असून, समाजाला दुर्बल करीत आहेत, याविषयी सरसंघचालकांनी आम्हा सर्वांनाच सजग, सावध केले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, ज्या देशाला किंवा ज्या देशातील नागरिकांना आपल्या उज्ज्वल इतिहासाचा आणि भूगोलाचा विसर पडतो तेव्हा ते राष्ट्र एकतर दुर्बल होते किंवा विभाजित होते किंवा त्या राष्ट्राचा विनाश तरी होतो. आज अफगाणिस्तान, पाकिस्तान व वर्तमानातील बांगलादेशातील परिस्थितीतून ही बाब सिद्ध झाली आहे. जेव्हा जेव्हा हिंदू हिंदुत्व विसरला तेव्हा तेव्हा या राष्ट्राचे विभाजन झाले आहे. बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदूंवर सध्या अस्तित्वाचेच भयंकर संकट कोसळले आहे. मात्र, तेथील हिंदूंनी काळाची पावले ओळखून एकत्रित होऊन शक्तीचा हुंकार केला आणि त्यामुळेच हिंदू समाजाचे काही प्रमाणात रक्षण झाले. बांगलादेशातील या घटनांचा यथार्थ बोध भारतातील हिंदूंनी घेतला पाहिजे. याचे कारण असे की, विजयादशमी हा पराक्रम, शौर्य, विजिगीषुवृत्तीची आठवण करून देणारा सण आहे. त्यामुळे समस्त हिंदू समाजाने गतवैभव प्राप्त करण्यासाठी व भारतमातेला पुन्हा तिचे गौरवाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी तन-मन-धनपूर्वक राष्ट्र आराधना केली पाहिजे. सामाजिक समरसता, पर्यावरण, नागरी कर्तव्य, कुटुंब प्रबोधन आणि स्वआधारित व्यवस्था या पंचसूत्रांच्या आधारावर पुढील वाटचाल करण्याचे सरसंघचालकांनी केलेले आवाहन अतिशय महत्त्वाचे आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाला बळकटी प्राप्त करून देणारे आहे. केवळ समानतेच्या नाही तर आत्मीयतेच्या पायावर व्यक्ती आणि राष्ट्राचा विचार भारतीय संस्कृतीत केला जातो. भारताच्या राष्ट्रवादाचा उदय स्वार्थासाठी नाही, त्याचा आधार परस्पर संघर्ष नाही तर समन्वय आणि परस्पर अनुकूलता हा आहे. सामूहिक जीवनाची समान अनुभूती सर्व भारतीयांच्या अंतःकरणात निर्माण व्हावी, ही राष्ट्र म्हणून आम्हा सर्वांचीच इच्छा आहे. राष्ट्र जीवनाच्या आधारे मनुष्यात उदात्त तत्त्वे विकसित होऊ शकतात. मानवी जीवनातील श्रेष्ठ गुणांची आराधना भारतीयत्वाची विशेषता आहे. या पृष्ठभूमीवर सरसंघचालकांनी प्रतिपादिलेल्या पंचसूत्रांकडे पाहिले पाहिजे. कोणतेही राष्ट्र बळकट व्हायचे असेल तर समाजातील भेदभाव संपुष्टात यायला हवेत व सर्वांमध्ये ऐक्याची भावना वृद्धिंगत होण्याची आवश्यकता आहे. यासाठीच सामाजिक समरसतेची आवश्यकता आहे. आज पाश्चात्त्यांच्या भोगवादी व चंगळवादी संस्कृतीचा भारतीय जनमानसावर एवढा पगडा आहे की, देशवासीयांना भारताची उदात्त संस्कृती व चिरंतन जीवनमूल्यांचा विसर पडला आहे. त्यामुळेच भारतीयांनी सरसंघचालकांनी सांगितलेल्या पंचसूत्रांचा प्रामाणिकपणे अवलंब केला तर हे राष्ट्र पुन्हा विश्वात अजिंक्य बनू शकते. पाश्चात्त्यांच्या 'युज ॲण्ड थ्रो' आणि जडवादी विचारसरणीमुळे जागतिक स्तरावरच पर्यावरणाचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसामग्रीचा अंदाधुंद वापर केल्यामुळे भारतासमोरही पर्यावरण संरक्षणाचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. तसेच नागरिकांना आपल्या कर्तव्यबुद्धीचा विसर पडल्यामुळे अनेक सामाजिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. राज्यघटनेने आपल्याला जसे मूलभूत अधिकार दिले आहेत तसेच कर्तव्य पालनही सांगितले आहे. मात्र, आम्हा भारतीयांच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे आम्हाला देश व समाजविषयक कर्तव्याचा विसर पडला आणि अधिकार तेवढे लक्षात राहिले. टोकाची व्यक्तिवादी विचारसरणी, 'मी' आणि 'माझे' या पाश्चात्त्य मूल्यांना भारतीयांनी आपल्या जीवनात स्थान दिल्यामुळे संकुचित व आत्मकेंद्रित वृत्ती, कमालीचा स्वार्थ घराघरात, कुटुंबात वाढला. आधुनिक जीवनशैलीमुळे भारतीयांची परंपरागत कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त झाली. स्थैर्य, समाधान, समन्वय, सहकार्य, त्याग या मूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्थेला हादरे बसल्याने पुन्हा नव्याने कुटुंब प्रबोधन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. संस्कार निर्माण करणारी, चारित्र्य घडविणारी, नीतिमूल्यांचे संवर्धन करणारी, शाश्वत जीवनमूल्यांवर आधारित कुटुंब व्यवस्था नव्याने निर्माण करणे हे हिंदू समाजापुढचे मोठेच आव्हान आहे. यासाठी कुटुंब प्रबोधन ही काळाची गरज आहे. भारतीयांना अर्थात हिंदूंना 'स्व'चा विसर पडल्याने प्रत्येक क्षेत्रात परकीयांचे अनुकरण करण्याची वृत्ती बळावली. मग ती राज्यव्यवस्था असो किंवा अर्थव्यवस्था, स्वदेशी अथवा कायदे असो की उद्योग व कृषी क्षेत्र असो. प्रत्येक वेळी परकीयांचे अनुकरण करण्याची वृत्ती अतिशय घातक आणि आणि या देशाच्या अस्तित्वालाच नख लावणारी आहे. त्यामुळे भारताने आपल्या शाश्वत विचारांच्या, अस्सल भारतीय जीवनमूल्यांवर आधारित व्यवस्था विकसित केली पाहिजे आणि त्याचाच अवलंब केला पाहिजे. स्वदेशी निर्मित वस्तू, उत्पादने खरेदी करण्यावर अधिकाधिक भर दिला पाहिजे. त्यामुळे देशातील संपत्ती देशातच राहून कोट्यवधी लोकांना रोजगार मिळू शकेल. त्यामुळे स्वदेशी आधारित अर्थव्यवस्था भारताला अधिकाधिक बळकटी देणारी ठरू शकते. आज इस्रायल, जपान, चीन, रशिया, जर्मनी या देशांनी प्रखर राष्ट्रवाद आणि देशभक्तीच्या जोरावर 'स्व' आधारित व्यवस्था निर्माण केली. प्रत्येक क्षेत्रातील मग ती भाषा असो अथवा तंत्रज्ञान, अथवा उच्च शिक्षण सर्वच क्षेत्रातील पाश्चिमात्यांचा प्रभाव त्यांनी झुगारून लावला आणि आज ते देश नवनवीन आव्हाने स्वीकारत विकासाच्या वाटेवर अग्रेसर आहेत. प्रखर राष्ट्रवाद आणि स्वाभिमान आणि ज्वलंत देशभक्ती या गुणांच्या बळावर चिमुकले इस्रायल-हमाससह सर्वच क्रूर जिहादी दहशतवादी संघटनांशी आणि आक्रमक इस्लामी देशांशी जबरदस्त झुंज देत आहे. एक इंच भूमीदेखील शत्रूच्या घशात जाऊ देणार नाही, असा इस्रायलचा ठाम निर्धार आहे. आज आम्हा हिंदूंना इस्रायलकडून प्रेरणा घेण्याची नितांत आवश्यकता आहे. भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मिरात आणि ईशान्य भारतात तसेच देवभूमी केरळमध्ये असंख्य जिहादी विषारी नाग घुसले आहेत. त्यांचा तातडीने कायमचा बंदोबस्त होणे अत्यंत अत्यावश्यक आहे. संपूर्ण देशातील नागरिक या दृष्टीने सावध व सजग राहिले पाहिजेत. आमच्या देशात लव्ह जिहाद बरोबरच लॅण्ड जिहाद आणि व्होट जिहादची नवनवीन प्रकरणे समोर येत आहेत. त्या विरुद्ध हिंदू समाजाने एकत्रित येऊन कृतिशील होण्याची आज नितांत आवश्यकता आहे. जर पुन्हा भारताला सामर्थ्यशाली करायचे असेल तर समस्त हिंदूंनी एकत्र येऊन, सर्व इच्छाशक्ती एकवटून राष्ट्र उभारणीच्या कार्यात संपूर्ण योगदान दिले पाहिजे. सरसंघचालकांच्या विजयादशमीच्या संदेशाचा हाच अन्वयार्थ आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मालदीव पुन्हा भारताकडे!



'कधी गरम, कधी नरम' अशी भूमिका घेणारे मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुईझ्झू आता नरम झाले आहेत. नवी दिल्लीला दिलेल्या विशेष भेटीत मुईझ्झू यांनी भारत-मालदीव मैत्रीच्या आणाभाका घेतल्या. ही बाब भारतासाठी सुखद असली, तरी मालदीवचे घुमजाव काही शंका निर्माण करणारे आहे. मालदीवच्या राष्ट्रीय निवडणुकीत मुईझ्झू यांच्या पक्षाने 'भारत विरोध' हा मुख्य मुद्दा केला होता. मालदीवमध्ये तैनात भारतीय वायुदलाच्या दोन तुकड्यांना देशाबाहेर काढणे हा मुद्दा केला होता. केवळ निवडणुकीत हा मुद्दा करून ते थांबले नव्हते तर निवडून आल्यावर त्यांनी भारताला आपल्या वायुदलाच्या या दोन तुकड्या माघारी बोलाविण्यास जवळपास बाध्य केले होते आणि आता काही महिन्यांच्या आत त्याच नेत्याने नवी दिल्लीत येऊन भारताशी मैत्रीच्या आणाभाका घ्याव्यात, हे आश्चर्यच होते; जे घडले.

**चीनचा पाठिंबा :** मालदीव हा कधीकाळचा भारताचा मित्र. भारताने मालदीवसाठी खूप काही केले आहे. असा हा मालदीव अचानक चीनच्या गोटात गेला. मालदीवमध्ये चिनी मदतीचा ओघ सुरू झाला. रस्ते बांधण्यापासून वसाहती बांधण्यापर्यंत, रुग्णालये, ॲम्बुलन्स या साऱ्या बाबी चीनकडून मालदीवला मिळू लागल्या आणि मालदीवचे नेते भारताविरोधात डरकाळ्या फोडू लागले.

**अचानक जादू :** मालदीव व चीनचा मधुचंद्र सुरू असताना अचानक असे काय घडले की, मालदीवला भारताची आठवण झाली, हे मात्र समोर आलेले नाही. चीन या देशावरचा ताबा एवढ्या सहजासहजी सोडणार नाही, हे स्पष्ट आहे. कारण मालदीवचे स्थान लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे. भारताला चारही बाजूने वेढण्याची जी व्यूहरचना चीन मागील काही वर्षांपासून राबवित आहे, त्याचाच एक भाग म्हणून चीनने मालदीववर एक प्रकारचा ताबा मिळविला आहे. आता मालदीवचे घुमजाव त्याच्या कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेपोटी असावे काय, असा एक प्रश्न विचारला जात आहे. मालदीवची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे आणि यात भारतीय पर्यटक हा सर्वात मोठा घटक आहे. भारत-मालदीव संबंध ताणले गेल्यानंतर भारतीय पर्यटकांनी मालदीवचा रस्ता बंद केला आणि याचा सरळ परिणाम मालदीवच्या अर्थव्यवस्थेवर झाला. चीनने याची भरपाई करण्याचा प्रयत्न केला. पण, चीनची स्वतःचीच स्थिती कमजोर असल्याने तो किती काळ मालदीवला मदत करू शकणार होता. चीनने आपले हात आखुडते घेतले आणि मग मालदीवला मदतीसाठी भारतासमोर हात पसरण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता.

**आर्थिक मदत :** भारताने मालदीवला काही आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार या देशाला काही कोटी रुपये दिले जाणार आहेत. या मदतीसाठी राष्ट्रपती मुईझ्झू यांनी भारताचे आभार मानले आहेत. आपण कधीही भारताच्या विरोधात नव्हतो, असे स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. मालदीवच्या भूमीवर कोणतेही विदेशी सैनिक असता कामा नये, ही मालदीवच्या नागरिकांची भूमिका आहे. आपण फक्त त्या भूमिकेचे पालन केले, असेही त्यांनी म्हटले आहे. 'मालदीव फर्स्ट' ही आमची भूमिका आहे. त्यानुसार आम्ही काही निर्णय घेतले. त्यात भारताचा विरोध नव्हता. भारतीय पर्यटकांनी पुन्हा एकदा मालदीवचा रस्ता धरावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. राष्ट्रपती मुईझ्झू यांची सारी भूमिका सारवासारव करणारी आहे. मात्र, ती प्रामाणिक असेल तर झाले गेले विसरून भारताने मालदीवशी मैत्री ठेवली पाहिजे. पण, यातही चीनची चालाखी असेल तर? कारण चीन चालाखी आणि फसवाफसवीसाठीच प्रसिद्ध आहे.

**लष्करप्रमुखांचे अभिनंदन :** देशाचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी भारत-चीन सीमेवरील स्थितीचे फार नेमक्या शब्दात विश्लेषण केले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. भारत-चीन पूर्व लडाख सीमेवरील स्थिती शांत असली, तरी 'सामान्य नाही' असे त्यांनी म्हटले आहे. सोबतच त्यांनी तीन बाबी स्पष्ट केल्या आहेत. या साऱ्या बाबी जून २०२० मध्ये भारत-चीन सैन्यात झालेल्या चकमकीच्या संदर्भात आहेत. सैन्य माघारीची प्रक्रिया, बफर झोन आणि टेहळणी व्यवस्था या त्या तीन बाबी आहेत.

**तीन महत्त्वाचे मुद्दे :** जनरल द्विवेदी यांनी फार नेमकेपणे हे तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. पहिला मुद्दा म्हणजे सैन्य माघारीचा. चीनने भारताच्या ज्या भागावर अनधिकृत कब्जा केला होता तो त्याने पूर्णपणे रिकामा केलेला नाही. हीच बाब परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केली होती. सैन्य माघारीची प्रक्रिया ७५ टक्के पूर्ण झाली आहे, असे त्यांनी म्हटले होते. याचा अर्थ चीनने २०२० मध्ये बळकावलेल्या भारतीय भूभागापैकी २५ टक्के भाग अद्याप सोडलेला नाही. या भागात चीनने बांधलेल्या हवाई पट्ट्यांची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. चीनने उभारलेल्या पायाभूत सोयींची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. लष्करप्रमुखांनी आपल्या प्रतिपादनात किती टक्के वगैरे असा काही हिशेब मांडला नसला, तरी सीमेवरील स्थिती सामान्य नसल्याचे म्हटले आहे. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. दुसरा भाग म्हणजे बफर झोनचा. दोन्ही देशाच्या सीमेवर काही भाग बफर झोन म्हणून चिन्हांकित केला जातो. याबाबतही स्थिती सामान्य नसल्याचे लष्करप्रमुखांनी म्हटले आहे. याचा अर्थ म्हणजे चीनने बफर झोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही भागावर घुसखोरी केली आहे आणि हा पेचप्रसंग अद्याप सुटलेला नाही. तिसरा मुद्दा टेहळणीचा. जून २०२० पूर्वी भारताच्या लष्करी पथकांना ज्या भागापर्यंत टेहळणीसाठी जाता येत होते तेथे त्यांना आता जाता येत नाही. ९, १०, ११, १२, १२ ए, १३, १४, १५, १७ आणि १७ ए या त्यातील काही प्रमुख टेहळणी चौक्या आहेत. जून २०२० नंतर ६५ पैकी २६ टेहळणी चौक्यांवर भारताची टेहळणी बंद झाली असल्याची माहिती लेहच्या पोलिस प्रमुख नित्या यांनी आपल्या अहवालात दिली होती. ही सारी माहिती अधिकृतच मानली जाते.

**२१ फेऱ्यानंतर... :** लष्करप्रमुख जनरल द्विवेदी यांचे हे विधान भारत-चीन लष्करी अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेच्या २१ फेऱ्यानंतरचे आहे, हे विशेष. मागील काही महिन्यांपासून तर ही चर्चा थांबली आहे. चीन याबाबत काही बोलण्यास तयार नाही, असे त्याच्या भूमिकेवरून दिसते.

**'जमिनी हकीकत' :** जनरल द्विवेदी यांनी स्पष्ट केलेला आणखी एक मुद्दा म्हणजे राजनैतिक नेतृत्व सीमेवरील स्थितीत सामान्य होत असल्याचे सांगत आहे. चीनकडून सकारात्मक संकेत मिळत असल्याचे सांगत आहे. ही चांगली बाब आहे. पण, या साऱ्याचा कस लागतो लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत. कारण तेव्हा जमिनीवर काय करावयाचे याचा विचार आणि निर्णय होत असतो. जोपर्यंत चीन एप्रिल-जून २०२० ची स्थिती बहाल करीत नाही, तोपर्यंत सीमेवरील स्थिती सामान्य झाली आहे, असे म्हणता येणार नाही आणि जोपर्यंत स्थिती सामान्य होत नाही आम्हाला जराही बेसावध होऊन वा ढिलाई देऊन चालणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

**१९ फेब्रुवारीनंतर :** जून २०२० मध्ये लडाख भागात भारत-चीनच्या लष्करी तुकड्यांमध्ये झालेल्या चकमकीचा सर्वात मोठा बळी म्हणजे विश्वासार्हता हा आहे, हे जनरल द्विवेदी यांचे विधान बरेच काही सांगणारे आहे. भारत-चीन सीमेवरील चुसूल मोल्डो चौकीवर भारत-चीन यांच्यात या समस्येवर २७० हून अधिक तास चर्चा झाली आहे. त्यात काही प्रगती झाली आहे; मात्र ती पुरेशी नाही. चर्चेची शेवटची फेरी १९ फेब्रुवारी रोजी झाली होती. म्हणजे मागील आठ महिन्यात चीनने याबाबत कोणतीही सकारात्मक हालचाल केलेली नाही.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# मंदिरांवरचे नियंत्रण

संपूर्ण भारतातील हिंदूंच्या सर्व मंदिरांवर सरकारचे नियंत्रण आहे. या मंदिरांच्या दानपेटीतील पैसे, देणगीद्वारे येणारे पैसे, वस्तुरूपातील, विशेषतः सोने-चांदी स्वरूपातील दान या साऱ्यांवरच तेथील राज्य सरकारांचे नियंत्रण असते. त्याची नोंद आणि त्यातून मंदिरासाठी करावयाच्या खर्चावरही नियंत्रण समितीचे लक्ष असते. केरळसारख्या राज्यात बहुधा ख्रिश्चन किंवा मुसलमानांचे प्राबल्य असलेले उजव्या विचारसरणीचे सरकार असते. त्यामुळे मंदिरांवरही स्वाभाविकच त्यांचे लक्ष असते. मंदिरातील पैसा तर घेऊन जायचा, पण तेथील आवश्यक खर्चासाठीही पैसा द्यायचा नाही, अशी केरळ सरकारची सर्वसाधारण कार्यपद्धती आहे. केरळच नव्हे तर अनेक तथाकथित सर्वधर्मसमभाववाल्या राज्यांमध्ये मंदिरांवर असाच अन्याय केला जातो. त्यामुळे काही ठिकाणचे व्यवस्थापनही गैरव्यवहारांच्या गुंत्यात गुरफटले असते. मध्यंतरी केरळमधील एका मोठ्या हिंदू मंदिराच्या दानपेटीवर बहिष्कार टाकण्याचे एक आंदोलनच तेथील भक्तांनी केले. त्यामुळे उत्पन्नावर आणि पर्यायाने सरकारवरही परिणाम झाला. निदान आमचा पैसा तरी आम्हाला योग्य कारणासाठी द्या, अशी मागणी करून हा बहिष्कार होता. पैसा आला नाही तरी मंदिराचे नियमित व्यवस्थापन करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर असते. मंदिरातून पैसा येणे बंद झाल्यामुळे केरळ सरकारही हादरले आणि वठणीवरही आले. हिंदूंनी आपण 'कोणत्या जातीचे आहोत यापेक्षा हिंदूच आहोत,' ही खूणगाठ मनात बांधल्यास अनेक गोष्टी बदलतात.

जसे हिंदू मंदिरांवर सरकारी नियंत्रण असते तसे मशिदी किंवा गिरजाघरांवर नसते. उलट मंदिरांमधून येणारा अतिरिक्त पैसा मशिदींसाठी खर्च करण्याची त्या अधिनियमांतच मोकळीक असते. ख्रिश्चन पाद्री किंवा मुसलमान मौलवी यांना तर दरमहा वेतन देण्याचीही तरतूद काही 'धर्मनिरपेक्ष' सरकारे करत असतात. त्यांना वेतन देण्यास हरकत नाही, पण हिंदू पुजाऱ्यांची दखलही घेत नाहीत, इतके ते 'धर्मनिरपेक्ष' असतात. इतकेच नव्हे, तर मंदिरांना ज्या दरात वीज मिळते त्यापेक्षा अर्धाही दर मशिदी आणि गिरजाघरांसाठी नसतो. एका राज्यात नागरिक व मंदिरांसाठी ७.८५ रुपये आणि मंदिर व गिरजाघरांसाठी फक्त १.८५ रुपये इतका भयंकर फरक आहे. काय करणार, घटनेनेच तर सांगितले आहे धर्मनिरप□□क्षतेबद्दल आणि तेही फक्त हिंदू धर्म वगळून...! भारतातील १८ राज्यांमध्ये हिंदूंच्या मंदिरांवर राज्य सरकारचे नियंत्रण असल्याची माहिती आहे. त्यात सुमारे ४ लाख मंदिर, मठ यांचा समावेश असून त्यातून १ लाख कोटी रुपये या सरकारांना मिळतात. पूर्वी काही हिंदू मंदिरांच्या हिंदू व्यवस्थापनांनी आपल्या पैशांचा गैरवापर केला, असे घडले आहे. कदाचित त्यामुळेच हिंदू मंदिरांवर सरकारी नियंत्रण आणण्यात आले असावे. पण असेच गैरप्रकार किंवा भ्रष्टाचार होऊनही, केवळ राजकीय कारणांसाठी मुसलमानांच्या मशिदी आणि ख्रिश्चनांचे चर्च मात्र सरकारी नियंत्रणमुक्त आहेत. उलट हिंदू मंदिरांच्या उत्पन्नातून मशिदी आणि मौलवींना दरमहा पैसे देण्याचा उद्योग काही राज्य सरकारे करीत आहेत. काही मंदिर समित्या जसे आर्थिक घोळ करायच्या त्याचप्रमाणे आता हिंदू मंदिरांवरील सरकारी समित्याही करतात, असे आढळून आले आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तुळजापूरच्या भवानी मंदिरात सरकारी समितीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीच सुमारे १० कोटी रुपयांचा दानपेटी घोटाळा केला आहे. या घोटाळ्याची चौकशी बंद करण्याचा निर्णयही काँग्रेसी सरकारने घेऊन टाकला. पण ही चौकशी गुंडाळून ठेवण्याच्या सरकारी निर्णयाला हिंदू जनजागृती समितीने उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले. ही याचिका स्वीकारून उच्च न्यायालयाने सरकारचा चौकशी बंद करण्याचा निर्णय रद्द ठरविला आहे. मंदिरांकडून पैसा घ्यायचा, पण मंदिरांना तो देण्यास टाळाटाळ करायची प्रशासनाची भूमिका अनेकदा दिसून येते. सप्टेंबर २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगरात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तुळजापूरच्या भवानी मंदिराला १३२८ कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. पण सप्टेंबर २०२४ पर्यंत यापैकी १ रुपयाही तुळजाभवानी मंदिर विकासासाठी मिळालेला नाही. या कामांसाठी एक विकास आराखडा तयार करायचा असून तो मंजूर न झाल्यामुळे निधी मिळाला नसल्याची माहिती आहे. विकास आराखडा तयार करणे, मंजूर करणे ही कोणाची जबाबदारी आहे व कोण 'शुक्राचार्य' आहे, हे तपासून पाहण्याची आता गरज आहे. त्याचवेळी पैठणच्या ज्ञानेश्वर उद्यानासाठी १५० कोटी, वेरूळच्या घृष्णेश्वर मंदिरासाठी १५६ कोटी, परळीच्या वैजनाथ मंदिरासाठी २५६ कोटी, औंढा नागनाथ मंदिरासाठी ६०.३५ कोटी, सिल्लोडच्या मुर्डेश्वर मंदिरासाठी ४५ कोटी रुपयेसुद्धा घोषित करण्यात आले होते. हे सारे पैसे या मंदिरांच्या परिसर विकासासाठी आहेत. यातील काही कामांना हात लागला असून हळूहळू का होईना पैसे येत आहेत. पण यात सर्वात महत्त्वाच्या आणि मोठ्या तुळजाभवानी मंदिराला मात्र दुसऱ्या वर्षीचे नवरात्र उलटून गेल्यानंतरही एक पैसाही मिळू न शकणे म्हणजे हिंदूंच्या भावनांना ठेचच आहे, हे मात्र खरे.

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# हरयाणाच्या विजय मंत्राचा बोध

सर्व प्रकारच्या एक्झिट पोलचे निकाल चुकीचे ठरवून तसेच तमाम विरोधी पक्ष, चुकीचे नॅरेटिव्ह (कथानक) समाजामध्ये पसरविणारे लोक व शेतकरी नाराज आहेत, अशी बोंब उठविणारे लोक या सर्वांच्या नाकावर टिच्चून भारतीय जनता पार्टीने हरयाणामध्ये तिसऱ्यांदा आपले सरकार बनविले आहे. जनतेने त्यांना पुन्हा एकदा चांगले काम करण्याची संधी दिलेली आहे. भाजपाच्या नेतृत्वामध्ये हरयाणा हा दिल्लीचा आधारस्तंभ बनेल आणि जे खलिस्तानवादी विनाकारण शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने दिल्लीचे रस्ते अवरुद्ध करतात, त्यांनाही खीळ बसविण्यात हरयाणा आणि भाजपा यशस्वी होतील, असा विश्वास आहे. भाजपाने हरयाणासारख्या लहान परंतु महत्त्वाच्या राज्याची परीक्षा उत्तीर्ण केलेली असली, तरीही आता महाराष्ट्राची परीक्षा तोंडावर आलेली आहे. अशा परिस्थितीत ज्यावेळेस सर्व एक्झिट पोल काँग्रेसचे सरकार येणार म्हणत होते, जनता भाजपाच्या बाजूने नाही म्हणत होते, त्यावेळेस भाजपाने असे काय केले की, जेणेकरून त्यांचा विजयरथ काँग्रेस रोखू शकली नाही, याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यातून महाराष्ट्राला काय बोध घ्यायचा तो महाराष्ट्राने घेतला पाहिजे.

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस भाजपाच्या बरोबरीत येऊन पोहोचली होती. दोघांनाही लोकसभेच्या पाच-पाच जागा मिळाल्या. त्यावरून काँग्रेस म्हणायला लागली की, लोकसभेमध्ये यांना केले हाफ, आता विधानसभेत यांना करू पूर्ण साफ! तिकीट वितरण हे नेहमीच एक जिकिरीचे कार्य असते. काँग्रेसमध्ये याच्यामुळे प्रचंड राजी-नाराजी होती तर भाजपामध्येही मोठमोठे नेते निवडणुकीच्या तोंडावर पार्टी सोडून गेले. परंतु काँग्रेस नेत्या कुमारी शैलजा ज्यांचा दलित समाजामध्ये मोठा चाहता वर्ग आहे, त्यांना काँग्रेसने तिकीट वितरणात बरोबर सहभागी करून घेतले नाही, त्यामुळे त्या नाखूश होत्या व प्रचारामध्ये जवळपास एक हप्ता त्या सामीलच झाल्या नाही, या गोष्टीचा भाजपाने पुरेपूर उपयोग केला व भाजपाच्या मंचावरून काँग्रेसमध्ये दलितांना न्याय दिला जात नाही, अशा पद्धतीची ओरड सुरू केली. त्यामुळे दलित मतदारांमध्ये काँग्रेसबद्दल नाराजी पसरत गेली. काँग्रेस ही जाट लोकांची पार्टी आहे व आम्हाला तिथे काही स्थान नाही, अशा पद्धतीची भावना त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे दलित मतदार काँग्रेसपासून दूर झाला. भाजपाने दलित मतदारांना आपल्या जवळ आणण्यासाठी विशेष रणनीती बनविली आणि त्याद्वारे ते अधिकाधिक दलित समाजापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले. महाराष्ट्रातही असेच काही करण्याची आवश्यकता आहे. जाटव्यतिरिक्त जो इतर ओबीसी समाज आहे त्यांच्यापर्यंतसुद्धा भाजपा पोहोचला व लोकसभेसारखे जाट मत जर काँग्रेसच्या पारड्यात गेले तर आपल्या पारड्यात काय राहील, यासाठी जाट व्यतिरिक्त इतरही सर्व समाजांना एकत्रित करण्याचा भाजपाने चंग बांधला. त्याचाच परिणाम म्हणून जाट व्यतिरिक्त इतर ओबीसी समाज हा भाजपाच्या बाजूला झुकला गेला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, राज्य कुठलेही असो; परंतु जातीय समीकरणे ही असतातच. त्या अनुषंगाने तिकीट वाटप व इतर राज्यातील त्या त्या समाजाच्या नेत्यांना आपल्या राज्यामध्ये फिरविले पाहिजे व मतदारांना आकृष्ट केले पाहिजे. हरयाणामध्ये भाजपाचे चार प्रभारी असलेले विप्लव कुमार देव, धर्मेंद्र प्रधान, सुरेंद्र नागर व सतीश पुनिया यांनी आपापल्या जागा वाटून घेत त्या मतदारसंघांमध्ये सूक्ष्म नियोजन केले व चमत्कार घडवून आणला. जे कधीच झाले नाही ते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी करून दाखविले. परंतु मराठा समाजाचा जो उपकारकर्ता आहे त्यालाच समाजाचे नेते शत्रू म्हणून समाजाच्या समोर प्रस्तुत करीत आहेत, ही अतिशय चुकीची गोष्ट आहे. परंतु, राजकारणात हे सर्व चालणारच आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा समाजामध्ये अधिक चांगली करण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विविध छोट्या-छोट्या समाजाची मते व त्या मतांनी प्रभावित होणाऱ्या जागा लक्षात घेऊन स्टार प्रचारकांची त्या त्या क्षेत्रामध्ये योजना करणे गरजेचे आहे. नुकतीच लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकारने आणलेली आहे. महाराष्ट्रातील महिला खूश आहेत. त्या महिलांपर्यंत पोहोचून ही योजना भाजपाने आणलेली आहे, त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये तुम्ही भाजपालाच किंवा महायुतीला मतदान करावे अशा पद्धतीचे आवाहन प्रत्येक महिलेला करणे गरजेचे आहे. अनेक लाडक्या बहिणींची मतदार यादीमध्ये नावे नसतील. 'आंधळा दळतो आणि कुत्रा पीठ खातो' ही परिस्थिती बरोबर नाही. लाडकी बहीण ही योजना गेम चेंजर ठरली पाहिजे. नुसते पैसे वाटून होणार नाही. कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. ज्याच्याकडे कुठलेही दायित्व नाही, परंतु जो भाजपाचा कार्यकर्ता आहे, हितचिंतक आहे अशा लोकांना जोडून ठेवण्यासाठी अधिक प्रयासाची आवश्यकता आहे. सत्ता आली की सर्वसामान्य कार्यकर्ते हे सत्तेपासून दूर ठेवले जातात, हा अनुभव आहे. यामुळे सत्तेनंतर येणाऱ्या निवडणुकीच्या वेळेला प्रचंड नाराजी पाहायला मिळते. याचाच परिणाम म्हणून सत्ताधाऱ्यांना पुन्हा सत्तेमध्ये येण्यामध्ये जास्त परिश्रम करावे लागतात.

हरयाणामध्ये निवडणुकीच्या ऐन सहा महिनेआधी भाजपाने मनोरलाल खट्टर यांना मुख्यमंत्री पदावरून दूर केले व नायबसिंह सैनी या ओबीसी चेहऱ्याला समोर आणले; तो प्रयोग यशस्वी झालेला आहे. मराठा चेहरा दिसला पाहिजे यासाठी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यात आले. पडद्यामागचे राजकारण काही असो; परंतु जनतेने हाच संदेश ग्रहण केलेला आहे. यावेळेस बंडखोरी मोठ्या प्रमाणावर होणार, असे चित्र आहे. हरयाणामध्ये मोठमोठ्या नेत्यांना बंडखोरीमुळे बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. त्यांच्याऐवजी निवडून येऊ शकणाऱ्या लोकांना तिकीट दिले गेले व त्याचा फायदा झालेला आता दिसून येत आहे. बंडखोरीमुळे अधिक नुकसान होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.

राजकारणाच्या या धुमश्चक्रीमध्ये भाजपामध्ये कार्यकर्ता प्रशिक्षणावर भर दिला गेलेला नाही. सामान्य कार्यकर्त्यांना आपण कसे बोलले पाहिजे, संपर्क कसा केला पाहिजे, लोक काय प्रश्न विचारू शकतात, त्याचे काय उत्तर आहे, याचे प्रशिक्षण व साहित्य वितरित करणे गरजेचे आहे. महिला, मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी या सर्वांवर लक्ष केंद्रित करून राज्य सरकारने गेल्या अडीच वर्षांत काय केलेले आहे, हेही सांगितले पाहिजे आणि आधीच्या लोकशाही आघाडीची कोरोना काळातील निष्क्रियता, त्याने लोकांचे गेलेले प्राण हा इतिहास लोकांसमोर मांडला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### अभिजात दर्जा, मराठी भाषेचा!

महायुती सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा प्रदान करून या भाषेला अधिक श्रीमंत केले आहे. अलिकडे इंग्रजी भाषा बोलणारे अधिक आधुनिक समजले जात होते आणि मराठी भाषा बोलणारे मागासलेले! आता आपले मराठी भाषिक मराठी भाषा अगदी आनंदाने व अभिमानाने बोलतील.




पूर्वी इंग्रजी भाषेच्या पाठशाळांना आपण सारे खूप मोठी शाळा समजत होतो. 'आमच्या मुलाला मराठी नीट बोलता येत नाही' हे त्यांचे आई-बाबा खूप कौतुकाने सांगत असत. आता आपल्याला मराठी नीट बोलता येत नाही, याचे मराठी भाषिकांना वाईट वाटेल. आपण जेव्हा मराठीमध्ये बोलत असतो, तेव्हा मध्ये मध्ये इंग्रजी भाषेतील शब्द दत्तक घेत असतो. आपण सर्वांनी असे इंग्रजी भाषेमधील शब्द दत्तक घेणे कमी केले पाहिजे. अगदी मराठी भाषेचे जाणकार लोकही असे इंग्रजी भाषेमधील शब्द दत्तक घेत असतात. मात्र, आता इंग्रजी भाषेचा उपयोग करणारे मराठी भाषेमधील शब्द दत्तक घेतील सहजपणे! आता सर्वच इतर भाषांतील शब्द मराठी भाषेत भाषांतरित करण्याचे प्रयत्न या भाषेचे जाणकार करीत आहेत. फक्त ते शब्द बोलण्याची सवय आपल्या मराठी भाषिकांना लावणे गरजेचे आहे. आपल्याला मराठी भाषेसोबत इतर भाषेत बोलता येणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु मराठी भाषा शुद्ध पद्धतीने बोलता येणे गरजेचे आहे. आपण शुद्ध भाषेत मराठी बोलू लागलो की आपली पुढची पिढी ही शुद्ध भाषेत मराठी बोलू लागेल आणि सर्वांची मराठी मातृभाषा श्रीमंत होत जाईल. महाराष्ट्र सरकारने अभिजात दर्जा या भाषेला दिला. आपण या भाषेचा दर्जाही वाढविला पाहिजे छान मराठी भाषा बोलून आणि लिहून! पूर्वी शुद्ध भाषेत कोणी मराठी बोलले की लोक हसत होते. आता या भाषेला विशेष दर्जा प्राप्त झाल्यामुळे सर्वच मराठी भाषिक भाषेचा दर्जा वाढवतील आणि मनापासून हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करतील.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

## वाचक पत्रे

### नवी मुंबई एअरपोर्टला रतन टाटा यांचे नाव द्या



रतन टाटा यांचे भारताच्या आर्थिक व औद्योगिक विकासातले अनन्य योगदान, वैद्यकीय क्षेत्रात अमूल्य सहभाग, इतर सामाजिक दायित्वाचे निर्वहन, खरोखर साधी राहणी उच्च विचारसरणी, लहानातल्या लहान माणसाचा विचार व त्याला साहाय्य करणे या सगळ्याचा गौरव व्हावा व येणाऱ्या पिढीला त्यांचे कर्तृत्व, दातृत्व कळावे म्हणून नवी मुंबई एअरपोर्टला रतन टाटा यांचे नाव द्यावे.

**रवी वाघमारे**/नागपूर

### टेलिकॉमनगर पार्कची दुरवस्था

टेलिकॉमनगरमध्ये मोठा बगीचा आहे; ज्याचा वापर मुख्यत्वेकरून टेलिकॉमनगर, रामकृष्णनगर, रवींद्रनगर, शास्त्रीनगर, खामला, त्रिशरणनगर, गावंडे लेआऊट, सेंट्रल एक्साईज कॉलनी इ. भागातले रहिवासी करतात. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. लोक सकाळ-संध्याकाळ फिरायला व व्यायाम करायला येतात. परंतु त्यामध्ये अडचणी येऊ लागल्या आहेत. जॉगिंग ट्रॅक अनेक ठिकाणी उखडला असून, काही ठिकाणी तो उंच-सखल झाला आहे. कुठे नळाचा पाईप टाकण्यासाठी खोदला आहे, परंतु डागडुजी झालेली नाही. काही सिमेंट ब्लॉक्स उखडले गेले आहेत. संध्याकाळी अपुऱ्या उजेडामुळे ट्रॅकवर गैरसोय होते. परिणामी पडण्या-झडण्याची शक्यता वाढते. लाकडी, लोखंडी व दगडाचे अनेक बेंचेस तुटलेले आहेत. बसायला जागा कमी पडते. व्यायामाची साधने वाढविण्याची गरज आहे. उदा. पायडल मारून व्यायाम करायची सोय. लहान मुलांना खेळायला घसरगुंडीव्यतिरिक्त काही नाही. सी-सॉ, झोपाळे, मेरी गो राऊंड आदी साधने वाढविण्याची आवश्यकता आहे. मुलाच्या खेळण्याच्या जागेवरही संध्याकाळी अंधार पडतो. त्यामुळे उद्यानातील लायटिंगमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. लोकसभा निवडणुकीआधी एक कार्यकर्ते एका नेत्याला घेऊन आले होते; त्यांना या सगळ्या अडचणी सांगितल्या होत्या. त्यानंतर ते कार्यकर्त्यांनी मला बगिच्यासाठी ५० लाख रु. मंजूर झाल्याचे सांगितलेही होते व आचारसंहिता संपल्यावर कामाला सुरुवात होईल, असे सांगितले होते. निवडणूक होऊनही गेली. आता विधानसभेची निवडणूक येऊ घातली आहे, परंतु काम काही सुरू होऊ शकले नाही. सर्व संबंधितांना विनंती आहे की, बगिच्यात आवश्यक त्या सर्व सुधारणा करून द्याव्या. म्हणजे या भागातील नागरिकांची सोय होऊन दिलासा मिळेल. आणखी एक- तात्या टोपेनगरातील बगीचा अतिशय चांगला व सुविधायुक्त आहे. त्या धर्तीवर या बगिच्याचे काम व्हावे एवढेच.

**दीपक अमीन**/७३८७१२२२४९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आ.लक्ष्मण आण्णांनी आणेलेले प्रत्येक काम दर्जेदारच होईल यांची काळजी घेतली–शिवराज पवार

## शासकीय विश्रामगृहाच्या नविन बांधकाम इमारतीचे शिवराज पवारांच्या हस्ते उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ ऑक्टोबर**

मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला तेव्हा पासून आ.आण्णांनी मतदार संघाची प्रामाणीक पणे सेवा करत मतदारसंघातील प्रत्येक काम पारदर्शकणे केले आहे त्यासाठी आण्णांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला आज मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्रात नाव मोठे व्हावे हेच आमच्या पवार कुटुंबाचे ध्येय आसल्याचे शिवराज पवार यानी उद्धाटन प्रसंगी बोलतांना सागितले.

मतदारसंघाचेआ. लक्ष्मण आण्णा पवार यांच्या विशेष प्रयत्नातून सोमवारी दि.१३ रोजी शिवराज पवार यांच्या शुभहस्ते गेवराई येथील नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,शिवसेनेचे तालुकाध्यक्ष शिनुभाऊ बेदरे, सुशील जवंजाळ, मधुकर तौर, अय्युब बागवान राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, जान मोहम्मंद बागवान,नगरसेवक कृष्णा काकडे, राजाभाऊ आर्दड, भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे, संजय इंगळे, किशोरजी धोंडलकर, फिरोज शेठ, मुन्ना शेठ, राम पवार, मा.उपनगराध्यक्ष मधुकर आप्पा वादे, सतीश दाभाडे सरपंच नंदू गरड,शिराळाचे सरपंच माऊली जाधव, ज्ञानेश्वरजी पवार,बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण,विष्णुपंत आतकरे,राजेभाऊ मातकर, शरद मोटे,गणेश मोटे, विठ्ठल मोटे, समाधान मस्के,कदीरभाई बागवान, बेदरे,करण जाधव, अमोल मस्के,माजेद भाई,गोरख मोटे,मुन्ना मोटे, रंजीत डरपे,ऋषिकेश मोटे,मुस्ताक भाई कुरेशी, मोंटी माटे,अरुण पवार,गणेश पवार,संतोष राठोड,आसेफ काजी,शेख उस्मान,फाहत भाई चाऊस,शोएब भाई,कृष्णकांत पाटील, रोहितजी राठोड,विष्णुपंत शेलार,मुरली अण्णा सुतार, दिपक शेलार,इमरान भैया पठाण,बळीभाऊ करे,विलास शिंदे,रविराज आहेर,विक्रम भोसले,योगेश मोटे,रमेश राठोड,सुंदर धस,योगेश मोटे,बाबभाई फिटर,जफर टेलर,सादेक चाचू,शेख नईम,प्रल्हादजी येळापुरे,संजय आंधळे कृष्णा पाटोळे व इतर कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच समस्त गेवराई कर उपस्थित होते.

### आज मतदारसंघातील ६५ कोटीच्या सिमेंट रस्ता कामांचे आज होणार उद्घाटन

तलवडारोड ते रेवकी देवकी गोदी रस्ता,रामपुरी ते ढालेगाव रस्ता,सुर्डी फाटा ते सेलु रस्ता, लोणाळा ते सिदफणा चिंचोली रस्ता, जातेगाव रोड ते मुदापुरी रस्ता,सावरगाव ते चिखली रस्ता,चंकलंबा रोड ते ब्रम्हगाव रस्ता वरील सर्व गावातील रस्ते मिळुन ४० कि.मी. रस्त्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुरी मिळाली आहे त्या सिमेंट रस्ता कामांचा आ.लक्ष्मण पवार, व शिवराज पवार, यांच्या हास्ते आज मंगळवारी उद्घाटन होणार आहे

# धनंजय मुंडेंचे परळी क्रीडा संकुल उभारणीसाठी मोठे पाऊल, महानिर्मितीची ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलासाठी मोफत हस्तांतरित!

## ऊर्जा विभागाकडुन शासन निर्णय निर्गमित; क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

परळी वैजनाथ शहरातील व तालुक्यातील नागरिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या क्रीडा संकुल उभारण्याच्या दृष्टीने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मोठे पाऊल उचलले असून, परळी शहरालगतच्या जलालपूर येथील ५ हेक्टर ३० आर जागा क्रीडा संकुलास मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय आज धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून ऊर्जा विभागाने घेतला आहे.



सदर ५ हेक्टर ३० आर जमीन महानिर्मिती कडून मोफत घेऊन ती महसूल विभागास हस्तांतरित करण्यात येत असून, याबाबतचा शासन निर्णय आज उद्योग-ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केला आहे. त्यामुळे आता परळीच्या क्रीडा संकुल उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

परळीच्या मातीतून विविध क्रीडा प्रकारातील अनेक खेळाडू राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहेत. दरवर्षी धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर क्रिकेटसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. मात्र या खेळाडूंना सरावासाठी क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याने खेळाडूंची गैरसोय होत होती.

त्यादृष्टीने धनंजय मुंडे यांनी क्रीडा विभागामार्फत राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यामार्फत जमीन ऊर्जा विभागाकडून हस्तांतरित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर आज यश आले असून महानिर्मितीच्या परळी येथील औष्णिक विद्युत केंद्राच्या मालकीची जलालपुर येथील ८.५ हेक्टर जागेपैकी वापरात नसलेली व भविष्यात कोणतेही प्रयोजन नसलेली ५ हेक्टर ३० आर जमीन क्रीडा संकुलासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

परळीत धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार भव्य क्रीडा संकुल अद्ययावत सोयी-सुविधांसह उभारले जावे यासाठी मागील वर्षी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत १९ कोटी ७५ लाख रुपयांच्या आराखड्यास याआधीच मान्यता देण्यात आलेली आहे, त्यामुळे क्रीडा संकुल उभारणीसाठी पुरेसा निधीही उपलब्ध आहे.जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत सदर जमीन क्रीडा विभागास हस्तांतरित करून उभारणीबाबतची पुढील कार्यवाही तातडीने सुरू करावी असे निर्देश धनंजय मुंडे यांनी संबंधितांना दिले आहेत. तसेच या निर्णयाबद्दल श्री मुंडे यांनी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही व्यक्त केले आहेत.

# बाबरी मुंडे यांना माजलगावात वाढता प्रतिसाद

## संवाद दौऱ्याला मिळतेय तरुणांची साथ; थोरा मोठ्यांचा आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ ऑक्टोबर**

वडवणी तालुक्याच्या राजकारणात समाजकारणात नंबर एकवर बाबरी मुंडे यांचे नाव गनल्या जाते.असा 'युथ आयकॉन'असणारा हा चेहरा येता विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव तालुक्यातही सक्रिय झाला आहे.दरम्यान दोनच आठवड्यात त्यांनी आपली क्रेज याठिकाणी निर्माण केली आहे. तालुक्यात तब्बल ५० गाववस्तीवर त्यांनी आपला संवाद दौरा पूर्ण केला आहे.या झंजावती दौऱ्यात हजारो तरुणांची साथ भेटत असून गावागावात वस्तीवस्तीवर त्यांना थोडामोठ्यांचा आशीर्वाद,उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



स्व.गोपीनाथराव मुंडे,आ.पंकजा मुंडे यांचे निकटवर्ती म्हणून राजाभाऊ मुंडे व त्यांचे पुत्र बाबरी मुंडे यांचे नाव आहे.वडवणी तालुक्यातील राजकारणात समाजकारणात त्यांचा प्रभाव आहे.जिल्हाभर त्यांची ओळख आहे.'युथ आयकॉन'म्हणून बाबरी मुंडेनी आपली ओळख तरुणांच्या मनात निर्माण केली आहे.दरम्यान जिल्ह्यात मराठा ओबीसी असा राजकीय वाद टोकावर पोहोचला आहे.अशा स्थितीत माजलगाव विधानसभेत प्रभावी ओबीसी चेहरा असणाऱ्या नेतृत्वाला नशीब आजमावण्याची संधी आहे.याच पार्श्वभूमीवर ओबीसी प्रभावी चेहरा म्हणून बाबरी मुंडे यांनी माजलगाव विधानसभेत आपले नशीब आजमावण्यास सुरुवात केली आहे.बोलका,हसता खेळता मनमोकळा स्वभाव,येथील तरुणांना फक्त दोनच आठवड्यात लक्षात आला.त्यामुळे शितावरून भाताची परीक्षा झाली असल्याने बाबरी मुंडे यांनी येथे आपली क्रेझ निर्माण केली आहे.हजारो तरुण त्यांना येऊन भेटत आहेत. माजलगाव तालुक्यातील बडेवाडी, नित्रुड, सुलतानपूर,नाकलगाव, पिंपळगाव,दिंद्रूड,रामनगर तांडा, मोठेवाडी, हनुमान नगर,पवारवाडी, कल्याण नगर,सिद्धेश्वर नगर,खरात आडगाव,हनुमान नगर तांडा, निपाणीटाकळी,वसंत नगर तांडा, शुक्लतीर्थलिंमगाव, सोन्नाथडी,गुंजथडी,सुरूमगांव,गंगामसला, आडोळा, सरवर पिंपळगांव, आबेगाव,छत्र बोरगाव,सिमरी पारगाव, जीवनापूर नाथनगर तांडा,साळेगाव,देवळा,कोथरूळ, पुरुषोत्तमपुरी,माळेवाडी,महातपुरी, वाघोरा, किट्टीआडगाव, गोविंदवाडी, लऊळ नं.१,पात्रूड,शिंदेवाडी, लहामेवाडी, गुजरवाडी,शेंडगेवस्ती ई.५० गाव वस्ती,वाडी,तांड्यावर आपला संवाद झंजावती दौरा त्यांनी पोहोचवला आहे.या झंजावाती संवाद दौऱ्याला,या तरुण नेतृत्वाला तरुणांची प्रचंड साथ भेटत आहे.थोरामोठ्यांचा आशीर्वाद भेटत आहे.गावागावात नागरिकांकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केल्या जात आहे.दरम्यान दोनच आठवड्यात बाबरी मुंडे यांनी विधानसभेचा प्रभावी चेहरा म्हणून आपली क्रेज याठिकाणी निर्माण केली आहे.त्यामुळे अनेक प्रस्थापित राजकारण्यांचे धाबे दनानले आहेत.

# वरिष्ठांचे संकेत मिळताच नितीन नाईकनवरे लागले कामाला

## ठरवाल ते धोरण,बांधाल तेच तोरण!
## कार्यकर्त्यांनी घेतला बैठकीत एकमुखी निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ ऑक्टोबर**



१४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांचा वाढदिवस साजरा झाला.यावेळी विधानसभेच्या अनुषंगाने मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद विविध राजकीय पक्षांनी घेतली होती.दरम्यान सोमवार दि.१४ रोजी नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यकर्ता बैठकीत तुम्ही ठरवाल ते धोरण आणि बांधताल ते तोरण असा एकमुखी निर्णय प्रमुख कार्यकर्तासह सरपंचांच्या बैठकीत घेण्यात आला.यातून वरिष्ठांच्या संकेत मिळताच नितीन नाईकनवरे विधानसभेच्या कामाला लागल्याचे दिसत आहे.

माजलगाव बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी सोमवार दि.१४ रोजी दुपारी कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.येत्या विधान सभेत आपली उमेदवारी असावी किंवा नाही.याच्या चाचपणीसाठी या बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.तत्पूर्वी १४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद राजकीय पक्षांनी घेतली असल्याची माहिती आहे.त्यामुळे वरचे संकेत मिळतात नितीन नाईकनवरे कामाला लागले आहेत. यावेळी आयोजित कार्यकर्ता बैठकीला पंचक्रोशीतून प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीत उपस्थिती लावली होती.दरम्यान सर्वच उपस्थित कार्यकर्त्यांनी नितीन नाईकनवरे यांना विधानसभा लढवण्याचा आग्रह केला.दादा, तुमचे काम सर्व व्यापक आहे.सर्व जाती धर्मात आपल्याला मानणारा वर्ग आहे.समाज उपयोगी अनेक काम आपण मार्गी लावली आहेत. त्यामुळे येत्या विधानसभेत नेतृत्व करण्याची आपली धमक आहे. आपण कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी घ्या.आम्ही तुमच्या सोबत आहोत.आपण बांधाल ते धोरण आणि घेताल तो निर्णय आमच्यासाठी मान्य असेल.असा एकमुखी निर्णय यावेळी उपस्थिती कार्यकर्त्यांनी घेतला आहे.यावेळी अनेक गावच्या सरपंचासह प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.या माध्यमातून नितीन नाईकनवरे वरचे संकेत मिळताच कामाला लागले असल्याचे दिसत आहे.

# ६८ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा





**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ ऑक्टोबर**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन ६८वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला सकाळी ठिक ८.३०वा माजलगाव शहरातील डॉ आंबेडकर चौक या ठिकानी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅली स सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुण माजलगाव पोलीस स्टेशन शहर चे पोलीस निरिक्षक आद.राहुलजी सुर्यतळ साहेब यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे संस्कार उपाध्यक्ष आद एस बी मोरे, भिमराव सिरसट होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे होते. कार्यक्रमासाठी पोलीस निरिक्षक राहुलजी सुर्यतळ,पी एस आय माकने , शोभाताई भोजने , शामभाऊ वाघमारे, के व्ही साळवे,केंद्रीय शिक्षिका सिरसट ताई, वंचित बहुजन आघाडीचे नेते अंकुश आण्णा जाधव उपस्तीत होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक एल. आर.मस्के यांनी केले या प्रसंगी बोलताना पोलीस निरिक्षक सुर्यतळ यांनी उपस्तीत उपासक उपासिका यांनी बालकावर पंचशीलेचे पालण करण्याचे संस्कार रूजवणे हि काळाची गरज आहे यातुनच आचरणशिल व सुसंस्कारीत उपासक निर्माण होईल असे प्रतिपादन केले.

या प्रसंगी भिमराव सिरसट व एस बी मोरे यांनी अशोका विजयादशमी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती गतीमान कशी करावी ह्या विषयी विविध मुद्या द्वारे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार बौद्धाचार्य डी पी पोटभरेआप्पा यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे,नितिन डोंगरे दयानंद साळवे,गुलाब धाईजे मोहन काकडे,संभाजी धाईजे चक्रधर पोटभरे,डी पी वाघमारे नाना,भानुदास साळवे, कालीदास साळवे, नागसेन जावळे,अशोक मगर,दिनेश निसर्गंध, नंदकिशोर निसर्गंध ,राजेभाऊ साळवे,शारदाताई तांगडे,वंदनाताई घनघाव अनुराधाताई साळवे,आशाताई मोरे ,मंडोदरीताई खंदारे,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# संस्कार भारती माजलगावच्या वतीने भूअलंकरण महोत्सव साजरा

## नवरात्रोत्सवानिमित्त विशिष्ट उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगव दि.१३ ऑक्टोबर**

येथील संस्कार भारतीने आयोजित केलेल्या दहा दिवसीय भूअलंकरण महोत्सवाची आज विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर सांगता होणार आहे. गावातील श्री भवानी माता मंदिराच्या प्रांगणात मागील दहा दिवसांपासून दररोज संस्कार भारती माजलगावचे कलासाधक विविध विषयांवरील रांगोळ्यांचे रेखाटन करत असून राणी अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे निमित्त साधून त्यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श सर्व जनतेसमोर यावा यासाठी विविध सामाजिक विषयांवरील रांगोळ्या रेखाटत संस्कार भारती माजलगाव ने राणी अहिल्यादेवी होळकर यांना अनोखी श्रद्धांजली अर्पण केली आहे. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल माय मराठीचा जागर करीत संस्कार भारतीने रांगोळीतून माय मराठीची महती अधोरेखित केली. विविध ठिकाणी बालिकेंवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरुद्ध संताप व्यक्त करीत संस्कार भारती माजलगावच्या महिला साधकांनी भूअलंकारणातून निषेध व्यक्त करीत विविध घोषवाक्यांद्वारे समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबवण्यासाठी सुंदर असे भूअलंकारण रेखाटण्यात आले होते. तसेच कागद वाचवा, डिझेल-पेट्रोलची बचत करा, सायकल वापरा, पाणी वाचवा, प्रदूषण टाळा अशा प्रकारचे छोटे छोटे घोषवाक्यंसह चित्र रेखाटत संस्कार भारतीने अनोखा संदेश दिला आहे. आज विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर राणी अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक असलेल्या चोंडी येथील स्मारकाचे सुंदर रेखाटन सादर करण्यात येणार असून आज या महोत्सवाचा समारोप देवगिरी प्रांताच्या प्रांताध्यक्ष प्रा.स्नेहल पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे संस्कार भारती माजलगावच्या अध्यक्षा स्मिता लिमगावकर, सचिव गौरी देशमुख व भूअलंकरण प्रमुख संगीता संदीकर यांनी सांगितले. या दहा दिवसीय महोत्सवास माजलगावच्या आबाल-वृद्धांनी भेट देऊन फोटो काढण्यासाठी गर्दी केली होती. विविध मान्यवरांनी या महोत्सवास भेट देऊन संस्कार भारती माजलगावच्या या सलग तिसऱ्या वर्षीच्या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. संस्कार भारतीच्या या उपक्रमास प्रसिद्ध साहित्यिक प्रभाकर साळेगावकर, रोटरीचे अध्यक्ष रवींद्र कानडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, डॉ.अंजली घुबडे, अभय होके, सुरेंद्र रेदासनी, विश्वास जोशी, माधव निर्मळ, रूपाली कचरे, मनीषा नाईकनवरे, जीवन भंडारी, उद्धव विभुते, पत्रकार उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, कमलेश जाब्रस, पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. आज विजयादशमीच्या दिवशी होणाऱ्या समारोप समारोहास देवी भक्तांनी आणि कलाप्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे. या दहा दिवसीय भूअलंकारण महोत्सवासाठी संस्कार भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद वझे ,सुरेश देशपांडे, ऐश्वर्या धोत्रे, भावना कुलकर्णी, जगदीश रामदासी, राधिका रामदासी, अनुराधा हिवरेकर, संगीता संदीकर, अर्चना भानप, वैशाली वाघमारे, वैष्णवी होके, शामल राऊत, प्रज्ञा भानप, छाया देशपांडे, वृषाली तालखेडकर, प्रीती पाटील, लता जोशी, अनुजा जोशी यांच्यासह अनेक महिला साधकांनी भूअलंकरण केले. संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा प्रा.स्नेहल पाठक, बीड जिल्हा संस्कार भारती चे अध्यक्ष प्रमोद वझे, जिल्हा सचिव तथा या महोत्सवाचे संयोजक सुरेश भानप, संस्कार भारती माजलगावच्या अध्यक्ष स्मिता लिमगावकर, सचिव गौरी देशमुख, भूअलंकरण प्रमुख संगीता संदीकर, मार्गदर्शक प्राणेश पोरे, पंढरीनाथ जोशी, दिगंबर महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या उपक्रमाचे सर्वच थरातून कौतुक होत आहे. विशेष म्हणजे आज लगेच दहा दिवसात रेखाटलेल्या रांगोळ्यांचे सुरेश भानप संपादित चित्ररूपी संग्रहण प्रकाशित होणार आहे.

# राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे खोलेश्वर महाविद्यालयात आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१४ ऑक्टोबर**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या खोलेश्वर महाविद्यालयामध्ये स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बुधवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम तरूणांच्या जीवनात घडावा त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान वृद्धिंगत व्हावे हा या स्पर्धेचा हेतू आहे. या दृष्टिकोनातूनच वक्तृत्व स्पर्धेच्या विषयांची निवड केली आहे. राष्ट्र, समाज आणि शिक्षण या त्रिसूत्रीला अनुसरून ही वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली आहे.

खोलेश्वर महाविद्यालय हे मागील ५३ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात विविध सामाजिक, शैक्षणिक गुणवत्तेच्या वाढीसाठी सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. चालू शैक्षणिक वर्ष हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे त्रिशताब्दी वर्ष म्हणून सर्वत्र साजरे होत आहे. या निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन कार्याशी निगडित विविध उपक्रमांचे आयोजन महाविद्यालय करत आहे. हे या वक्तृत्व स्पर्धेचे ५४ वे वर्ष आहे. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले आहे. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. १) असे आम्हाला हिंदुत्वाचा सार्थ असा अभिमान, २) निर्भय होऊ आम्ही, जगाला निर्भयता शिकवू, ३) कुटुंब हेच संस्काराचे प्रथम केंद्र, ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा सांस्कृतिक राष्ट्रवाद, ५) समाज स्वास्थ्य बिघडविणारी समाज माध्यमे..! या स्पर्धेचे माध्यम मराठी असेल. पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांनी वरिष्ठ आणि कनिष्ठ गटातून प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवावा. सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. स्पर्धेचे सांघिक शुल्क १०० /- रूपये असेल. सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संघाची नोंदणी ीळिपलळरिश्रिज्ञारसारळश्र.लो या ई-मेलवर करावी. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना संलग्न असलेली वरिष्ठ महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये तसेच माध्यमिक विद्यालयांना जोडून असलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेता येईल. स्पर्धा बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहात सुरू होईल. सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या संघाला फिरता स्मृती चषक देण्यात येईल. हा फिरता स्मृती चषक संबंधित महाविद्यालयाकडे एक वर्ष राहील. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची तसेच त्यांच्या समवेत आलेल्या प्राध्यापक किंवा प्रशिक्षकांची देखील भोजनाची व्यवस्था महाविद्यालयात करण्यात आलेली आहे. तसेच प्रथम पारितोषिक - रूपये ७००१/- व सन्मानचिन्ह, द्वितीय पारितोषिक - रूपये ५००१/- व सन्मानचिन्ह, तृतीय पारितोषिक - रूपये ३००१/- व सन्मानचिन्ह आणि उत्तेजनार्थ दोन पारितोषिके प्रत्येकी रूपये ११०१/- व सन्मानचिन्ह असे पारितोषिकांचे स्वरूप आहे. विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी स्पर्धा प्रमुख प्रा.योगेश कुलकर्णी (भ्रमणध्वनी क्रमांक - ९४०३०३७०११) तसेच स्पर्धा सहप्रमुख प्रा.तुळशीराम मुंढे (भ्रमणध्वनी क्रमांक - ८६९८७९५४११) यांच्याकडे करावी असे आवाहन स्व.नाना पालकर स्मृती राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे संयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले आहे.





पूर्वेशजी प्रताप सरनाईक युवासेना कार्याध्यक्ष आणि किरणजी साळी युवासेना सचिव यांचे काल बीडमध्ये आगमन झाले असता शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जगताप यांच्यासह बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना आजी-माजी पदाधिकारी-लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेरखेडा परिसरात गूढ आवाज; नागरिक भयभीत

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१४ ऑक्टोबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरात सोमवारी दि.१४ रोजी अचानक गूढ आवाज आला आहे.

सकाळी ९ च्या दरम्यान घरावरील पत्रे थरथरले असल्याचे जाणून आले होते.

हा आवाज नेमका कशाचा आहे? यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये थोडावेळ चर्चा होती.

गेले अनेक दिवसांपासून वारंवार तेरखेडा भागत असे गूढ आवाज ऐकू येत आहेत मात्र, हे आवाज नेमके कशामुळे येत आहेत त्याचे रहस्य उलगडले नाहीत.

प्रशासनाकडून याचा कसलाच खुलासा होत नसल्याने प्रशासन मात्र याबाबत मौन बाळगून आहे. यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### धनगर समाजाच्या वतीने तेर गाव कडकडीत बंद

**तेर, दि.१४ ऑक्टोबर -**

धनगर समाज बांधवांचा एसटीमध्ये समावेश करण्याचा मागणीसाठी तेर येथे १४ आक्टोबरला कडकडीत बंद पाळण्यात आला. सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने तेर बंदचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून तेर येथील व्यापारी यांनी कडकडीत बंद पाळला. धनगर समाज बांधवांच्या वतीने मंडळ अधिकारी शरद पवार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.



### रतन टाटा यांना राजेगावात श्रद्धांजली

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

३० सप्टेंबर १९९३ भूकंप झाला तेव्हा उद्योग सम्राट पद्मभूषण, पद्मश्री, रतनजी टाटांनी राजेगाव हे गाव पुनर्वसन करून आपला दानशूरपणा दाखवून दिला. आशा महान व्यतिमत्वास आज दि.१४ ऑक्टोबर रोजी ग्रामपंचायत कार्यालय राजेगाव व शरद पवार विद्यालय राजेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. प्रसंगी गावचे सरपंच सुरेश देशमुख, प्रशासकीय अधिकारी मोरे, मेजर चंदकांत देशमुख, ग्रा.प. सदस्य देशमुख प्रविण, कालिदास बनसोडे, अंगणवाडी कर्मचारी देशमुख, गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते.



### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर सचिवपदी नवीन बनसोडे

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यतत्पर जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्या हस्ते आणि प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष अतुल जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय धाराशिव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय शहर सचिवपदी नवीन अरुण बनसोडे यांची नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी उपस्थित होते.



### तेर येथे विजयादशमी उत्साहाने साजरी

**तेर, दि.१४ ऑक्टोबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे विजयादशमी उत्साहाने साजरी करण्यात आली. विजयादशमी निमित्ताने श्री संत गोरोबा काका यांची पालखी व श्री कोष्टांबिकादेवीची पालखीची मुख्य रस्त्यावरून प्रतिवर्षाप्रमाणे मिरवणूक काढण्यात आली. पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक भक्त शिमोल्लघंनासाठी सहभागी झाले होते. यावेळी हभप रघुनंदन महाराज पुजारी, सोमनाथ यादव, पद्माकर फंड, नवनाथ पांचाळ,अमोल कस्तुरे, गणेश फंड व नागरिक सहभागी झाले होते. विजयादशमी निमित्ताने श्री. कोष्टांबिकादेवी मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ठरणार महायुतीच्या उमेदवारासाठी 'गेम चेंजर'

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१४ ऑक्टोबर -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत मोठे बळ मिळणार असुन या योजनेमुळे तुळजापुर तालुक्यातही महायुतीच्या उमेदवाराला विधानसभा निवडणुकीत मोठा फायदा होणार असल्याचे दिसुन येत आहे. तुळजापुर तालुक्यात जवळपास ७० हजार महिलांना या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरणार असल्याचे दिसुन येत आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला म्हणावे तसेच यश प्राप्त झाले नव्हते त्यामुळे महायुतीमध्ये अस्वस्थतता पसरली होती. त्यातच विधानसभा निवडणुक होणार असल्याने व नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घावघवीत यश मिळाल्याने महाविकास आघाडीचे नेते विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा दारुण पराभव करून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असे भाकीत करत होते. आणि लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे त्यामध्ये तथ्यही होते. त्यामुळे महायुतीच्या गोटामध्ये अस्वस्थतता पसरली होती. अशा कठीण प्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मध्यप्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणही योजना सुरु केली. या योजनेमुळे तसेच या योजनेला महिलांचा मिळालेला उदंड प्रतिसाद यामुळे राज्यात बॅकफुटवर गेलेली महायुती पुन्हा एकदा फॉर्मात आली. राज्यसरकार केवळ ही योजना जाहीर करून थांबले नाही तर या योजनेसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक महिलांच्या खात्यावर महिन्याला १५०० रुपये याप्रमाणे पाच महिन्याचे ७५०० रुपये जमा केले आहेत त्यामुळे या महिला महायुतीच्या सरकारवर आज प्रचंड खुश आहेत. याचा फार मोठा परीणाम येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळणार आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी तुळजापुर तालुक्यातील ७० हजार महिला पात्र ठरल्या आहेत यातील बहुतांश महिलांच्या खात्यावर ऑक्टोबर महिन्यापर्यंत पैसे जमा झाले आहेत. त्यामुळे या लाडक्या बहिणी निश्चितपणे विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या पाठीशी राहण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन महाविकास आघाडीच्या उमेदवाराला ५० हजारपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले होते. वास्तविक पाहता या मतदार संघात महायुतीचे आमदार असतांना हे महायुतीसाठी योग्य नव्हते. मात्र त्यावेळी परीस्थितीच तशी विचित्र होती. मात्र आज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे ती परीस्थिती राहिली नाही. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे तुळजापुर विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचे तिकीट मिळावे म्हणुन आज अनेकजण प्रयत्न करत आहेत. मात्र लाडकी बहीण योजनेमुळे व त्या योजनेला महिलांचा मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे महायुतीमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आ. पाटील यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघातील जास्तीत जास्त महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फायदा व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट या तीनही पक्षाचे या मतदार संघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यशस्वी व्हावी यासाठी प्रयत्न केले. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी या योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांचे अर्ज भरण्यासाठी मोफत सोय केली होती. त्यामुळे या मतदार संघातील जास्तीतजास्त महिलांना या योजनेचा फायदा झाला आहे.

## उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी १० कोटी रुपये निधी मंजूर

### आमदार ज्ञानराज चौगुले यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणी, नूतनीकरणासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.

उमरगा हे राष्ट्रीय महामार्गावरील शेवटचे व सीमावर्ती भागातील तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी शिक्षण व व्यापार यासाठी दररोज हजारो लोक येत असतात.

यामुळे येथील बसस्थानकावर नेहमीच वर्दळ असते. परंतु येथील बसस्थानकाची सध्याची इमारत जीर्ण झाल्याने प्रवाशांना विविध गैरसोयीचा सामना करावा लागत होता.



तसेच मुरूम बसस्थानक हे संपूर्ण मोडकळीस आल्याने नागरिक, विद्यार्थी व विशेषतः महिलांची गैरसोय होत होती.

या अनुषंगाने आ. ज्ञानराज चौगुले यांच्या पाठपुराव्यामुळे या दोन्ही बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व नुतणीकरणासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

सदर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष भरतशेठ गोगावले, तसेच याकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

## शिराढोण येथे धनगर समाजाचे शेळ्यामेंढ्यासह ढोल बजाओ आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१४ ऑक्टोबर -**

धनगर जमातीच्या अनुसूचित जमाती आरक्षणाचा शासन निर्णय तात्काळ काढून मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा यासाठी कळंब तालुक्यातील शिराढोण येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात शेळ्या-मेंढ्यासह ढोल बजाव आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी रविवार असतानाही धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी एस.टी. आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. सकाळी ९.३० या सुमारास या आंदोलनास सुरुवात झाली. यावेळी उपस्थित बांधवांनी एस.टी. आरक्षण अंमलबजावणी साठी निर्वाणीचा इशारा दिला.

शासनाने या आंदोलनाची दखल घेऊन समाजाला सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रवाहात येण्याची वाट मोकळी करून द्यावी.

जर शासनाने सकारात्मक निर्णय नाही घेतला तर महाराष्ट्राचा धनगर समाज आपला अधिकार मिळवण्यासाठी आक्रमकपणे आंदोलन करेल व त्याचे गंभीर परिणाम शासनाला भोगावा लागेल असा इशारा आंदोलकांच्या माध्यमातून यावेळी देण्यात आला.

## चर्मकार समाजाच्या स्मशानभूमीची दुरावस्था; लाईटची सोय करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथील चर्मकार समाजाच्या स्मशानभुमीची मोठी दुरावस्था झाली असुन स्मशानभुमीत ना जायला रस्ता आहे ना स्मशानभुमीत लाईटची सोय आहे. आज स्मशानभुमी झाडे-झुडपे आणि गवतामध्ये शोधावे लागत आहे. नगरपालिका प्रशासनाने तात्काळ या स्मशानभुमीत जायला रस्ता आणि लाईटची सोय करावी अशी मागणी होत आहे.



नळदुर्ग शहरात आज कोट्यावधी रुपये खर्चाची विकास कामे सुरु आहेत. मात्र नगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चर्मकार समाजाच्या स्मशानभुमीची आज मोठी दुरावस्था झाली आहे. या स्मशानभुमीत जाण्यासाठी साधा रस्ता नाही अतिशय अडचणीतुन वाट काढत मृतदेह अंत्यविधीसाठी स्मशानभुमीत न्यावे लागते. पावसाळ्यात तर अतिशय वाईट अवस्था याठिकाणी आहे कारण उघड्यावरच अंत्यविधी करावे लागते कारण या स्मशानभुमीला केवळ बाजुनी संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. वरती कांहीच नसल्याने उघड्यावरच मृतदेहावर अंत्यसंस्कार करावे लागते. त्यात पाऊस आला तर अतिशय वाईट परीस्थितीला मृताच्या नातेवाईकांना सामोरे जावे लागते. आज विकासाच्या मोठं मोठ्या गप्पा सुरु आहेत मात्र या विकासाच्या गप्पामध्ये चर्मकार समाजाच्या स्मशानभुमिकडे पाहायला कुणाला वेळ नाही. ही मोठी शोकांतिका आहे.

वास्तविक पाहता हा विषय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे गेला असता तर क्षणात त्यांनी याठिकाणी चांगल्या दर्जाची व सर्व सोईनीयुक्त अशी स्मशानभुमी बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे काम केले असते.

## तुळजाभवानी महाविद्यालयात बालिका दिन व नवदुर्गा उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ ऑक्टोबर -**

तुळजाभवानी महाविद्यालयात जागतिक बालिका दिन व नवदुर्गा उत्सव दि.११ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

नवदुर्गा उत्सव साजरा करणे एक आनंददायी आणि सामुदायिक अनुभव असू शकतो. विद्यार्थिनींमधे देवी दुर्गेच्या नव रूपांची महती आणि तिच्या शक्तीचे स्मरण करून उत्साह निर्माण करणे हा या उत्सवाचा मुख्य उद्देश असतो. त्याचप्रमाणे 'उल्हास' नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत आजच्या नवीन पिढीला शिक्षणाचे महत्त्व मुलींनी नवदुर्गाचे स्मरण करून त्यांचे गुण आत्मसात करावे असा संदेश देण्यात आला.



या कार्यक्रमात लेक वाचवा, लेक वाढवा, लेक घडवा असा संदेश प्रमुख पाहुणे मीना सोमजी यांनी दिला. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. छाया दापके यांनी महिला सुरक्षा व महिला विषयक कायदे याविषयी मार्गदर्शन केले व आधुनिक शिक्षणाची कास धरून स्वावलंबी व्हावे असा मोलाचा संदेश देण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक डी.एच. लोंढे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन के.एस. कदम यांनी केले तर प्रस्ताविक व्ही.के. बाबर यांनी केले आणि आभार ए.जी. लकशेट्टी यांनी मानले. सदर कार्यक्रम प्रसंगी कनिष्ठ विभागातील सर्व विद्यार्थिनी व गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमरगा शहरात सहा सार्वजनिक प्रसाधनगृहे बांधकामासाठी निधी मंजूर : आ. चौगुले



### महिलांची गैरसोय होणार दूर...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**

उमरगा शहरात विविध ठिकाणी शौचालये नसल्याने किंवा नादुरुस्त असल्याने शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील अनेक महिलांना विशेषतः उमरगा शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांना याचा जास्त त्रास सहन करावा लागत आहे.

ही गरज ओळखुन आमदार ज्ञानराज चौगुले यांनी नगरविकास विभागाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उमरगा शहरातील उपजिल्हा रुग्णालय परिसर, शासकीय झोपडपट्टी, इंदिरा चौक, शिंदे गल्ली, गौतम नगर व आरोग्य नगरीचे कॉर्नर या सहा ठिकाणी नवीन शौचालय बांधणे व उर्वरित नादुरुस्त शौचालयांची दुरुस्ती करणे यासाठी एकूण २.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे.



याअंतर्गत भारतीय व पाश्चात्य पद्धतीचे सीट व मुतारी उपलब्ध होणार असुन प्रत्येक शौचालयाशेजारी स्वतंत्र विंधन विहीर व सोलार पॅनलचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. नव्याने होणाऱ्या सार्वजनिक शौचालयाचा उपयोग त्या त्या भागातील सुमारे ७५० कुटुंब व शहर व शहरात येणाऱ्या असंख्य नागरिकांना करता येणार आहे.

सदर कामासाठी निधी मंजुर केल्याबद्दल आ. ज्ञानराज चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे व सदरकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

## २९ हजार लोक वर्गणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घेतले स्काऊट गाईड पथसंचलन युनिफॉर्म



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**

श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी ता उमरगा येथील स्काऊट अँड गाईड विभागासाठी गावातील सामाजिक बांधिलकी जोपासणारे कुटुंबीय आणि व्यक्तीच्या माध्यमातून २९ हजार रुपये लोक वर्गणी गोळा करून विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड युनिफॉर्म पतसंचलन किट ते राज्यपाल पुरस्कार फीस आणि जाणे-येणे प्रवास खर्च लोक वर्गणी गोळा करून विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरले. संस्थेचे माजी सचिव कै.स्वा.से. चंद्रशेखर बदोले त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सूनबाई सौ पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले यांच्यातर्फे ६ हजार ५०१ रुपये तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष कै. गोपाळराव अण्णाराव पाटील त्यांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ सुपुत्र राजाराम गोपाळराव पाटील यांच्यातर्फे ६ हजार ५०१ रुपये तसेच इतर मान्यवराकडून लोकवर्गणी गोळा करून विद्यार्थ्यांना राज्यपाल पुरस्कार परीक्षा बसवण्यासाठी युनिफॉर्मची कमतरता होती. पालकांच्या आर्थिक अडचणामुळे तीन हजार रुपये खर्च करणे शक्य नसल्यामुळे स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव यांच्या पुढाकारातून लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक मदत घेऊन स्काऊट गाईड युनिफॉर्म आणि इतर खर्च गोळा करण्यात आले. यामध्ये मोठा पुढाकार पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त अवस्था व खर्च टाळून वाढदिवसा वरती होणारा खर्च स्काऊट गाईड विभागास देण्याचे मानस व्यक्त केले.

राजाराम पाटील यांच्या वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांनी पण आर्थिक मदत केले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र माशाळे, ज्योती आमले, सूर्यवंशी, पूजा बदोले, संजय पाटील, बसवराज कुंभार, शिवपुत्र बोळशेट्टे, पाटील यासह माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## कैलास पाटील पुन्हा आमदार होणार नाहीत तोपर्यंत पायतान घालणार नाही : साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

आमदार कैलास पाटील हे अतिशय प्रभावी नेतृत्व असल्याचे धाराशिव व कळंब मतदार संघातील सर्व जनतेने पाहीले आहे. विकास कामांसाठी त्यांचीच पुन्हा गरज आहे. ते पुन्हा जोपर्यंत आमदार होणार नाहीत तोपर्यंत मी पायतान म्हणजे चप्पल किंवा बूट घालणार नसल्याचा दृढ संकल्प शिवसेना (ठाकरे) चे प्रशांत साळुंके यांनी आई येडेश्वरी मातेसमोर केला असल्याचे साळुंके यांनी सांगितले.

पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, गेल्या पंचवार्षिक निवडणुकी दरम्यान कैलास पाटील हे आमदार व्हावेत यासाठी येडेश्वरी मातेला धाराशिव ते येडेश्वरी चालत जाण्याचा व अजमेर येथील शरीफ दर्यास चादर चढविण्याचा नवस केला होता.

ते आमदार झाल्यानंतर अजमेर येथील शरीफ दर्यास चादर चढविण्यासह येडेश्वरी मातेला पायी चालत जाऊन नवस फेडल्याचे त्यांनी सांगितले.

# पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधांसह दर्जेदार निवासस्थानासाठी प्रयत्न करणार

## आ. कैलास गोरंटयाल यांची शिष्टमंडळाला ग्वाही

**तभा वृत्तसेवा**

**जालना / प्रतिनीधी** - जनतेच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सुविधांसह दर्जे दार निवासस्थान उपलब्ध करून देण्याबरोबरच शहरातील सदर बाजार आणि चंदनझिरा या दोन पोलिस ठाण्यांना नवीन इमारत बांधकामासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल अशी ग्वाही आ. कैलास गोरंटयाल यांनी पोलिस मित्र युवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नितीन जैस्वाल आणि शिष्टमंडळाला दिली. जालना शहरातील रामनगर परिसरात असलेल्या पोलिसांच्या शासकीय निवास्थानांची झालेली दुरावस्था तसेच शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे आणि चंदनझिरा पोलीस ठाण्यासाठी नवीन जागेसह नूतन इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी पोलिस मित्र युवा महासंघाच्या शिष्टमंडळाने आ. कैलास गोरंटयाल यांच्याकडे आज सोमवारी केल्यानंतर त्यांनी उपरोक्त ग्वाही दिली. यावेळी युवा नेते अक्षय गोरंटयाल यांचीही उपस्थिती होती. जालना शहरतील रामनगर परिसरामध्ये पोलिस कर्मचाऱ्यांसाठी शासकीय पोलीस वसाहत असून तेथे जवळपास ३०० निवासस्थाने ही सुमारे ६४ वर्षांपूर्वी बांधण्यात आली आहेत. याशिवाय चार इमारतीमध्ये ९६ निवासस्थान असून सदरील निवस्थानांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांच्या निदर्शनास आणून देत निवासस्थानाचे छताचे प्लास्टर पडले, भिंती कोसळल्या असून सिमेंटची पत्रे कुजली, सांडपाणी व्यवस्था सतर वर्षे जुनी असल्याने कुचकामी ठरली आहे.



सदर वसाहत परिसरात ज्या चार उभारण्यात आल्या आहेत. तेथील सांडपाण्याचा प्रश्न देखील गंभीर आहे. इमारतीच्या भिंतीवर झाडे उगवली असून इमारतीस कमकुवत करत आहेत. मात्र, या सर्व समस्यांना तोंड देत पोलीस कर्मचारी या वसाहतीमध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहत असल्याचे पोलिस मित्र युवा महासंघाच्या शिष्टमंडळाने सांगितले. पोलीस वसाहतीचे जुने बांधकाम पाडून तेथे आवश्यक त्या सुविधांसह नवीन इमारत बांधकाम करण्यात यावे.

जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाणे हे मध्यवती ठिकाणी असून या ठाण्याला चार पोलीस चोकी संलग्नित आहेत. या पोलीस ठाण्या अंतर्गत असलेली लोकसंख्या सुमारे दोन ते अडीच लाख इतकी आहे. शहरातील सर्वसामान्य जनता आपले प्रश्न घेऊन पोलीस स्टेशनमध्ये येत असतात परंतु जागेच्या अभावाम ुळे पार्किंगची समस्या निर्माण होते.पोलीस ठाण्यात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या व पोलीस ठाण्या अंतर्गत दाखल गुन्ह्यांच्या संख्येचा गांभीर्याने विचार करून सदर बाजार पोलीस ठाण्याच्या जुन्या वास्तूच्या जागी नवीन इमारतीचे बांधकाम करावे,यासोबतच औद्योगिक प्रशिक्षण संस्था परिसरामध्ये पोलीस ठाण्याला नवीन जागा उपलब्ध करून तेथे पोलिसांसाठी नवीन इमारतीचे निर्माण करावे, अशी मागणीही य शिष्टमंडळाने आ. कैलास गोरंटयाल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली.

# भारतीय जनता पार्टी जालनाकडून चंदनझिरा येथील घटनेचा निषेध



**तभा.वृत्तसेवा**

**जालना / प्रतिनिधी** - भारतीय जनता पार्टी च्या वतीने जालना येथील चंदनझिरा येथे एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर घटनेच्या निषेदार्थ संबंधित आरोपीवर तात्काळ कारवाही करण्यासाठी भाजप जालनाकडून पोलीस अधीक्षक, जालना यांना निवेदन देऊन तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

जालना जिल्ह्यातील चंदनझिरा भागात काल रात्री काही नराधमांनी एका नऊ वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून मारहाण केल्याची घटना मनाला वेदना देणारी आहे. चंदनझिरा प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विमल ताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, सतीश जाधव, संध्याताई देठे, शिवराज जाधव, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, वसंत जगताप, सुहास मुंडे, सुनील पवार, संजय डोंगरे, सोमनाथ गायकवाड, बद्री भसांडे, दत्ता जाधव, महेश मुळे, कृष्णा गायके, योगेश लहाने, निवृत्ती लंके, बद्री वाघ, छबुराव राठोड, गंभीर पडोळ, अनिल सरकटे, शांतीलाल राऊत, सुनील तरासे, ऋषी आदमने, अरुण वाघ्रुळकर, शिवराम राजपूत, अशोक पारे आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### स्मशानभूमी संरक्षण भिंतीचे अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**

**जालना / प्रतिनिधी**- लक्कलकोट परिसरातील अहिर गवळी समाज बाळ स्मशानभूमी संरक्षण भिंतीचे शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर ,फेरोज लाला तांबोळी ,विष्णू पाचफुले ,मेघराज चौधरी,विशाल बनकर, प्रभुलाल गोमतीवाले, नरेंद्रकुमार जांगडे , ड.हरिश्चंद्र चौधरी ,गोपाल काबलीये, दिनेश भगत, धनराज चौधरी ,विशाल दिपवाल, नितीन जांगडे ,वैभव दिपवाल, धनेश चौधरी ,रूदेष चौधरी यांच्या सह समाज बांधवांची उपस्थिती होती. स्मशानभूमीच्या विकासासाठी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अहिर गवळी समाज बांधवांनी अर्जुनराव खोतकर यांचे आभार मानले.

### प्रियंका घुले हिचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**जालना / प्रतिनिधी** - मौजे वखारी येथे कुमारी प्रियंका अशोकराव घुले पाटील यांची नागपूर कारागृह पोलीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल माननीय भास्कर आबा दानवे जालना विधानसभा प्रमुख यांच्या हस्ते प्रियांकाचा सत्कार करण्यात आला तसेच यावेळी वखारी येथील दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायतीच्या वतीने किराणा मालाचे वाटप करण्यात आले, यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायकजी मुळे, कैलास उबाळे, वखारी सरपंच सत्यभामा ताई घुले, उपसरपंच संदीपजी बोरुडे, ग्रामपंचायत सदस्य विष्णू घुले, ग्रामपंचायत सदस्य मीनाताई शिंदे, काकासाहेब घुले, निवृत्ती लंके, तंटामुक्ती अध्यक्ष हरिभाऊ घुले, उत्तम भाऊ घुले, विक्रम खैरे, रघुनाथ महाराज देशपांडे, ज्ञानदेव भाऊ खैरे, भुजंगराव घुले, देविदास मोठे, रघुनाथ घुले, भरत घुले, प्रभाकर घुले, गजानन घुले, श्रीराम घुले, प्रल्हादभाऊ घुले, सिद्धेश्वर घुले, संदीप घुले, दामोदर घुले, अशोक घुले, लक्ष्मण घुले, आसाराम भाऊ घुले, रंगनाथ खैरे, बाबुराव मोठे, बाबासाहेब खैरे, पंडित मोठे, वैजनाथ घुले, भास्कर घुले, महेश घुले, शिवम घुले यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मंडळ व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहा वर्षातील विकास कामाचा विचार करूनच येणाऱ्या काळातील लोकप्रतीनिधी निवडावा -आ.दानवे

## पारध येथे विविध विकास कामाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**पारध / प्रतिनिधी** - भोकरदन तालुक्यात जनतेनी माझ्यावर टाकलेला विश्वास हा मी कधीच वाया जाऊ देणार नाही.निवडणूक काळात विकास कामाचा दिलेला शब्द आता पुर्णत्वाकडे जात असल्याने समाधान वाटत आसुन सध्या मतदारसंघात चौफेर विकास कामे



प्रगतीपथावर सुरु आहे.येणाऱ्या काळात दहा वर्षातील विकास कामे पाहुनच जनतेने आपला लोकप्रतिनीधी निवडावा' असे आवाहन आमदार संतोष दानवे यांनी केले.

भोकरदन तालुक्यातील पारध बू.गुरुवारी विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा म ाजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत तरआ.संतोष दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळी पुढे बोलताना आ.दानवे म्हणाले की,विकास कामाच्या बळावरच देशात भाजपा सरकारच विराजमान झाले. आता राज्यात पुन्हा होणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.त्यामुळे कार्यकर्तांनी मनात कुठलीही शंका न ठेवता जोरात कामाला लागुन सर्वसामान्य नागरिकांचे कामे अग्रक्रमांकाने करावे असे आवाहन आमदार संतोष दानवे यांनी यावेळी व्यक्त केले. दरम्यान या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष राजेद्र देशमुख,कृ.ऊ.बा.सभापती कौतीक जगताप,माजी सभापती परमेश्वर लोंखडे,पचांयत समिती सदस्य गणेश लोंखडे यांच्यासह सुखलाल बोडखे,माजी सरपंच गणेश लोखंडे ,रामेश्वर सा.कारखान्याचे संचालक संजय लोखंडे, भाजपा नेते दिलीप बेराड,संजय चंदनसे,विजय मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आमदार दानवे म्हणाले की आपण मतदारसंघातील विकास कामे करण्याचा वसाच घेतला आसुन आज ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्या वरील रस्त्याचे व जलसिंचनाचे भरघोस कामे सुरु आहे.होत असलेल्या रस्ते विकास व जलसंधारण कामाम ुळे दळणवळणाचा व जलसिंचनाचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.दरम्यान आपण गावातील कुठल्याही लहान गोष्टीत राजकारण करीत नाही तर गावातील विकासावर राजकारण करीत असल्याचे मत देखील दानवे यांनी यावेळी व्यक्त केले.माझ्या दहा वर्षातील मी केलेली विकास कामे व मागील तत्कालीन आमदाराने बारा वर्षाच्या काळात केलेली विकास कामे एकाच तराजुत घेऊन बघा कुणाचे पारडे जड वाटते हे पाहुनच येणाऱ्या काळात भारतीय जनता पार्टीचा उमेदवार निवडून द्या असे आवाहन देखील आमदार दानवे यांनी यावेळी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे नेते व कार्येकर्ते हे फक्त चाटा मारण्यात पटाईत आसुन यांना विकासकामाशी काहीही घेणे देणे नसल्याची टिका देखील दानवे यांनी केली.या कार्यक्रमात दानवे यांच्या हस्ते लाडक्य बहिणीने राख्या बधून सत्कार केला आली.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पारध येथील भाजपाचे नेते देवेंद्र लोखंडे शिवा लोखंडे पवन लोखंडे सुनिल बेराड गणेश तेलंग्रे.आदींनी परिश्रम घेतले. यावेळी भाजयुमोचे कार्यकर्ते व परिसरातील भाजपा कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन महेंद्र लोखंडे यांनी केले.

### खोतकरावर साधला निशाना

पारध येथे काही वर्ष आधी पारध ते धामणगाव रोड करणार होते पण फक्त बोलून विकास कामे होत नाही तर ते करावे लागतात .माञ नुसत्या सभेत बोलून चालत नाही तर त्याला प्रत्यक्ष करून दाखवावे लागते असा खोचक टोला दानवे यांनी खोतकरांना लगावला.

# भोकरदन विधानसभा मतदार यादीतील नावे बोगस आयडी द्वारे वगळणे थांबवावे

## कॉंग्रेसकडुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा



**तभा वृत्तसेवा**

**भोकरदन / प्रतिनिधी** - १०३ भोकरदन विधानसभा मतदार यादीतील नावे बोगस नमुना -७ नंबर फार्म भरुन बोगस आयडी व्दारे बी एल ओ कडे नावे वगळण्यासाठी मागणी करणाऱ्या बोगस आयडी धारकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी यासाठी जालना जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्याकडे अनेक मतदारांनी केली असून जिल्हाध्यक्ष देशमुख यांच्या सुचणेवरून आज भोकरदन उपविभागीय अधिकारी दयानंद जगताप यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात पुढे असे लिहीले आहे की भोकरदन शहरातील व विधानसभेतील अनेक मतदारांचे नावाने बोगस नमुना ७ नंबर फार्म भरुन बोगस आयडीवरून बी एल ओ कडे नावे मागणी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी नसता काँग्रेस कमिटीकडुन तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष इरफान सिद्दीकी, अल्पसंख्याक ता अध्यक्ष एजाज पठाण, रफिक पानवाले,सोशल मीडियाचे सोपान सपकाळ, शेतकरी संघटनेचे काकासाहेब साबळे,करीम लाला कादरी यांची उपस्थिती होती.

## महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी संपुर्ण ताकद लावा - शेखर घोडके

**तभा वृत्तसेवा**

**जालना । प्रतिनिधी** - महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेसची संपूर्ण ताकद लावण्याचे पार्टीचे जालना विधानसभा निरीक्षक शेखर घोडके यांनी येथे म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना विधानसभा निरीक्षक शेखर घोडके रविवार (दि १३) जालना दौऱ्यावर होते. यावेळी ते बोलत होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त पत्रके, भित्तीपत्रकासाठी मुद्रणावर निर्बंध

**तभा वृत्तसेवा**

**जालना / प्रतिनिधी** - आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून लवकरच जाहीर केला जाणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने पत्रके, भित्तीपत्रके आदि मुद्रणांचे संनियंत्रणासाठी जालना जिल्ह्यातील सर्व मुद्रणालयाचे लक्ष लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ चे कलम १२७-क च्या आवश्यकतेकडे वेधण्यात येत आहे. अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

कोणत्याही व्यक्तीला, निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रकाच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही. निवडणुकीसाठी असणारी पत्रके, छापील साहित्य यावर प्रकाशक आणि मुद्रक यांची नावे असणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीला निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक ती स्वतःच त्याचा प्रकाशक आहे या बद्दलचे त्याने स्वतः स्वाक्षरी केलेले व त्यावर दोन ओळखणाऱ्या व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन मुद्रकास दिल्याशिवाय मुद्रकाने मुद्रण करू नये. दिलेल्या सुचनांप्रमाणे निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक प्रकाशित करणाऱ्या व्यक्तीने कार्यवाही केल्यावर आणि मुद्रकाने मुद्रण केल्यानंतर मुद्रित साहित्याची प्रत जिल्हा निवडणुक अधिकारी जालना तसेच संबंधित निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे पाठवावी. अन्यथा संबंधित मुद्रणालयाचा परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी निवडणूक पत्रक किंवा भित्तीपत्रक याचा अर्थ उमेदवाराच्या प्रचारासाठी वाटण्यात आलेले म ुद्रीतपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किवा निवडणूकीशी संबंधित असा घोषणा फलक किंवा भित्तीफलक असा होतो. जी व्यक्ती उपरोक्त निर्बंधांचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यापर्यंत असु शकेल इतक्या म ुदतीच्या कारावासास किंवा दोन हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र राहिल. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ लढविणारे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच मुद्रणालय चालकांनी सूचनांची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी आयोगाच्या संबंधित निर्देशांचे अवलोकन करावे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



# उसतोड कामगारांच्या कष्टाप्रती समृद्धीची कृतज्ञता; परिवाराचा सतीश घाटगे यांच्याकडून सपत्नीक सन्मान

## जिल्ह्यात पहिल्यांदा झाला ऊसतोड कामगार परिवाराचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**अंबड / प्रतिनिधी** - घनसावंगी तालुक्यातील शेकडो उसतोड कामगारांचा सपत्नीक सत्कार करून त्यांच्या कष्टाप्रती समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व संचालिका सौ. वैशालीताई घाटगे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. घनसावंगी शहरातील नृसिंह मंगल कार्यालयात ऊसतोड काम गारांचा हा सन्मान व कृतज्ञता सोहळा सोमवारी मोठ्या उत्साहात पार पडला. उसतोड कामगारांसाठी असा सोहळा जिल्ह्यात पहिल्यांदा राबवण्यात आला.

उसतोडी करणारे कामगारांचे हात ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्याचा खरा कणा आहे. हे कामगार त्यांच्या कुटुंबासाठी खरे हिरो आहेत. या गरीब घटकांचे सामाजिक बाधीलकी म्हणून आम्ही काहीतरी देणे लागतो, या भावनेतून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील उसतोड कामगार मोठ्या संख्यने सहपरिवार उपस्थित होते. त्यांचा सतीश घाटगे व सौ. वैशालीताई घाटगे यांनी सपत्नीक सत्कार केला. महिला भगिनींना साडी व पुरुषांना टॉवेल- टोपी भेट देऊन त्यांचा सन्मान केला, त्यांच्या कष्टाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या कामगारांच्या प्रत्येक अडचणीत समृद्धी साखर कारखाना उभा असेल, असा विश्वास यावेळी सतीश घाटगे यांनी कामगारांना दिला. या कार्यक्रम ास गोविंद आर्दड, पांडुरंग नाना भांगे, हरीश राठोड, शिवाजीराव कंटूले, रामेश्वर माने, बाबासाहेब हरबक, गणेश खरात यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**पहिल्यांदा झालेल्या सन्मानाने उसतोड कामगार भारावले**

उसतोड कामगाराकडे फक्त कामगार म्हणून पाहिलं जात. परंतु सतीश घाटगे यांनी केलेल्या सन्मान सोहळ्यात केलेल्या सत्काराबद्दल प्रत्येक कामगार भारावून गेला. असा मान सन्मान आमचा कधी झाला नाही. माणूस म्हणून आम्हाला मि ळालेला हा सन्मान आम्ही कधी विसरणार नाही. अशा शब्दात उसतोड महिलांनी आपल्या भावना व्यक्त करत समृद्धी कारखान्याचे आभार मानले.

> उन, वारा, वादळ आणि कडाक्याच्या थंडीत काम करणाऱ्या या कष्टकरी हातामुळे उस उत्पादक शेतकरी आणि समृद्धी साखर कारखाना कष्टकरी गरिबांच्या जीवनात समृद्धी आणत आहे. या कामगारांचे आम्ही देणे लागतो या भावनेतून सर्व उसतोड कामगारांचा सन्मान केला. त्यांच्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी शास्वत प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न समृद्धी कारखाना करणार आहे.
>
> **सतीश घाटगे, चेअरमन समृद्धी शुगर्स**



# किनवटचा उच्चपातळी बंधारा कामधेनु ठरणार: आ. भीमराव केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट,दि. १४ ऑक्टोबर**

प्रत्यक्ष आमदार म्हणून काम करण्यासाठी मला दोन अडीच वर्षाचा कालावधी मिळाला या कालावधीत मी क्षणभरही विश्रांती न घेता झपाट्याने चौफेर विकास साधण्याचा प्रयत्न केला.या भागातील शेतीसिंचन आणि पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन पैनगंगा नदीवरील रखडलेले उच्च पातळी बंधाऱ्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणे आवश्यक होतं. तुमच्या आणि राज्य सरकारच्या आशीर्वादामुळे मी सिंचनाचा मोठा प्रकल्प मार्गी लावला.मला आशा आहे की शेतकरी व जनतेसाठी हा बंधारा कामधेनू ठरेलं असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे. गेल्या दहा-बारा वर्षांपासून रखडून असलेल्या किनवट येथील २०१ कोटी रु च्या उच्च पातळी बांधाऱ्याचे भूमिपूजन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते झाले त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मंचावर भाजप नेते सुधाकर भोयर माजी नगराध्यक्ष ईसाखान सरदार खान, व्यंकटराव नेम्मानीवार,दिनकर चाडावार,सुनील पाटील,अनिल तिरमनवार,वैजनाथ करपुडे पाटील,अशोक नेम्मानीवार बालाजी आलेवार, बालाजी मुरकुटे, संजय सिडाम, आनंद मच्छेवार,श्रीनिवास नेम्मानीवार,संदीप केंद्रे,स्वागत आयनेनीवार, दत्ता आडे,शारदा कन्स्ट्रक्शनचे मोरगे,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. केराम म्हणाले की मला आमदार म्हणून प्रत्यक्ष काम करण्यासाठी जो काही दोन अडीच वर्षाचा कालावधी मिळाला त्या कालावधीत क्षणभरही विश्रांती न घेता दळणवळण, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, विजेचे प्रश्न श्रद्धास्थळाच्या विकासासाठी मी कोट्यावधी रु खेचून आणले.या भागातला शेतकरी शेतमजूर सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी सिंचन क्षेत्राला प्राधान्य देऊन रखडलेले बंधारे मार्गी लावले. वन विभागाच्या काही तांत्रिक अडचणीमुळे किनवटचा बंधारा रखडून होता.या संदर्भात मी सातत्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरवा केला आणि यश मिळाले. जे पंधरा वर्षात घडलं नाही ते मी



दोन-तीन वर्षांत करून दाखविले. माझ्या काळात २ हजार ४०० कोटीची पायाभूत विकासाची कामे पूर्णत्वास गेली. केवळ बंधाऱ्यासाठी आतापर्यंत ११०० कोटी निधी मंजूर करून घेतला.रस्त्याबरोबरच वर्षानुवर्षे जीर्ण झालेले व कायम प्रतीक्षेत असलेले जवळपास ४५ लहान मोठे पुल नव्याने बांधून दळणवळणची उत्तम सोय केली.मला प्रसिद्धीची हाव नाही. माझी विकासकामे बोलतात.तुमच्या आणि सरकारच्या आशीर्वादामुळे मी अल्पशा काळात या मतदार संघाचा चौफेर विकास करू शकलो.राज्यातील शिंदे फडणवीस सरकार हे शेतकरी, शेतमजूर, कामगार तसेच महिलांचे हित साधनारे आहे.किनवटचा उच्चपातळी बंधारा शेतकरी व नागरिकांसाठी कामधेनू ठरणार असल्याचे स्पष्ट करत या बंधाऱ्यामुळे बारमाही शेतीसिंचन होऊन पाणीटंचाई प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे असे आ. केराम म्हणाले. माजी नगराध्यक्ष ईसाखान सरदार खान व भाजप नेते सुधाकर भोयर यांनी त्यांच्या मनोगतातुन किनवट माहूर तालुक्यातील विकासकामे व आ.भीमराव केराम यांच्या कार्याचे कौतुक केले. प्रस्ताविकातून जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता शेख सलीम यांनी बंधाऱ्यासंबंधी विस्तृत माहिती दिली. २०१० साली हा बंधारा मंजूर झाला परंतु वन विभागाच्या तांत्रिक अडचणीमुळे गेल्या तेरा चौदा वर्षांपासून काम रखडले होते. परंतु आमदार भीमराव केराम यांच्या अविरत पाठपुराव्यामुळे तसेच जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार मुख्य अभियंता श्री गवळी यांच्या कर्तव्यदक्षतेमुळे हा पाणी प्रकल्प अखेर मार्गी लागला. बंधाऱ्याची मूळ किंमत २०१ कोटी रु असून १३ दरवाजे आहेत. बंधाऱ्याची पाणी साठवणूक क्षमता १०.६० दलघमी इतकी आहे. कामपूर्ण करण्याचा कालावधी तीन वर्षाचा असला तरी मुदतीच्या आत दर्जेदारपद्धतीने काम पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरीनाथ ठाकरे यांनी केले तर भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले. भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला महायुती सरकारमधील भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच किनवट शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त

### रावी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**मुखेड**- तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरातील रावी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आले आहे. वै.ह.भ.प. श्री. गुरूवर्य धोंडोपंत दादासाहेब व वै.ह.भ.प. श्री संत पिराजी महाराज यांच्या ७२ व्या पुण्यतिथी निमित्त १४ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत साजरा



होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या दैनंदिन कार्यक्रम रोज सोमवार सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वर पारायण, सकाळी ११ ते १ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन, रात्री १२ ते ४ हरिजागर होईल पहाटे ४ ते ६ काकडा आरती होईल असे दैनिक कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले आहे. १४ ऑक्टोबर रोजी सोमवारी रात्री ९ वाजता प्रसिद्ध किर्तन व प्रवचनकार .ह.भ.प.श्री. भागवत महाराज चांदेगावकर, ह.भ.प.श्री. एकनाथ महाराज वंटगीरकर, ह.भ.प.श्री. रमेश महाराज सोलापूरकर, ह.भ.प.श्री. संगय्याप्पा स्वामी कंठाळीकर, ह.भ.प.श्री, निवृत्ती महाराज पंढरपूर,ह.भ.प.श्री. अमोल महाराज पल्ले, ह.भ.प.श्री. उमेश महाराज दशरथे (आळंदी देवाची), निवृत्ती महाराज रावीकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. तरी मुखेड तालुक्यातील भावीक भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बितनाळ केंद्रिय मुख्याध्यापक भगवान संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित



**उमरी**-तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भगवानराव संपतवार यांना जिल्हास्तरीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे नांदेड येथिल कुसूम सभागृह येथे जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून जिल्हा शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी मुख्यमंत्री तथा विधेमान राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल होत्या तर प्रमुख शिक्षणाधिकारी डॉ सविता बिरगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, अनिल राठोड, शिक्षण अधिकारी (मा ) माधव सलगर, दिलीप बनसोडे, संतोष सेटकार आदी मान्यवराच्या उपस्थित मुख्याध्यापक भगवान संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्कार सन्मान चिन देवून गौरविण्यात आले. भगवान संपतवार सर बितनाळ जि प केंद्रिय शाळेत मुख्याध्यापक म्हणून रजू झाले पासुन त्यांच्या शाळेचा शैक्षणिक दर्जा उचांवला आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात उमरी तालुक्यात सलग दुसऱ्यांदा नंबर वन क्रंमाक पटकविला असुन जिल्हास्त मुल्यांकनासाठी शाळेची निवड झाली आहे संपतवार सरानी शाळेचे व बितनाळ गावचे नाव रोशन केले आहे . अशोका विजया दशमी दिनी ओ.बी सी समाजाचा तृतीय मेळाव्यात ही आदर्श शिक्षक म्हणून मुख्याध्यापक भगवान संपतवार यांचा गोल्ला गोलेवार समाजाचे नांदेड भुषन नेते नामदेव आयलवाड यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानचिन देवून हि सत्कार करण्यात आला आहे असे अनेक पुस्कार यापुर्वी भगवान संपतवार यांना प्राप्त झाले आहेत मुख्याध्यापक संपतवार यांना जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान झाल्याने बितनाळ गावचे सरपंच प्र मारोती उमाटे, माझी सरपंच प्र मारोती वाघमारे, उपसरपंच प्र देविदास आक्कमवाड, चेअरमन भुजंग पा जाधव, संचालक गणेश आन्नेमवाड, शालेय शिक्षण समिती चे अध्यक्ष नागनाथ घुमलवाड, ग्रा प सदस्य प्र गोंविद पहेलवान बकेवाड, माजी उपसरपंच बालाजी सुर्यवंशी, सुदाम पल्लेलवाड, साईनाथ घोसलवाड ,दत्ताहरी कानगुलकर, पिंटू नागदरवाड, गंगाधर लगदिवे, गणेश कोंडेवाड, पिराजी जिडेवाड, राजू पलेवाड, दिगांबर मंतलवाड, फेरोज सय्यद, साईनाथ तोटेवाड, संभाजी डोगंरे, लक्ष्मण वाघमारे, पत्रकार साहेबराव तुरेराव यासह सर्व गावकरी मंडळी कडून व तालुक्यातुन शिक्षणविभाग आणी विविध स्तरावरून मुख्याध्यापक भगवान संपतवार यांच्या वर अभिनंदना चा वर्षाव व कौतुक होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहराध्यक्षपदी अ‍ॅड. संघरत्न गायकवाड यांची निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोब**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या आदेशाने आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या संमतीने सामाजिक न्याय विभागाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहराध्यक्षपदी अ‍ॅड. संघरत्न गायकवाड यांची नियुक्ती केली आहे. सदर नियुक्तीपत्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते नियुक्ती देण्यात आली.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाच्या नांदेड शहर अध्यक्षपदी निवड केली जावी, याकरिता राष्ट्रवादी ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोनकांबळे, नांदेड शहर राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष फेरोज पटेल यांच्या शिफारशीनुसार प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे यांनी नांदेड सामाजिक न्याय विभागाच्या शहराध्यक्षपदी अ‍ॅड. संघरत्न गायकवाड यांची नियुक्ती केली आहे. नियुक्तीपत्र मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते नाशिक येथे देण्यात आले. यावेळी अ‍ॅड. भीमरत्न कांबळे, सखाराम शितळे यांची उपस्थिती होती.

# हुस्सा येथील शालेय समिती अध्यक्षपदी हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदीप वाघमारे

**तभा वृतसेवा**
**नायगाव,दि. १४ ऑक्टोबर**

नायगाव तालुक्यातील हुस्सा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी बालाजी आनंदराव हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदीप गणपतराव वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.तालुक्यातील हुस्सा येथील जिल्हा परिषदे मध्ये सरपंच गावातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीमध्ये शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी संदर्भात नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकी वेळी शालेय समितीच्या अध्यक्ष पदी बालाजी आनंदराव हंबर्डे तर उपाध्यक्षपदी प्रदिप गणपतराव वाघमारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, पालक वर्गात समाधान व्यक्त करून अध्यक्ष बालाजी हंबर्डे व प्रदिप वाघमारेचा यथोचित पुष्पहाराने सत्कार केला व पुढील कारकिर्दीस यावेळी शुभेच्छा दिल्या. बालाजी आनंदराव पाटील हंबर्डे यांनी मागील काळात अनेक अतिशय निस्वार्थपणे व अविरतपणे शाळेमध्ये सुनियोजित व्यवस्थापन



केले असून त्यांना एकुण चांगलाच अनुभव आहे असे गावकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे त्यांच्या अनुभवाप्रती पुन्हा एकदा बालाजी हंबर्डे यांना संधी देण्यात आली आहे. तर उपाध्यक्षपदी नवनिर्वाचित प्रदीप वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे सदर निवडी दरम्यान बालाजी हंबर्डे व प्रदीप वाघमारे यांचं उपस्थित नागरिकांकडून व शाळेतील शिक्षक वृंदा कडून ही सत्कार करण्यात आला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत .दरम्यान गावातील सरपंच प्रतिनिधी रमेश माली पाटील, मुख्याध्यापक नारे सर, बंडेवार सर, कदम सर, गावातील जेष्ठ नागरिक धोंडीबा रावसाहेब हंबर्डे, नंदकिशोर हंबर्डे, संदीप भगवान गायकवाड, उणकेश्वर हंबर्डे, बालाजी अर्जुन हंबर्डे, रामजी वाघमारे, माधव गायकवाड, यासह उपस्थित होते.

# बांधकाम मजूरांना २०० किटचे वाटप; एकही मंजूर वंचित राहाणार नाही: प्रविण चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा,दि. १४ ऑक्टोबर**

महाराष्ट्र शासनाची योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचली पाहिजे, यासाठी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठीशी ठामपणे उभे रहा असे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी तहसिल कार्यालयांच्या प्रांगणात बांधकाम कामगारांना किटचे वाटप कार्यक्रमांत म्हणाले. तहसिल कार्यालयाच्या पाठीमागील गोदाम परिसरात बांधकाम विभागाच्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांना संसार उपयोगी भांडी किट कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आला होते.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्येक्रम आयोजित केला होता. यावेळी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य माणिकराव मुकादम, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपसभापती रोहीत पाटील आंडगेकर, माजी नगरसेवक भास्करराव पाटील पवार, बंडू पाटील वडजे,माधव पाटील पवारपारडीकर,नारायणयेलरवाड,दिपक पाटील कानवटे, सचिन मुकादम,लोहा पं.स.चे गटविकास अधिकारी डि. के. आडेराघो, घरकुल विभागाचे दिनेश तेलंग,भारत पाटील कदम, आशिष हंबर्डे आदी उपस्थित होती.

विभागीय आयुक्तांना माहित देऊन चर्चा केली.आपला तालुका आगोदर नव्हता आगोदर वाटपासाठी पर्यंत केले.बांधकाम मंत्र्याना भेटुन लोहा -कंधार तालुका वाटपासाठी आगोदर घेण्यासाठी प्रयत्न केले. २०० लोकांना किट मिळत आहे उर्वरित लोकांना तीन चार दिवसानतर मिळेल या किट पासून कुणीही वंचित राहणार नाही सर्वांना मिळतील, राज्यात शासन योजना राबवित आहे. शासन आपली दारी जन सेवा करी आशा संदेश सर्वांपर्यंत पोहचला पाहिजे यासाठी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे् असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक भास्करराव पाटील पवार यांनी केले तर आभार सचिन मुकादम यांनी मानले.

# निराधारांना आधार देण्यासाठी समिती अहोरात्र काम करणार, लाभार्थ्यांच्या तात्काळ खात्यावर अनुदान जमा करा : अध्यक्ष भागवत देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि.१४ ऑक्टोबर**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या माध्यमातून हदगाव तालुक्यातील निराधार पात्र गरजू लोकांना शासनाचे अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाला सोबत घेऊन समिती अहोरात्र प्रयत्न काम करणार व सणासुदीच्या काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या माध्यमातून प्राप्त निराधारांचे अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करावे अश्या सूचना हदगाव तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी बैठकीत प्रशासनाला केल्या आहेत,यावेळी बैठकीला समितीचे सचिव तथा तहसीलदार श्रीमती सुरेखाताई नांदे, सदस्य सर्वश्री बाबुसराव कदम,अमोल पाटील रुईकर,विशाल परभणकर गजानन मस्के श्रीहरी काळे,ओम इंदेवार,नायब तहसीलदार एन.टी तामसकर आदी उपस्थित होते. तालुक्यातील अपंग निराधार विधवा व इतर गरजू लोकांनी एक हजारच्यावर अर्ज शासनाच्या अनुदान लाभ मिळवण्यासाठी



समितीकडे केले आहेत,समितीने शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व अर्ज तपासून पात्र अपात्र लाभार्थ्यांची यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, बैठकीत आलेले सर्व अर्ज समितीने छाननी करून तपासणी केले आहेत, तालुक्यातील एकही गरजू निराधार बांधव शासनाच्या अनुदान लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी समितीच्या वतीने घेण्यात येईल,यावेळी नवनिर्वाचित तहसीलदार श्रीमती सुरेखाताई नांदे यांचे स्वागत समितीच्या वतीने तर प्रशासनाच्या वतीने समितीचे अध्यक्ष व सर्व समिती सदस्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. दसरा दिवाळीच्या निमित्ताने दरमहा शासनामार्फत निराधारांना मिळणारे अनुदान निराधाराच्या तात्काळ खात्यावर वर्ग करावे,व निराधारांची दसरा दिवाळी साजरी करावी अशा प्रशासनाला सूचना बैठकीत अध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिल्या आहेत, तालुक्यातील पात्र नागरिकांनी लाभ घेण्यासाठी स्वतः अर्ज भरून तलाठी ग्रामसेवक मंडळ अधिकारी वैद्यकीय अधिक्षक यांचे प्रमाणपत्र घेऊन सेतू सुविधा केंद्र मार्फत ऑनलाईन व ऑफलाइन अर्ज आपल्या गावातील तलाठी किंवा संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे कर्मचारी अमोल दासरवार यांच्याकडे सादर करावेत असे आवाहन अध्यक्ष भागवत देवसरकर व सचिव श्रीमती सुरेखाताई नांदे यांनी केले आहे.

## वंदना कांबळे यांना आदर्श तालुका स्तरीय गुर गौरव पुरस्कार



**तभा वृतसेवा**
**हदगाव,दि. १४ ऑक्टोबर**

निवघा (बा) जिल्हा परिषद शाळा शिरड येथील शिक्षिका वंदना चांदू कांबळे यांना २०२३ चा आदर्श तालुका स्तरीय गुर गौरव पुरस्कार आमदार माधवराव पाटील जळगावकर यांच्या हस्ते देण्यात आला मिळाल्याबद्दल यांचे अभिनंदन केले मुख्याध्यापक डोके सर बेळगे सर कीर्तनकार मॅडम पत्रकार महेश बोरकर व सर्व शिक्षक शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी यांचे अभिनंदन केले.

## उमरी येथे डाक विभागाची अतिक्रमण हटाव मोहीम

**तभा वृतसेवा**
**उमरी,दि. १४ ऑक्टोबर**

भारतीय डाक विभाग भारत सरकार यांच्या मालकीचे उमरी नगरपालिका हद्दीतील विभागीय प्लॉटवरील अतिक्रमण हटविण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे.उमरी नगरपालिका हद्दीतील डाक विभागाच्या मालकीचे विभागीय प्लॉट नगरपालिका मालमत्ता क्रमांक ७७ आणि ७८ यावरील अतिक्रमण स्वतः हून काढून घेण्यासाठी डाक विभागातर्फे अतिक्रमण धारकांना दि.८ ऑक्टोबर पासून १३ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ध्वनीक्षेपकाच्या



सहाय्याने जाहीर प्रकटनाद्वारे सुचित करण्यात आले होते. परंतु, अद्यापही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढून घेतलेले नाही.त्या अनुषंगाने कार्यवाहीस्तव दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता धडक अतिक्रमण हटाव मोहिमेद्वारे सदरचे अनधिकृत बांधकाम,अनधिकृत शेड डाक विभागाद्वारे नष्ट करण्यात येणार असल्याची माहिती डाक विभागाच्या नांदेड विभागीय कार्यालयाद्वारे देण्यात आली आहे.

# शिक्षक बिघडले तर राष्ट्र बिघडायला वेळ लागत नाही: देवीदास फुलारी

**तभा वृतसेवा**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोबर**

मौजे टेळकी ही शूरवीरांची, हुतात्म्याची आणि स्वातंत्र्य सैनिकांची भूमी असून, येथील शिक्षकही ध्येयाने प्रेरित झालेले आहेत. या परिसरात ज्यांनी ज्यांनी शैक्षणिक क्रांती केली त्यांचा हा होत असलेला सन्मान म्हणजे एका अर्थाने राष्ट्राचा सन्मान होय. कारण शिक्षक बिघडले तर राष्ट्र बिघडायला वेळ लागत नाही, असे प्रतिपादन साहित्यिक देवीदास फुलारी यांनी केले.

क्रांतीची भूमी असलेल्या मौजे टेळकी ता.लोहा येथे गुरु गौरव सोहळा आयोजित केला होता. या गुरु गौरव सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष बालासाहेब हंबर्डे तर प्रमुख पाहूणे म्हणून साहित्यिक महेश मोरे व रामकृष्ण शेळके हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, नांदेड जिल्ह्याचे पहिले खासदार शंकररावजी टेळकीकर, पहिले आमदार गोविंदरावजी मोरे, पहिले कृषी सभापती आनंदरावजी मोरे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. जि.प.प्रा. शाळा टेळकी या ज्ञानालयात गुरुजींचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी देवीदास फुलारी यांनी गुरुजनांच्या शैक्षणिक समर्पणाबद्दल त्यांना धन्यवाद दिले व त्यांनी केलेले कार्य याचाच हा परिपाक म्हणून त्यांचा येथोचित सन्मान या ठिकाणी गावकऱ्यांच्या वतीने केला जातो आहे, याची जाणीव करुन दिली. या गुरुजनांच्या हातून अनेक विद्यार्थी उच्च पदावर गेले आहेत. न्यायाधीश,



डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर, विद्यापीठीय कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, वीज वितरण अशा व इतर सर्वच क्षेत्रात कार्यरत असणारे विद्यार्थी आहेत. आज ज्यांनी हा या ज्ञानवंतांचा सोहळा घडवून आणला त्यांनाही धन्यवाद दिले. तसेच यावेळी साहित्यिक महेश मोरे यांनी नीतिमूल्य जोपासणाऱ्या कविता सादर केल्या. ही शाळा परिसरातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना हेवा वाटावा अशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. या शाळेतील सर्वच शिक्षक हे सॉक्रेटिस निर्माण करणारे आहेत, असा त्यांचा गुणगौरवही करीत मोरे यांनी आपल्या अभंगातून वारकऱ्यांसमोर पंढरपूरचा विठ्ठल साक्षात उभा केला. शाळेतील माजी शिक्षक वी.रा. शिंदे आणि चंद्राकात लामदाडे यांनीही मनोगतात व्यक्त केले. लामदाडे यांनी गावातील विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाविषयी केलेले मार्गदर्शन आणि गावकऱ्यांचे माझ्यावर असणारे प्रेम याबद्दल मनोगत व्यक्त केले. गुरु गौरव प्राप्त शिक्षिका सविता कदम आणि सेवानिवृत्त शिक्षक नंदकुमार वैजनाथराव भाजीभाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रामुख्याने जोशी मेडेवार, अंकुशराव मोरे, कटकमवार, भगवानरावजी मोरे, रमेशरावजी इंगोले, सुरेश बडुरवार, प्रकाश पांपटवार, जामकर, श्रीमंगले, शिरसाळकर, पंदनवाड, अस्टुरे, सौ. पुठेवाड, सौ. पाटोदेकर, सौ.पारशेवार, चंद्रकांत लामदाडे, शैलेंद्रकुमार नरंगले, सोळंके, चौडेकर (मु.अ.), बालाजीराव धोंडगे, वाघमारे, गायकवाड, राठोड, इंदुरकर, अशोक मोरे, जाधव (मु.अ.), कोटलवार, देशपांडे, हमगे, गुट्टे, हाके, खेराव, कामठेकर मॅडम, गोसावी मॅडम, लक्ष्मण मोरे, दिलीप गोरे, दिलीप मोरे, पंजाब मोरे, सचिन मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन मोरे यांनी केले, तर आभार देशपांडे यांनी मानले आणि या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमासाठी सर्वच कर्मचारी, गावकरी यांनी परिश्रम घेतले.

# गुरुद्वारा कर्मचाऱ्यांना ३ टक्के इंक्रीमेंट मंजूर

## गाडीवाले यांची मांगणी मान्य ; कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**तभा वृत**
**नांदेड,दि. १४ ऑक्टोबर**

स. जर्नेल सिंघ भुजंग सिंघ गाडीवाले महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवाटी काँग्रेस पार्टीचे सिख समाज सेल चे राज्य प्रमुख तथा माजी सदस्य-प्रशासकीय समिती, नांदेड यांनी गुरुद्वारा बोर्ड प्रशासनाला निवेदन सादर करुन विनंती केली होती की, गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यानां या वर्षाचे इंक्रीमेंट लागू करावे, प्रशासकांनी ही मागणी मान्य केली यामुळे गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या बाबत अशी माहिती आहे की, गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे तत्कालिन प्रशासक साहिब यांनी गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करून प्रति वर्ष जुलाई मध्ये बेसिकचे ३% इंक्रीमेंट देण्या सबंधी ठराव पारित केला आहे. हे इंक्रिमेंट लागू करण्याचे अधिकार अधीक्षक गुरुद्वारा बोर्डास दिलेले आहे. परंतु गुरुद्वारा बोर्डाच्या कर्मचाऱ्यांना प्रति वर्ष जुलाई मध्ये हे इंक्रीमेंट लावले जात नहीं. या करिता स. जर्नेल सिंघ गाडीवाले यानी गुरुद्वारा सचखंड साहिब चे मा. प्रशासक साहिब डॉ विजय सतबीर सिंघ यानां निवेदन देऊन विनंती केली की रोकलेले ३% इंक्रीमेंट माहे जुलाई २४ पासून लागू करण्यात यावे.

गाडीवाले यांच्या मागणीवर डॉ. विजय सतबीर सिंघ माजी सनदी अधिकारी तथा प्रशासक साहिब, नांदेड यांनी याबाबत सहानुभुतीपूर्वक विचार करुन दिनांक १३ अक्टोबर रोजी ही मागणी मान्य करुन गुरुद्वारा बोर्डाच्या सर्व कर्मचाऱ्यांना १ जुलाई २०२४ पासून ३% इंक्रीमेंट लागू करण्याचे आदेश पारित केले. गुरुद्वारा बोर्डाचे जवळपास १२०० स्थाई कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यामुळे गुरुद्वारा सचखंड साहिब परिसरात व गुरुद्वारा बोर्ड कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी डॉ. विजय सतबीर सिंघ प्रशासक गुरुद्वारा सचखंड साहिब, नांदेड, स. जसवंत सिंघ जी बॉबी, स जर्नेल सिंघ गाडीवाले यांचे व यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वोच आभार व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## गोळीबार सराव, सतर्कतेचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका) :- ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस अंमलदार व अधिकारी यांचा दि.१४ ते २५ ऑक्टोंबर या कालावधीत पडेगाव येथील फायरबट येथे वार्षिक गोळीबार सराव होणार आहे. तरी फायरिंग बट हद्दीतील लोकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांनी केले आहे.

## भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका):- काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकट्याने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म- मृत्यू इत्यादी ठिकाणी, सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म-मृत्यू प्रसंगी जाऊन पैशांची मागणी करतात. तसेच ट्रॉफिक जंक्शन, रोडवर इ. विविध ठिकाणी फिरत आहेत आणि वाहनचालक आणि इतर जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना त्रास देऊन पैसे देण्यास भाग पाडत आहेत, याची पोलीस प्रशासनाचे गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे उपद्रव रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये अन्वये पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येत्या ९ डिसेंबर पर्यंत असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अनु.जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांचा दौरा

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका):- अनु.जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम हे गुरुवार दि.१७ रोजी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे – गुरुवार दि.१७ रोजी सकाळी ११ वा. आढावा बैठक अनु.जमाती कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्याच्या बाबत व बौद्ध लेण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय येथे बैठक.

दुपारी १२ वा. आयुक्त महानगरपालिका यांच्यासोबत अनु.जातीच्या योजनांबाबत व लाडपागे नियुक्ती व प्रलंबित प्रकरणाबाबत आढावा बैठक व बौद्ध लेणी येथे भेट.

दुपारी २ वा. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांच्यासमवेत अनु. जाती जमातीच्या लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची आढावा बैठक. दुपारी ३ वा. एकात्मिक आदिवासी विकास अधिकारी, यांच्या अधिनस्त असलेल्या विविध योजनांची आढावा बैठक. दुपारी ४ वा. अनु.जातीच्या विविध संघटनेसोबत चर्चा व निवेदन स्विकारणे.

# भाषा संपल्यास आपले अस्तित्व शून्य : केंद्रीय मंत्री रिजिजू

## अभिजात भाषा गौरव सोहळा उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : कोणतीही भाषा फक्त बोलण्यापुरतीच मर्यादित नसते, तर ती आपली ओळख दृढ करते. भाषा संपल्यास आपले अस्तित्व उरत नाही, असे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी केले.

साहित्य भारती, समरसता साहित्य परिषद, विवेक विचार मंच, विद्यापीठ विकास मंच आणि सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात रिजिजू बोलत होते.

रविवारी, १३ रोजी सायंकाळी औरंगपुऱ्यातील गोविंदभाई श्रॉफ सभागृहात मराठी व पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानिमित्त आयोजित अभिजात भाषा गौरव सोहळ्यात साहित्यिक नामदेव कांबळे, खासदार डॉ. भागवत कराड, भदंत चंद्रबोधी, डॉ. अशोक सरवदे आणि दत्ता जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री रिजिजू म्हणाले, आक्रमकांनी इथली संस्कृती, भाषा चिरडली. ९०० वर्षे हा देश गुलामीत होता. पण, १९४७ नंतरही मराठी, पाली अशा समृद्ध भाषांना अभिजात दर्जा मिळाला नाही. कशामुळे हा विलंब झाला असेल, असा प्रश्न पडतो. यातून आपली संकुचित मानसिकता दिसते. भारतीय लोक इंग्रजी हौसेने शिकतात आणि बोलतात. पण, अनेक देश स्वत:ची भाषा अभिमानाने मिरवतात. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने भाषा, संस्कृतीला पाठबळ दिले जात आहे.

बुद्धांचे विचार पालीत

भदंत चंद्रबोधी म्हणाले, भगवान गौतम बुद्धांचे विचार पाली भाषेत आहेत. पाली भाषेवर २५६ पेक्षा अधिक व्याकरण ग्रंथ आहेत. एवढेच नव्हे तर भारताचा इतिहासही पाली भाषेत मांडलेला आहे. जंबुद्विपात पाली बोलली जात होती. पालन, रक्षण करणारी भाषा म्हणून पाली ओळखली जाते, असे डॉ. अशोक सरवदे म्हणाले.

यावेळी डॉ. भागवत कराड यांनी संसदेत मराठी भाषेत केलेल्या भाषणाची आणि साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी नुकत्याच मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या भाषणाची चित्रफित दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश अंकुश यांनी, तर डॉ. प्रसन्न पाटील यांनी आभार मानले.

## ट्रॅक्टरचा धडकेत कामगाराचा मोडला पाय

वाळूज महानगर: कारखान्यातून शिफ्ट संपल्यानंतर घराकडे जाणाऱ्या एका कामगाराला ग्रामपंचायतच्या ट्रॅक्टरने धडक देऊन पाय मोडला आहे याविषयी कामगाराच्या तक्रारीवरून एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामराई येथील दिपक प्रल्हाद माडवकर वय २४ वर्ष हे जोगेश्वरी येथील एका कारखान्यात काम करून त्यांच्या प्लेटिना कंपनीच्या मोटरसायकल क्रमांक एम एच २० जीएन ०४२९ वरून घराकडे जात असताना रामराई रोड जवळ नंबर नसलेल्या ग्रामपंचायतच्या ट्रॅक्टर चालकाने भरधाव वेगात ट्रॅक्टर चालवून कामगाराच्या मोटरसायकलला जोराची धडक देऊन जबर जखमी केले तसेच घटनास्थळी न थांबता पळून गेला. या अपघातात कामगाराच्या डाव्या पायाचे मांडीचे हाड मोडले असून घाटीमध्ये उपचार घेत आहे. कामगाराच्या तक्रारीवरून सदर ट्रॅक्टर चालकाविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो कॉ. तांदळे हे तपास करत आहेत.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आगमन व स्वागत



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (जिमाका) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आज दुपारी ४ वाजेच्या सुमारास येथील विमानतळावर आगमन झाले. प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, आ. प्रदीप जैस्वाल तसेच विभागीय आयुक्त दिलीप गावडे, मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार,अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे आदी उपस्थित होते. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे हे कुंभार पिंपळगाव ता. घनसावंगी जि. जालना येथील कार्यक्रमासाठी हेलिकॉप्टरने रवाना झाले.

## धनगर अनुसूचित जमाती आरक्षणाची अमंलबजावणी करा

# सकल धनगर समाजाचे पुंगी बजाओ आंदोलन



छत्रपती संभाजीनगर : धनगर जमातीच्या अनुसूचित जमाती आरक्षण अंमलबजावणी शासन निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत मंजूर करावी. अशी मागणी आज सकाळी वसंतराव नाईक चौक येथे सकल धनगर समाजाच्या वतीने पुंगी बजाओ आंदोलनातून केली.

धनगर जमात ही रानावणात राहणारी मेंढपाळ मजुरी करणारी जमात असून या जमातीचा, मुद्रांक शुल्क माफी कायदा, वनहक्क कायदा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, अनुसुचित जमीनीबाबत कायदा, सर्वात महत्वाचे ऍट्रॉसीटी कायदा या ५ कायद्यामध्ये अनुसची ३६ वर स्पष्टपणे धनगर असा उल्लेख असून देखील पूर्वज अशिक्षित अथवा कमी शिकलेले असल्यामुळे त्यांना ते कायदे माहीती झाले नाही. त्यामुळे गेली ७८ वर्ष धनगर जमातीवर आरक्षणाचा अन्याय झाला आणि या जमातीला अनुसुचित जमाती, एस.टी. आरक्षणापासून दूर ठेवले. परिणामी आज धनगर जमातीचे मुले उच्च शिक्षणापासून वंचीत आहेत. त्यामुळे धनगर जामतीला मंत्रीमंडळाच्या निर्णयाकडे मोठ्या आशेने पाहत आहे. १५ सप्टेंबर रोजी १५ दिवसात शासन निर्णय करण्यात येईल. असे आश्वासन धनगर जमातीला पंढरपूर येथील उपोषणकर्त्याला दिले. दिलेली मुदत संपल्यानंतर मंत्रीमंडळाच्या दोन बैठका झाल्या पण त्यामध्ये धनगर आरक्षण अंमलबजानीचा शासन निर्णय झाला नाही. लवकरच आचारसंहिता लागणार आहे. त्यामुळे धनगर आरक्षणाचे भिजत घोंगडे पडू नये अशी अपेक्षा धनगर जमातीची आहे. त्यामुळे लवकरात लवकर मंत्रीमंडळाची बैठक घेवून एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी शासन निर्णय मंजूर करावा. अशी मागणी पुंगी बजाओ आंदोलन करून सकल धनगर समाजाच्या वतीने केली.

# मुलीची छेड का काढली विचारताच नशेखोरांकडून दगडफेक

## गुन्हा दाखल, दोघांना अटक, दहा आरोपींचा पोलिसांकडून शोध

छत्रपती संभाजीनगर : घराच्या गॅलरीत उभ्या दोन मुलींच्या अंगावर लेझर लाईट चमकवल्या प्रकरणी मुलींच्या कुटुंबातील सदस्यांनी जाब विचारल्याने नशेखोरांनी जुना मोंढा परिसरातील भवानीनगरमध्ये रविवारी रात्री साडे अकरानंतर धुडगूस घालत मोठ्या प्रमाणावर दगडफेक केली. त्यामुळे अफवांचे पेव शहरात पसरून तणाव निर्माण झाला. या प्रकरणी दहा जणांची नावे समोर आली असून त्यापैकी दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. आदर्श सुनकर, कृष्णा गौवरया, या दोन तरुणांना ताब्यात घेतले असून समीर शेख, फेजल शेख, रिहाना शरीफ शेख, सैफियान शेख, महिला शाबिया क्षणो आणि बानू यांच्यासह इतर आठ ते दहा जणांचा (सर्व रा. भवानीनगर) समावेश आहे.

अशोक मारुती थोरात (रा. भवानीनगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार भवानीनगरमध्ये तीन टवाळखोरांनी घराच्या गॅलरीत उभ्या दोन मुलींच्या अंगावर लेझर लाईट चमकवले. त्याचा जाब युवकांना मुलींच्या कुटुंबातील सदस्यांनी विचारला. त्यामुळे टोळक्याने घरात घुसून त्यांनाच बेदम मारहाण सुरू केली. त्यानंतर टोळके आणि त्यांच्या साथीदारांनी मुलींच्या घरावर मोठ्या प्रमाणावर दगडफेक केली. त्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला. मुलींची छेड काढून, घरात घुसून मारहाण आणि नंतर दगडफेक केल्याने नागरिकही संतप्त झाले. ते रस्त्यावर उतरले. यातून मोठा राडा झाला. याची गांभीर्याने दखल घेत घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. दंगा काबू पथक तैनात करण्यात आले. आज सकाळपर्यंत वातावरण निवळले असून, परिसरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस पोलीस अधिकारी करीत आहेत.

अवघ्या २० मिनिटांत मिळवले नियंत्रण

या घटनेची माहिती कळताच अवघ्या २० मिनिटांत पोलीस आयुक्त प्रवीण पवार, उपायुक्त नवनीत काँवत, प्रशांत स्वामी, सहायक पोलीस आयुक्त धनंजय पाटील, रणजित पाटील, सुदर्शन पाटील, मनोज पगारे, संपत शिंदे, पोलीस निरीक्षक निर्मला परदेशी, संभाजी पवार, संदीप गुरमे, अतुल येरमे, सुनील माने यांच्यासह शेकडो पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांनी धाव घेतली. दंगाकाबू पथकालाही पाचारण केले होते. परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यात पोलीसांना यश आले आहे.

कुणीही अफवा पसरवू नका

६६ टवाळखोरांची धरपकड सुरू करण्यात आली. ४ जणांना पहाटेपर्यंत ताब्यात घेतले होते. सध्या ८ जणांची नावे निष्पन्न झाली आहेत. आणखी काही लोक आहेत, त्यांचीही ओळख पटविण्यात येत आहे. दंगा काबू पथक परिसरात तैनात केले असून, पोलीस आयुक्त प्रवीण पवार परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. सध्या परिसरात शांतता आहे. हा एका मोहल्ल्याचा वाद असून, सोशल मीडियावर कुणीही अफवा पसरवू नये. नागरिकांनीही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस उपायुक्त नवनीत काँवत यांनी केले आहे.

## परदेशी पाहुण्यांचे केले पारंपरिक पद्धतीने स्वागत

# आलिशान डेक्कन ओडीसीची तिसरी फेरी

छत्रपती संभाजीनगर : डेक्कन ओडीसीच्या सीजनमधील तिसऱ्या फेरीचे आज सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास आगमन झाले. एकूण १९ पर्यटक घेऊन डेक्कन ओडिसी आली. यावेळी परदेशी पाहुण्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले. अशी माहिती औरंगाबाद ट्युरिझम डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे अध्यक्ष जशवंतसिंग राजपूत यांनी दिली.

आलिशान अशा डेक्कन ओडिसी आता कोरोना काळानंतर नव्या रुपात सज्ज झाली आहे. त्यामुळे या रेल्वेचे आकर्षण आणखी वाढलेले आहे. त्यात सध्या सीजन असल्याने पर्यटक या काळात सर्वाधिक दरवर्षी येतात. त्यात डेक्कन ओडीसीने देखील असंख्य पर्यटक दरवर्षी येतात. सीजनमधील दुसरी फेरी ११ ऑक्टोबरला झाली.

त्यावेळी एकूण ५८ पर्यटक डेक्कन ओडीसीतून आले होते. ११ ऑक्टोबर नंतर आता लगेचच आज सकाळी डेक्कन ओडिसीचे आगमन झाले. सिजनमधील ही तिसरी फेरी असून यात अमेरिकन आणि टर्किश येथून पर्यटक आज शहरात डेक्कन ओडीसीतून आले. एकूण १९ पर्यटक यातून आले. यावेळी त्यांचे पारंपरिक पद्धतीने कलावंतांनी स्वागत करत पारंपरिकतेचे दर्शन घडविले. यावेळी पर्यटकांनी फोटोग्राफी करत आनंद व्यक्त केला. आज दौलताबाद, वेरूळ बघून उद्या अजिंठा या ठिकाणी भेटी देण्यासाठी जाणार आहे.

## फुलचंद काला यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : चाणक्यपूरी येथील राहिवासी खंडेलवाल दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ सदस्य फुलचंद फतेचंदजी काला (वय ९२) यांचे ११ ऑक्टोबर रोजी

वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर प्रतापनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, उद्योजक सामाजिक कार्यकर्ता प्रविन नरेंद्र काला यांचे ते वडील होत. चार मुली, सुना, नांतवडे असा परीवार आहे.

# भाजपाचे अनेक पदाधिकारी ठाकरे गटात



छत्रपती संभाजी नगर : विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांनी तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर संभाजीनगर मधील राजकारण चांगलंच तापल आहे. संभाजीनगर मध्य मधील भाजपा युवा मोर्चा सरचिटणीस अमित घनघाव यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी यांच्या उपस्थितीत ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

यावेळी शिवसेना पक्षसंघटक चेतन कांबळे, उपजिल्हाप्रमुख सुधीर नाईक, सचिन झवेरी, राजू राठोड, पश्चिम तालुकाप्रमुख बाळासाहेब गायकवाड व युवासेना मध्य शहर अधिकारी अजय रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रवेशानंतर राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. भाजपचे पूर्वाश्रमीचे पदाधिकारी अमित घनघाव यांनी या प्रवेशांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भाजपचे पदाधिकारी मंगेश जाधव मंडळ उपाध्यक्ष (अनुसूचित जाती विभाग), सूरज साळवे (वार्ड अध्यक्ष, भीमनगर, भावसिंगपूरा), सामाजिक कार्यकर्ते नितीन इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) अण्णासाहेब बोरगे, अभिजित घनघाव, सुमित जाधव, निशांत साळवे, अनिल पगारे, सचिन गजहंस, विजय सोनवणे, पवन खरात, राहुल तेलगोटे, सतीश दाभाडे, शिवराज सोनवणे, राज थॉमस, किरण दाभाडे व रेखा अंभोरे, आशा अंभोरे, बिजला साळवे, लक्ष्मी जाधव, शारदा भोसले यांच्यासह इतर सहकाऱ्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी यांच्या सामाजिक कामांना प्रभावित होऊन प्रवेश केल्याची माहिती अमित घनघाव व कार्यकर्त्यांनी दिली. एवढ्या मोठ्या प्रमाणात पदाधिकाऱ्यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत ठाकरे गटात प्रवेश केला आहे. येणाऱ्या काळात आणखी काही पक्षांचे पदाधिकारी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करतील अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख किशनचंद यांनी दिली आहे

## जुगार अड्ड्यावर छापा, चार लाखांचा ऐवज हस्तगत

छत्रपती संभाजीनगर : झन्ना- मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्यांवर छापा टाकून पोलिसांनी १४ जणांना पकडले, त्यांच्याकडून अंदाजे ४ लाख २३ हजार २३९ रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई १२ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली. ज्ञानेश्वर शिंदे, बाबासाहेब पवार, प्रमोद साळवे, लक्ष्मण मोटे, प्रशांत साळवे, गणेश चव्हाण, राहुल चव्हाण, शंकर वाघमारे, रणजीत मुकणे, रणवीर निकम, प्रशांत जाधव, फेरोज खान, शिवाजीराव बुट्टे अशी जुगार खेळणाऱ्यांची नावे असुन त्यांच्या विरोधात अंमलीपदार्थ प्रतिबंध विभागाचे उपनिरीक्षक संदीप शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महावितरण छत्रपती संभाजीनगर शहर मंडलाच्या अधीक्षक अभियंतापदी मनीष ठाकरे रुजू



छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता म्हणून मनीष ठाकरे नुकतेच रुजू झाले. ठाकरे हे मूळचे मालेगाव (जि.नाशिक) येथील रहिवासी असून पुणे विद्यापीठांतर्गत धुळे येथील महाविद्यालयातून त्यांनी अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केलेली आहे. तसेच नाशिक येथे एमबीए (सामग्री व्यवस्थापन) व एमबीए (वित्त व्यवस्थापन) या पदव्याही त्यांनी प्राप्त केलेल्या आहेत.

ठाकरे हे १९९७ मध्ये तत्कालिन विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून रनाळा (जि. नंदूरबार) येथे रुजू झाले. २००६ मध्ये सरळ सेवा भरतीत त्यांची अतिरिक्त कार्यकारी अभियंतापदी नाशिक येथे नियुक्ती झाली. २०१३ मध्ये सरळ सेवा भरतीने त्यांची कार्यकारी अभियंतापदी राजगुरूनगर विभाग (जि.पुणे) येथे नियुक्ती झाली. या विभागांतर्गत चाकण औद्योगिक क्षेत्र, तळेगाव औद्योगिक क्षेत्र व लोणावळा पर्यटन क्षेत्र येथे सुरळीत व दर्जेदार विद्युतसेवा देण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केलेले आहे. नाशिक ग्रामीण विभागात विशेष मोहीम राबवून आदिवासी भागांसह सहा तालुक्यात केवळ तीन महिन्यांत दहा हजार घरे प्रकाशमान करण्याची कामगिरी त्यांनी केलेली आहे.

यापूर्वी ते मुंबई येथील महावितरणच्या सांघिक कार्यालयात कार्यरत होते. नुकतीच त्यांची अधीक्षक अभियंतापदी पदोन्नती होऊन छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात नियुक्ती झाली. छत्रपती संभाजीनगर शहरात वीजपुरवठ्याचा दर्जा उंचावणे, ग्राहकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा करणे, वीजगळती कमी करून महसूलवाढीचा प्रयत्न करणे यास प्राधान्य राहील, असे ठाकरे म्हणाले.

## महिलेची आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : रागाच्या भरात महिलेनी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास वाळूज मधील आदर्श कॉलनी) येथे घडली आहे. शीतल समाधान ठाकरे (वय २६) असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. शीतल ठाकरे यांनी १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घरातील बाथरूम मधील लोखंडी अँगलला गळफास घेतला होता. कुटुंबियांनी त्यांना घाटी रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले होते. डाक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

## खट्याळ पिट्या...




# छत्रपती संभाजीनगर मध्ये जगातील अव्वलफ्रीस्टाईल फुटबॉलपटू जेमी नाईट ची कार्यशाळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर : पोदार इंटरनॅशनल स्कूल छत्रपती संभाजीनगर तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रित करण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी छत्रपती संभाजीनगरला प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वातअनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्स पैकी एक आहे.

पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून त्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे होते. जेमी फुटबॉलवरील त्याच्याजबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे, प्रसिद्ध जागतिक ब्रँड्सशी सहयोग केला आहे. २०१७ आणि २०१८ मध्ये बॅक-टू-बॅक णएऋ- चॅम्पियन्स लीग फायनलमध्ये खेळपट्टीवर कामगिरी केली आहे.

यावेळी बोलताना जेमीनाईट म्हणाले, पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दल इतका उत्साह,प्रतिभा आणि आवड आहे हे पाहून खूप आनंद झाला. भारत फुटबॉल खेळात जागतिक खेळाडू बनूशकतो आणि कदाचित फुटबॉल विश्वचषकात लवकरच भाग घेईल अशी मी अशा बाळगतो. मला इथे यायलाखूप आवडले आणि आशा आहे की मी लवकरच परत येईन .पोदार एज्युकेशन नेटवर्कचेसंचालक श्री हर्ष पोदार यांनी विद्यार्थ्यांच्या उर्जा आणि उत्कटतेबद्दल आनंद व्यक्तकेला. जेमी ने आयोजित केलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ध्येयाविषयीफोकस ठेवणे महत्वाचे आहे हे लक्षात आले. ग्रेड्सपेक्षा जास्त या आमच्याविश्वासावर ठाम राहून, आमच्या विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळेतून शिकलेल्या गोष्टींचेअनुकरण करावे अशी आमची इच्छा आहे मग ती शैक्षणिक असो किंवा गैर-शैक्षणिक असो. आम्हालाआशा आहे की आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सुरुवातीच्या काळात अशा रोमांचक संधीत्यांना अखेरीस सर्वात मोठ्या टप्प्यावर देशाचे प्रतिनिधित्व करण्यास मदत करतात.

# घरात घुसून महिलेला जीवे मारण्याची धमकी

छत्रपती संभाजीनगर : जुन्या भांडणाच्या कारणावरुन घरात घुसून महिलेला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी देत दुचाकी जाळल्यानंतर खिडकीच्या काचा फोडल्याची घटना ११ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास पेठेनगरात घडली. आकाश सुनिल कांबळे, अक्षय गंगावणे (रा. प्रबातनगर, भावसिंपुरा) असे महिलेला मारहाण करणाऱ्यांची नावे आहेत. प्रकरणात ४६ वर्षीय पीडित महिलेने फिर्याद दिली. त्यानूसार, पीडित महिला व तिची मुगली घरी असतांना आकाश आणि अक्षय त्यांच्या घरात शिरले व जुन्या भांडणाच्या कारणावरुन पीडितेला शिवीगाळ, मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच तुमचे घर जाळून टाकू, तुमची गाडी जाळून टाकू म्हणत खिडक्यांच्या काचा फोडून दरवाजावर दगड मारले. त्यानंतर दोघांनी पीडितेची स्कुटी (एमएच-२०-एफआर-४००६) पेट्रोल टाकून जाळली. प्रकरणात छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आपली तीर्थक्षेत्रे राष्ट्रीय नकाशावर ठळकपणे मांडण्याचा प्रयत्न

## संत गोरोबाकाकांचे कळंब आयटीआयला नाव : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**




संतांच्या मांदियाळीत ज्येष्ठ अशी ख्याती असलेल्या संतश्रेष्ठ गोरोबाकाकांच्या नामफलकाचे अनावरण करताना एक वेगळीच ऊर्जा आपल्या सर्वांगात संचारली आहे. गोरोबाकाकांची भक्ती आणि तुळजाभवानीची शक्ती, असा अलौकिक संगम म्हणजे आपला धाराशिव जिल्हा. गोरोबाकाकांचे भक्तीपीठ आणि तुळजाभवानी देवीचे शक्तीपीठ देशाच्या नकाशावर अधिक ठळकपणे आणण्यासाठी आपले सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्यातून पर्यटन आणि रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या सर्वांचा मानबिंदू असलेले संतश्रेष्ठ गोरोबाकाकांचे नाव कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला दिले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

रविवारी सायंकाळी कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या नामफलकाचे अनावरण आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. वारकरी सांप्रदायामध्ये वारकरी संप्रदायामध्ये संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. संत, ज्ञानेश्वर, सोपानदेव, निवृत्तीनाथ आणि चिमुकली मुक्ताई संत नामदेवांसह तेर येथे गोरोबा काकांच्या भेटीला आले होते. सर्व संतमंडळीच्या ठायी काकांच्या प्रति असलेला आदरभाव यातून स्पष्ट होतो. मराठी भाषेतील पाहिले विचार संमेलन म्हणूनही या प्रसंगाकडे पाहता येईल. काकांनी त्यांच्या अभंग रचनांमधून व्यापक मानवी कल्याणाची धरलेली आस आपल्या सर्वांसाठी आजही प्रेरणादायी आहे. त्यामुळेच काकांचे नाव कळंब येथील शासकीय अद्योगिक संस्थेला देण्याची विनंती आपण राज्यसरकारला केली होती. त्यानुसार आज काकांच्या नावाच्या फलकाचे आपल्या सर्वांच्या उपस्थितीत अनावरण होत आहे. या अपूर्व क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपल्या सर्वांना लाभल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची संत गोरोबाकाकांवर अतुट श्रध्दा आहे. त्यामुळेच त्यांनी संत गोरोबाकाकांच्या नावाचा सरकारकडे आग्रह धरला. मागील अनेक वर्षांपासून विविध शासकीय निमशासकीय संस्थांना संत, महंतांची नावे द्या, अशी आपण सातत्याने मागणी केलेली आहे. संत, महंतांच्या नावामुळे शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांसोबतच शिक्षणाच्या पावित्र्याची वृध्दी झाल्याखेरीज राहणार नाही. महायुती सरकारने गोरोबाकाकांचे नाव कळंबच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला देवून संत-महंतांप्रति असलेला राज्य सरकारचा आदरभाव त्यांनी नमुद केला आहे. त्यासाठी आमदार पाटील आणि राज्य सरकारचे आपण धन्यवाद मानतो, असे मत अखिल भारतीय वारकरी परिषदेचे अध्यक्ष हभप. प्रकाश बोधले महाराज यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास शिक्षक आमदार विक्रम काळे, हभप. प्रकाश बोधले महाराज, नितीन काळे, अजित पिंगळे, शिवाजी लकडे, विकास बारकुल, शिवाजी गिड्डे, दत्ता साळुंके, अमित शिंदे यांच्यासह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...

## शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज महाविद्यालयांनी तात्काळ सादर करावे

**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

इतर मागास बहुजण कल्याण विभागाकडून व्हीजेएनटी,ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्यासाठी http://mahadbtmahit.gov.in हे संकेतस्थळ २५ जुलै २०२४ पासून सुरू केले आहे. सन २०२४- २५ करिता बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज भरले आहेत व ते अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अद्यापपर्यंत अर्जांची पडताळणी करून सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजण कल्याण या कार्यालयाकडे सादर केले नाहीत.जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी सन २०२४ - २५ करिता आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिन वरती प्रलंबित असलेले व्हीजेएनटी, ओबीसी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे पात्र अर्ज मंजुरीकरीता तात्काळ कार्यालयाकडे सादर करावे. अर्ज सादर करतांना शाळा सोडलेला दाखलाव गुणपत्रक हे मुळ प्रतच असावेत याची दक्षता घ्यावी.ज्या अर्जामध्ये त्रुटी असतील असे अर्ज त्रुटी पुर्तता करुनच कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावेत. महाविद्यालयाच्या लॉगिनला एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही.याची दक्षता घ्यावी.तसेच ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी महाविद्यालय स्तरावरून सूचित करावे.असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक बाबासाहेब अरवत यांनी कळविले आहे.




### मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा अभियान

# भोसले हायस्कुलने पटकावला प्रथम क्रमांक; २१ लाखांचे बक्षीस



## लातूर विभागात सर्व शाळांना टाकले मागे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने मुख्यमंत्री माझी शाळा- सुंदर शाळा अभियान-२ अंतर्गत टप्पा लातूर विभागातून प्रथम क्रमांक पटकावत २१ लाखांचे बक्षीस पटकावले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे पार पडलेल्या शानदार बक्षीस वितरण समारंभात राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व धनादेश आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील डॉ.मंजुळाताई पाटील व प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांना प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्वात मोठी विदयार्थी संख्या असलेल्या मराठी शाळेचे कौतुक राज्य सरकारने केल्याबद्दल संस्थाध्यक्ष सुधीर पाटील यांनी मुख्यमंत्री व शिक्षण मंत्र्याचे आभार मानून राज्यातील मराठी शाळा वाचल्या पाहिजेत, अशी आग्रही मागणी यावेळी केली तर त्यास दुजोरा देत शिक्षणमंत्र्यांनी आपले सरकार यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद केले.

यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक सुनील कोरडे, राजेंद्र जाधव, धनंजय देशमुख, निखीलकुमार गोरे, मोहन शिंदे, विनोद आंबेवाडीकर, कुमार निकम तसेच कार्यालयीन अधिक्षक बालाजी घोलप उपस्थित होते.

# केंद्राच्या ३० एप्रिलच्या परिपत्रकांविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार : अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे खरीप २३ व २४ मधील दीड हजार कोटीचे नुकसान टाळण्यासाठी केंद्राच्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

केंद्र शासनाने लोकसभेची आचारसंहिता सुरू असताना अचानक पणे ३० एप्रिल २४ रोजी एक परिपत्रक काढून महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर अन्याय केला असून ७५ टक्के शेतकरी पिक विमा पासून वंचित राहणार आहे तसेच त्यांनी तयार केलेल्या सूत्रानुसार केवळ पाच ते सहा हजार रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई मिळणार असल्याने जाचक परिपत्रक रद्द करावे यासाठी उच्च न्यायालयात आठवडाभरात याचिका दाखल करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी दिली आहे.

राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे तक्रार देऊन व शांततेच्या मार्गाने आंदोलन करून काहीच फायदा नाही.

या परिपत्रकाविरुद्ध अनिल जगताप यांनी राज्यस्तरीय तक्रार समितीकडे याचिका दाखल केली होती त्याची चार जूनला मंत्रालयात सुनावणी झाली मात्र केंद्राचा विषय असल्याने राज्य शासनाने केंद्राकडे बोट दाखवीत प्रकरण निकाली काढले. त्यानंतर जगताप यांनी हे प्रकरण जनतेच्या न्यायालयात नेत २६ जुलै रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, ९ ऑगस्ट ला तुळजापूर येथे ,तर २० ऑगस्टला उमरगा येथे धरणे आंदोलन केले मात्र त्याचा शासनावरती काही एक परिणाम झाला नाही. शेतकऱ्याप्रती केंद्राची व राज्याची नियत साफ नसल्याने यावर्षी देखील कृषी विभागाने ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकानुसार नुकसान भरपाई देण्याचे ठरवले आहे त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे दीड हजार कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. मंत्र्यांकडून व सत्ताधारी यांच्याकडून आश्वासनाशिवाय शेतकऱ्यांना काहीच मिळाले नाही.

सत्ताधारी आमदार केवळ फोन आला आहे, पत्र दिले आहे एवढेच सांगतात केंद्रीय कृषिमंत्री २१ ऑगस्ट रोजी परळी येथे कृषी महोत्सव निमित्त आले असता त्यांनी दिल्लीत गेल्यानंतर परिपत्रक रद्द करू असे सांगितले मात्र परिपत्रक अद्याप रद्द झाले नाही. केंद्राच्या या परिपत्रकामुळे गेल्या वर्षीपासून शेतकरी त्यांच्या हक्काच्या पिक विमा पासून वंचित राहत आहे केवळ महाराष्ट्रातील एक कोटी सत्तर लाख गेल्यावर्षीच्या व यावर्षीच्या एक कोटी ६५ लाख शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीचा हा प्रश्न असल्याने उच्च न्यायालयात जाण्याचा अनिल जगताप यांनी निर्णय घेतला आहे.

## तेरणात पायथॉन लँग्वेजचे मोफत प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात सर्व विद्यार्थ्यांना डिजिटल स्किल नॉलेज मिळावे या उद्देशाने तेरणा महाविद्यालयात दिनांक. ०७ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत NSCOMM² company ,Pune मार्फत मोफत Python या भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी कंपनीचे कर्मचारी रामा स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यासाठी महाविद्यालयातील संगणक शास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या दोघांची राज्यस्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ ऑक्टोबर -**



लातूर येथे झालेल्या विभागीय योगा स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी गणेश खंडागळे व अजिंक्य खंडागळे या दोघांनी विजय मिळवून यांची राज्यस्तरीय योगा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

तसेच राज्यस्तरीय ज्युडो स्पर्धेसाठी सोनाली होगाडे व भोसले भक्ती या दोन विद्यार्थिनीची निवड झालेली आहे. तसेच दिपक काळे या विद्यार्थ्याची रोलर स्केटिंग राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच धाराशिव येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत सहा कि. मी. धावणे स्पर्धेत चंदाप्पा होगाडे व राधा ममाळे ५ कि.मी. स्पर्धेत विजय मिळवून विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

यशस्वी विद्यार्थ्याचे भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे व सर्व संचालक मंडळांनी कौतुक केले. महाविद्यालयाच्या वतीने यशस्वी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एन. अस्वले, उपप्राचार्य डॉ.व्ही.एस. इंगळे, डॉ.पी.ए. पिटले कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य जी.एस. मोरे व पर्यवेक्षक एस.ए. महामुनी, क्रीडा शिक्षक जी.बी. गायकवाड प्रा. विजय पवार डॉ.आर.एम. सूर्यवंशी प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे, बालाजी खंडागळे उपस्थित होते.

# धाराशिव अनुभवणार राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ऑक्टोबर -**

राज्यस्तरीय शालेय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा (१९ वर्षाखालील मुले व मुली) सन २०२४-२५ चे आयोजन छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय धाराशिव येथे दि.१५ ते १७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान करण्यात आलेले आहे. या राज्यस्तर शालेय स्पर्धेत राज्यातील १९ वर्षे वयोगटातील आठ विभागातील एकूण १६ संघ सहभागी होणार आहेत. राज्य स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील आठ विभागातुन २५० खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक व निवड चाचणीसाठी आठ विभागातुन एकूण ४० खेळाडू, तांत्रिक समिती सदस्य, निवड समिती सदस्य, संघटनेचे प्रतिनीधी व स्वयंसेवक असे एकूण ३५० जण सहभागी होणार आहेत.

राज्यस्तर शालेय हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, लातूर विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, राज्याचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी अंकुश पाटील, राजकुमार दिवटे, राजकुमार दहीहांडे, रविंद्र जानगवळी, गिरजाप्पा दहीहांडे. जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे आश्रयदाते मनथप्पा पाळणे, राजर्षी शाहु शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शशिकलाताई घोगरे, उपाध्यक्ष अविनाशराव देशमुख कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, सचिव धनंजय पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे इ. उपस्थित राहणार आहेत. शालेय राज्यस्तर व्हॉलीबॉल स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ निवडला जाणार आहे. महाराष्ट्र राज्याचा व्हॉलीबॉल संघ निवडण्यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने ५ सदस्यांची निवडसमिती नियुक्त केलेली आहे. निवडला गेलेला महाराष्ट्राचा १९ वर्षाखालील मुलांचा संघ तेलंगाना येथे व १९ वर्षाखालील मुलींचा संघ आंध्र प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी बी.के.नाईकवाडी, कैलास लटके, अक्षय बिरादार, क्रीडा मार्गदर्शक श्रीमती डिम्पल ठाकरे, शुभांगी रोकडे सह सर्व कर्मचारी, धाराशिव जिल्हा हॉलीबॉल संघटनेचे सचिव सचिन पाळणे, सहसचिव संजय देशमुख, छत्रपती शिवाजी हायस्कुलचे मुख्याध्यापक पी.एन.पाटील, यांच्यासह कर्मचारी इ. प्रयत्न करत आहेत. राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा आस्वाद घ्यावा असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# अण्णासाहेब जावळे यांच्या नावाने महामंडळाच्या निर्णयाचा छावा संघटनेच्यावतीने जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**



महायुती सरकारने अण्णासाहेब जावळे यांच्या नावे मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ करण्यासाठी समिती गठीत करण्याचा आज झालेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये घेतला आहे.

या निर्णयाचा अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यावर पुष्पवृष्टी करीत, फटाके फोडून व पेढे वाटून दि.१४ ऑक्टोबर रोजी जल्लोष करण्यात आला.

माहिती सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कै. अण्णासाहेब जावळे यांच्या नावे मराठवाडा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी निर्णय घेतला आहे.

या निर्णयाचे धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने जल्लोष केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, भाजपायुमोचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, माजी उपनगराध्यक्ष अभय इंगळे, छावाचे जिल्हा संघटक अमोल गोरे, सचिव ज्योतीराम काळे, शहराध्यक्ष प्रशांत पवार,

शहर उपाध्यक्ष अमोल मोरे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य खंडू राऊत, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संतोष घोरपडे, अजिंक्य तनमोर, राजकुमार ढोबळे, परमेश्वर माळी, आकाश भोसले, योगेश आतकरे, मनोज शिंदे, व्यंकटेश पडिले, सागर साळुंके, सचिन तोडकरी यांच्यासह मराठा चळवळीमधील विविध संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उध्दवराव दादांचे नाव अनेकार्थाने प्रेरणादायी: आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ ऑक्टोबर -**




केवळ राज्यातच नव्हे, तर देशभरात नैतिक राजकारणाचा मापदंड म्हणून आजही मोठ्या आदराने भाई उध्दवराव पाटील यांचा नामोल्लेख केला जातो. शेतकर्यांचे कैवारी असलेल्या झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांनी केवळ शेती आणि शेतकरी एवढ्यापुरते स्वतःला सिमीत ठेवले नव्हते. जिथे अन्याय, तिथे ते पाय रोवून उभे राहत. स्वातंत्र्याचा लढा, महाराष्ट्र एकीकरण संघर्ष अशा अनेक आंदोलनातून आपल्या न्याय्य हक्कासाठी दादांनी मोठे योगदान दिलेले आहे. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या या संस्थेला त्यांचे नाव दिल्यामुळे अनेकांना त्यातून मोठी प्रेरणा मिळणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

धाराशिव छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांचे नाव अधिकृतपणे जाहीर करण्यात आले. त्यांच्या नामफलकाचे अनावरण ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

भाई उध्दवराव दादांनी स्वयंरोजगाराची कास सर्वसामान्य कुटुंबातील मुलांनी धरायला हवी, असा विचार सातत्याने मांडला. काळाची गरज ध्यानात घेवून मोलमजुरी करणार्या कुटुंबासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा ते आग्रह धरीत. स्वयंरोजगाराच्या अनुषंगाने महत्वपूर्ण असलेल्या या संस्थेला त्यांचे नाव दिल्यामुळे गोरगरीब कुटुंबातील मुलामुलींना मोठी ऊर्जा मिळणार आहे.

दादांच्या प्रभावातूनच आपली जडणघडण झाली आहे आणि एका शासकीय संस्थेला दिलेल्या दादांच्या नामफलकाचे अनावरण आपल्या हस्ते करता आल्याचा आनंद मोठा आहे. राज्य शासनाचे त्यासाठी मनापासून धन्यवाद, अशी भावना ज्येष्ठ शिक्षणतज्ञ एम. डी. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

सामान्य कुटुंबातील मुले या संस्थेत शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या संस्थेला दक्ष प्रकल्पाच्या अंतर्गत २५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. एकीकडे झुंजारसेनानी भाई उध्दवराव पाटील यांचे नामकरण आणि दुसरीकडे हा भरीव निधी असा दुग्धशर्करा योग या निमित्ताने आपल्या सगळ्यांच्या वाट्याला आला आहे.

राज्याच्या आणि देशाच्या सभागृहात उध्दवराव दादांनी केलेली भाषणे आजही अनेक सामाजिक समस्यांवर रामबाण उपाय ठरावित, अशीच आहेत. त्यांच्या कार्याची, व्यापक योगदानाची दखल घेवून शासकीय औद्योगिक संस्थेला त्यांचे नाव देण्याबद्दल आपण विनंती केली होती.

महायुती सरकारने अत्यंत सकारात्मकपणे उध्दवराव दादांच्या एकूण योगदानाची सन्मानपूर्वक दखल घेत धाराशिव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला त्यांचे नाव देण्याचा निर्णय जाहीर केला.

दादांच्या नावाप्रमाणे या संस्थेचा लौकिकही राष्ट्रीय पातळीवर पोहोचल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळे आता दादांचे नाव आणि त्यांचा लौकिक अधिक जबाबदारीने जोपासण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. महायुती सरकारने घेतलेल्या या स्तुत्य निर्णयाबद्दल आपण त्यांचे मनपूर्वक धन्यवाद मानतो, अशा शब्दात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी भावना व्यक्त केल्या.

यावेळी नितीन काळे, देशमुख, मधुकर तावडे, सतीश दंडनाईक, रामदास कोळगे, राजसिंह राजेनिंबाळकर, अभय इंगळे, संदीप इंगळे, पुष्पकांत माळाळे, बिलाल रजवी, गणेश इंगळगी, विनोद निंबाळकर यांच्यासह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

SBI भारतीय स्टेट बँक
शाखा उमरगा (०६७५५ )

दागिन्यांसाठी लिलाव सूचना

आमच्या बँकेकडे दागिने तारण ठेवलेले आहेत/कर्जदाराने खालील कर्जदाराला कायदेशीर नोटीस पाठवूनही सदर सोनेतारण केलेल्या ग्राहकाने सदर सोन्याचे दागिने सोडवून घेतलेले नाहीत. त्यामुळे दिनांक. १८.१०.२०२४ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत कर्जदाराने थकबाकीची परतफेड केली नाही तर तारण असलेल्या दागिन्यांचा लिलाव केला जाईल.दिनांक.१८.१०.२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता

लिलावासाठी अट

१. लिलावात भाग घेण्यास इच्छुक असलेल्यांनी रु.२,४३,७४५ /- तसेच अधिकचा चार्जेस जमा करावेत.दिनांक १८.१०.२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता
२. ज्यांनी लिलावात दागिन्यांसाठी २४३७४५ आगाऊ रक्कम भरली आहे तेच या दरम्यान भेट देऊ शकतात. लिलावाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत आणि दागिन्यांची तपासणी, व्यवस्थापक आणि सोन्याचे मूल्यांकनकर्ता या दोघांच्या उपस्थितीत.
३. दागिने जसे आहेत तसे लिलाव केले जातील आणि लिलाव केलेल्या दागिन्यांच्या गुणवत्तेसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
४. कोणतेही कारण न देता लिलाव नाकारण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार बँकेकडे आहे.
५. हे मृत झालेल्या कर्जदाराच्या कायदेशीर वारसांना लागू होते.

| अ.क्र. | शाखेचे नाव | कर्जदाराचे नाव | खाते क्रमांक | मंजुरीची तारीख | ग्रॅममध्ये वजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा उमरगा | गजानन उद्धव गायकवाड | ४११२०१४९८१३ | १३/०७/२०२२ | ६५.८०/५८.४० |

तारीखः १८/ १०/२०२४
ठिकाणः भारतीय स्टेट बँक शाखा, उमरगा

स्वाक्षरित/-
शाखा व्यवस्थापक,
भारतीय स्टेट बँक शाखा, उमरगा

# राष्ट्रीय पोषण अभियानांत राज्यात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दत मुंबईत सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्ह्याने ११९७ अंगणवाड्यातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख नोदी घेत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांचा मुंबई येथे रविवारी एका विशेष कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

राज्यात महिला व बालकल्याण विभागाच्यामार्फत अंगणवाड्यामधून सप्टेंबर महिन्यात पोषण माह राबविण्यात आला. यामध्ये १ लाख अंगणवाड्यामधून विविध उपक्रम राबवून त्याच्या नोंदी घेण्याच्या सूचना आयुक्त कार्यालयाने दिल्या होत्या. या उपक्रमात अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्यासोबतच गरोदर व स्तनदा मातांसाठी मार्गदर्शन, दररोज नवीन रेसीपीच्या माध्यमातून बालकांना पोषण आहार देणे यासह इतर उपक्रमांचा समावेश होता.

हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी सहा प्रकल्पांमधील अंगणवाड्यामधून उपक्रम राबविण्यास सुरूवात केली होती. हिंगोली जिल्ह्यातील ११९७ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून तब्बल १८ लाख उपक्रमांची ऑनलाईन नोंद घेतली आहे. सर्वाज जास्त उपक्रम व नोंदी घेत हिंगोली जिल्ह्याने राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे.

जिल्हा परिषदेच्या या कामगिरीबद्दल मुंबई येथे एका विशेष कार्यक्रमात रविवारी महिला व बालविकास मंत्री आदीती तटकरे, सचिव अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे यांच्याहस्ते अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने यापूर्वीही आयुक्तालयाकडून दिलेल्या सुचनांनुसार कामे करून सरस कामगिरी केली आहे. त्यामध्ये आधार व्हेरीफिकेशन, एकसमान रंगरंगोटी, धुरमुक्त अंगणवाडी, पोषण ट्रॅकरमध्येही यापूर्वी राज्यस्तरीय पुरस्कार मिळवले आहेत.

दरम्यान, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांचे जिल्हाधिकारी अभिवन गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांनी अभिनंदन केले आहे. तर गणेश वाघ यांनी अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या सर्व महिला कर्मचाऱ्यांचे कौतूक केले आहे.

# ईसापूर, येलदरी धरणाच्या पाण्याचे केले जलपूजन

## सरपंच पूनम पाटील यांच्यासह शेतकरी उपस्थित



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १४ आक्टोबर**

तालुक्यातील गिरगांव ग्राम पंचायतच्यावतीने आणि सरपंच सौ पुनम प्रमोद नादरे यांच्या आयोजित करण्यात आलेला जलपुजन सोहळा पार पडला. महसुल प्रशासनाच्या गिरगांव मंडळ अधिकारी प्रियंकाताई खडसे यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले.

येलदरी व इसापूर धरण हे १००% भरले असुन गावांसाठी व शेती आणि शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. या गोष्टीचा आनंद व्यक्त करण्याच्या हेतुने दोन्हीं धरणाच्या पाण्याचे पूजन करण्यात आले आहे. गिरगांव शेती परिसर हा दोन्ही धरण्याच्या पट्ट्यात येतो. शेतकऱ्याचा आर्थिक कणा मजबुत ठेवण्याचे काम या धरण्याच्या पाण्याच्या माध्यमातून होणार आहे आणि गावांसाठी पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. कुठे तरी निसर्गाचे व जलाशयाचे ऋण व्यक्त करावे या विचारात हा उपक्रम शेतकऱ्यांच्या साक्षीत घेतला. मुबलक पाणी साठा असेल तर शेतकरी विवध पिकांची निवड करू शकतात. या भागांत प्रामुख्याने केळी, ऊस, हळद, आणि ईतर नगदी पिकांचे उत्पादन घेतल्या जाते, गिरगांव येथील केळी ही बाहेर देशात निर्यात केली जात असल्याने महत्व वाढले आहे.

गिरगांव शेती परिसर हा दोन्ही धरण्याच्या पाण्यामुळे सधन होत जाईल अशी ईश्वर चरणी प्रार्थना करून निसर्गाचे सरपंच सौ पुनम प्रमोद पाटील यांनी ऋण व्यक्त केले. यावेळी प्रमोद पाटील नादरे, मंडळ अधिकारी प्रियंकाताई खडसे, तलाठी वंदना मजगे, ग्राम विकास अधिकारी बाळासाहेब कदम, माजी जि प सदस्य विलासराव रायवाडे, माजी प स विलासराव पाटील, ग्राम पंचायत सदस्य बालाजी कऱ्हाळे, राजकुमार कऱ्हाळे, शेख जावेद, तुकाराम यादव गुरूजी, बाबू दवणे, शेतकरी गंगाधर आण्णा नादरे, गणपतराव नादरे, मारोती नादरे, काशिनाथ गायकवाड, बबन दाळपुसे, शिवाजी नादरे, आकाश नादरे, मुस्तुरे, शरद नादरे, पत्रकार शंकर राऊत, ज्ञानेश्वर डोके, शिवाजी भोसले, संतोष नादरे, डीगु कऱ्हाळे, बालाजी भोसले आदींची उपस्थिती होती.

# विविध मागण्यांसाठी महावितरणसमोर ठिय्या आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

वारंवार निवेदने, आंदोलने करूनही विद्युत मंडळाकडून शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा न केल्यामुळे डॉ रमेश शिंदे यांच्या नेतृत्वात दि १४ आक्टोबर रोजी महावितरण कार्यालयासमोर जनावरांसह शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले आहे.

हिंगोली आणि सेनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना दोन तासही शेतीसाठी वीज पुरवठा होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांनी आंदोलन केले परंतु महावितरण कंपनी याकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे सोमवारी ठिय्या आंदोलन करीत विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्यामध्ये शेतकऱ्यांना दिवसा १० तास वीज पुरवठा करावा, शेतीतील रोहीत्र जळाल्यास ४८ तासात रोहीत्र देण्यात यावे, नर्सी नामदेव, पांगरी, पुसेगाव, आजेगाव, आडगाव, कनेरगाव नाका, पानकनेरगाव, कवरदडी येथील ३३ के व्ही केंद्रावर वाढीव ट्रान्सफार्मर बसविण्यात यावे, शेतीपंपाच्या जीर्ण झालेल्या सप्लाय तारा बदलण्यात याव्यात, प्रत्येक गावाला मुख्य वीज वाहीनीला एबी स्वीच बसविण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी महावितरण विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलन केले. ओला दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्य तोंडाशी आलेला धास हिरावून घेतला आहे. येणाऱ्या हंगामात महावितरण कडून वीज पुरवठा होत नसल्यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. तत्काळ वीज पुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.



**हिंगोली- तालुक्यातील चिंचोली येथे विपश्यना केंद्रात नियमित शिबीर सुरू करण्यात आले आहे. या शिबीराबद्दल समितीचे अध्यक्ष सुनील देवडा यांनी पत्रकार परिषदेत माहीती दिली. यावेळी सचिव भाऊराव कांबळे, अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, आचार्य डॉ संग्राम जोंधळे आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### औंढा ते जिंतूर मार्गाचे काम रखडणार?

औंढा नागनाथ- औंढा नागनाथ तालुक्यातील जिंतूर फाटा ते जिंतूर पर्यंतच्या महामार्गाचे काम जवळपास वर्षभरापासूनच सुरू आहे. काम संथ गतीने होत असल्याने पुन्हा वर्ष लागेल असे दिसते. आर के सी कंपनीकडून केल्या जात असून जिंतूर फाटा ते धार फाट्यापर्यंत काम अर्धवट करण्यात आलेली आहे. तीन ते चार मोठे मोठे फुलांचे बांधकाम चालू असून रोडचेही बांधकाम दोन्ही बाजूने चालू केले आहे. या रस्त्यावरून प्रवास मात्र महागलां औरंगाबाद पुणे जालना जिंतूर येथे जाण्यासाठी हा एकच पर्यायी मार्ग सोयीचा व जवळचा असल्याने हिंगोली किंवा परभणी कडून औरंगाबाद जवळ करावे लागते या मार्गाचे रुंदीकरणाचे काम चालू असल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसे बंद करण्यात आले असून या रस्त्यावरून जिंतूर कडे आणि औंढा नागनाथकडे येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भरमसाठ आहे बस बंद असल्यामुळे मानव विकासच्या बस सुद्धा या रस्त्यावरून धावत नसल्याने शालेय विद्यार्थी व मुलींना आर्थिक उदंड सहन करावा लागतो. याबद्दल महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सांगितले की सदर मार्गावर प्रशिक्षण वाहने पाठवून सदर मार्गाची पाहणी केली असता सदर रोड वरून बसेस चालू करणे सध्या शक्य नाही. पाच किलोमीटर साठी दहा ते पंधरा किलोमीटरचा भुर्दंड, प्रवाशांचा वेळ व्यर्थ जात आहे हे मात्र निश्चित.

### हिंगोली ते लिंबाळा प्रवा बससेवेसाठी रास्ता रोको



हिंगोली- हिंगोली ते लिंबाळा प्रवा या गावातील अंतर सुमारे ४० किमी आहे. लिंबाळा, भिंगी, आडगाव, आंबाळा, वडद, चिंचाळा या ग्रामीण भागातून दररोज अनेकजण शासकीय कामासह इतर कामांसाठी येतात परंतु परत जाण्यासाठी महामंडळाची बस उपलब्ध नाही. तसेच वाहनाची व्यवस्था नाही त्यामुळे नागरिकांची हेळसांड होत आहे.

**कागदपत्रे हरवले आहे**

मी सुनील ओमप्रकाश देवडा रा हिंगोली माझे Malata Galvanising Pvt Ltd चे Allotment Ordet, Possession Recipt, Agreement to Lease, हे कागदपत्रे हिंगोली ते संभाजीनगर दि ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजता प्रवास करत असताना हिंगोली बसस्थानक परिसरामध्ये गहाळ झाले आहेत तरी ज्या कुणाला मिळाले असतील त्यांनी खालील पत्यावर पाठवावी देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

संपर्क (पत्ता)
सुनील ओमप्रकाश देवडा, न्यू मोंढा हिंगोली ४३१५१३

# लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

शहरात कामाच्या निमित्ताने आलेल्या उत्तर प्रदेशातील एका तरूणीवर अत्याचार करणाऱ्या तरूणाविरूध्द हिंगोली शहर पोलिस ठाण्यात दि १४ सोमवारी गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने पथक रवाना करून तरूणाला कळमनुरी शिवारातून ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार उत्तर प्रदेशातील एक तरूणी तिच्या आई वडीलांसोबत हिंगोली येथे कामाच्या निमित्ताने आली होती. तिच्या वडीलांनी हिंगोलीत लहान व्यवसाय सुरू केला होता. त्याच बाजुला वैजनाथ श्रृंगारे रा रेणापूर ता कळमनुरी यानेही व्यवसाय सुरू केला होता. यावेळी त्याचे कामानिमित्त आलेल्या कुटुंबातील तरूणी सोबत ओळख झाली. या ओळखीचे प्रेमात रूपांतर झाले.

यावेळी वैजनाथ याने तरूणीला लग्नाचे आमिष दाखविले. त्यानंतर तिच्यावर मागील सात वर्षापासून वेळोवेळी अत्याचार केला. वैजनाथ याने त्या तरूणीला पुणे येथेही नेल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. मात्र मागील काही दिवसांपासून तरूणीने लग्नाचा तगादा लावला असता वैजनाथ याने लग्नास नकार देऊन तरूणीला शिवीगाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तरूणीने हिंगोली शहर पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी वैजनाथ याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, सहायक पोलिस निरीक्षक संग्राम पेरगेवार, जमादार अशोक धामणे, राहुल जोगे, संतोष करे, धनंजय क्षीरसागर, संजय मार्के यांच्या पथकाने पहाटेच कळमनुरी शिवारात धाव घेऊन वैजनाथ यास ताब्यात घेतले आहे. सहायक पोलिस निरीक्षक पेरगेवार, जमादार जोगे पुढील तपास करीत आहेत.

# श्रीराम-भरत भेटनिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

येथील दसरा महोत्सवात रामलीला कार्यक्रमात दसरा कार्यालयात श्रीराम-भरत भेटीचा भावूक प्रसंग प्रस्तूत करण्यात आला. त्यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये प्रभूरामचंद, सीता, लक्ष्मण, हनुमान, जामवंत रथावर आरूढ झाले होते.

या मिरवणुकीत हत्ती, घोडे यांच्यासह वाद्यवृंद, भजनी मंडळ, ऋषी वसिष्ठ, भरत, शत्रुघ्न यांचाही समावेश होता. यावेळी जय श्रीरामच्या गजराने शहर दुमदुमून गेले. मिरवणुकीच्या स्वागतासाठी रस्त्यावर नागरिकांनी रांगोळ्या काढल्या होत्या, पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच बनवारीलाल चौधरी यांच्याकडून मिरवणुकीत सहभागी लोकांना अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर दसरा कार्यालयात रामराज्यभिषेकाचा सोहळा पार पडला. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मधुकर खंडागळे, दौलत बनसोडे, चंदू लव्हाळे, गणेश साहू, पंडीत राजकुमार पांडे, साहेबराव बांगर, नागेश धनमने, विश्वास नायक, कैलाश श्रीनाथ, राजेंद्र हलवाई, गणेश बांगर, विजय परतानी, प्रल्हाद बासटवार आदींची उपस्थिती होती.

# विज्ञानाच्या दिशेने जातांना निसर्गाचाही समतोल राखा- गायत्री बिरादार



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १४ आक्टोबर**

येथील हुतात्मा बहिर्जी स्मारक विद्यालय येथे निसर्ग संपदा हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पर्यावरणाच्या अभ्यासाक गायत्री अमोल बिरादार यांनी विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांच्याशी संवाद साधत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना वर्षभर सर्व विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी पाच वृक्ष संगोपन करून घेणार तसेच त्यांच्या परिसरात आढळणाऱ्या वनस्पती, प्राणी वेगवेगळे पक्षी यांच्या वेळोवेळी नोंदी घेणार अशी नोंदवही विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाणार आहे अशी माहिती सौ गायत्री बिरादार यांनी दिली. तसेच सध्याच्या विज्ञान युगात वावरताना निसर्गाचे संवर्धन व संरक्षण कसे करावे निसर्गातील हवा, पाणी, माती, वृक्ष यांचे मानवी जीवनात असणारे महत्त्वाचे स्थान तसेच विज्ञान विषयाचे दैनंदिन जीवनात महत्त्व विज्ञान विषय शिकताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या कशा सोडवाव्यात सखोल मार्गदर्शन गायत्री बिरादार यांनी केले. तसेच बहिर्जी स्मारक विद्यालय ही शाळा माझी शाळा योजनेमध्ये विभागातून प्रथम आली आहे. त्यावेळी विद्यार्थी व शिक्षक वृंद मुख्याध्यापक व सर्व विद्यालय परिवार यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती होती.

# महिलेच्या पोटात लाथ मारून गर्भपाताचे दिले औषध

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ आक्टोबर**

वसमत तालुक्यातील डोणवाडा येथील गर्भवती महिलेच्या पोटात लाथ मारल्यानंतर गर्भपाताचे खाजगी औषध देऊन गर्भपात करणाऱ्या पतीविरूध्द वसमत शहर पोलिस ठाण्यात रविवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार वसमत तालुक्यातील डोणवाडा येथील यशोदाबाई यांचा विवाह एक वर्षापूर्वी निलंगा जि लातूर येथील शंकर हिरास याच्यासोबत झाला. लग्नानंतर काही दिवस चांगले वागविल्यानंतर शंकर याने त्यांना त्रास देण्यास सुरूवात केली. त्यानंतर यशोदाबाई या दोन महिन्याच्या गर्भवती झाल्या होत्या. त्यानंतर त्यांना आणखीनच त्रास देण्यास सुरूवात केली. दरम्यान, गर्भपात करण्यासाठी त्यांना त्रास दिला जाऊ लागला होता. मात्र त्यांनी गर्भपात करण्यात नकार दिल्यानंतर शंकर याने ता १० आक्टोबर रोजी त्यांना मारहाण केली. तसेच पोटात लाथाही मारल्या. त्यानंतर त्यांना दुधात खाजगी औषध देऊन त्यांचा गर्भपात केला. या औषधामुळे तसेच मारहाणीमुळे त्यांची प्रकृती अत्यावस्थ झाली. त्यानंतर त्यांना डोणवाडा येथे आणून सोडले. त्यांच्या माहेरच्या मंडळींनी त्यांना उपचारासाठी वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी यशोदाबाई हिरास यांनी दिलेल्या तक्रारीवरून वसमत शहर पोलिस ठाण्यात शंकर हिरास याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटना निलंगा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्यामुळे वसमत पोलिसांनी सदर गुन्हा निलंगा पोलिसांकडे वर्ग केला आहे.

# ज्योतीनगर येथील विठ्ठल मंदिरात लक्ष्मी व्यंकटेश पद्मावती विवाह सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर : श्री विठ्ठल मंदिर संस्थान ज्योतीनगर व मध्व जयराय मोदात्म सेवा संघ संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री लक्ष्मी व्यंकटेश पद्मावती विवाह सोहळा कल्याण उत्सवाचे आयोजन गुरुवार दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ शनिवार ते दिनांक १२ ऑक्टोबर पर्यंत करण्यात आलेले होते या सोहळ्यानिमित्त दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता समर्थनगर येथील श्री वरद गणेश मंदिर सभागृहात श्री व सौ अंजली रमेश कुलकर्णी व परिवाराच्या हस्ते साखरपुडा झाला शुक्रवार ऑक्टोबर पासून शहराच्या भागात श्री बालाजी भक्तांच्या निवासस्थानी भगवंतांच्या पाद्य पूजेचा, अभिषेक सेवाविधी संपन्न झाले आहेत सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी पडेगाव अप्पावाडी पू माई महाराज संस्थानच्या श्री तुळजाभवानी मंदिरात दोन वाजता भगवंतांच्या कार्यक्रम संपन्न झाला. दिनांक ११ ऑक्टोबर सेवन सिडको, अस्मिता येथे श्री व सौ किरणताई सुर्वे व परिवाराच्या हस्ते निवासस्थानी भगवंतांच्या पूजनाच्या कार्यक्रम संपन्न शनिवार दिनांक

त्यांच्या संपन्न दिनांक ४ विविध हळदीचा इत्यादी येथे प वतीने दुपारी हळदीचा शुक्रवार रोजी एन पार्क हेमंत त्यांच्या सिमन्त झाला १२ ऑक्टोबर विजयादशमीच्या दिवशी सायंकाळी पाच वाजता ज्योतीनगर येथील श्रीमती मोहिनी जहागीरदार यांच्या निवासस्थानापासून पालखी मिरवणूक काढण्यात आली, श्री ज्योतीमंदिरात विश्वस्तांच्या वतीने पालखी पूजन व भगवंतांची आरती करण्यात आली तेथून पालखी ज्योतीनगर परिसरात फिरून सायंकाळी ८ वाजता श्री विठ्ठल मंदिर सभागृहात पोहचली प पु विजय कुमार पल्लोड महाराजांचे श्री कल्याण उत्सव माहात्म्य विषयावर प्रवचन झाले त्यानंतर यजमान श्री व सौ श्रीकांतजी मणियार रुपाली मणियार, प्रदीपजी राठी हेमा राठी, मनीषजी सिकची, संगीता सिकची यांच्या हस्ते भगवंतांचा विवाह सोहळा विधीवत संपन्न झाला प्रसाद वाटपाने या सोहळ्याची सांगता झाली.

या दहा दिवसांच्या संपूर्ण सोहळ्याचे पौरोहित्य वेदशास्त्र संपन्न लक्ष्मीकांत उर्फ कांता गुरुजी, सुनील अत्रे गुरुजी, प्रमोद जोशी गुरुजी, कैलास जोशी गुरुजी, , सुहास जोशी गुरुजी उर्फ बाळू मामा व त्यांचे सहकारी ब्रह्मवृंद यांनी केले असून संपूर्ण सोहळ्याचे नियोजन शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक गिरजाराम हाळनोर माजी नगरसेविका सुमित्राताई हाळनोर बापू जहागीरदार प्रसन्ना कुलकर्णी रोहित व राहुल हाळनोर, श्री मोकाशी व श्री मध्व जयराय मोदात्म सेवा संघाचे पदाधिकारी श्री विठ्ठल मंदिर महिला भजनी मंडळ, हरिपाठ मंडळ, शिवसेना महिला आघाडी यांनी केले.

# स्त्रीच्या बुद्धी, गुणवत्ता, अंतर्गत गुणांना महत्व द्या : योगिता साळवी

पुणे - 'मुलगी सुरक्षित राहायची असेल तर तिला कायद्याचे ज्ञान द्या,मानसिक शारीरिक दृष्ट्या सुदृढ बनवा. सर्व स्त्रिया शक्तीदायिनीच आहेत.'असे उद्गार दै. तरुण भारत च्या उपसंपादिका योगिता साळवी यांनी मातृशक्ती, पुणे आयोजित महाभोंडल्या च्या वेळी काढले.

मातृशक्ती, पुणे यांनी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या मैदानावर महा भोंडल्याचे आयोजन केले होते. नवरात्र महोत्सवात मातृशक्ती, पुणे यांजकडून पुण्यातील विविध सेवा वस्त्या, सोसायट्या, शाळा येथे भोंडल्याचे आयोजन केले होते. त्याची सांगता आजच्या महा भोंडल्यानं झाली. या प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुण्या श्रीमती गिरीजा ओक म्हणाल्या,' रिकामा सरफेस दिसला की त्यावर लगेच वस्तू जमा होतात.तसं बायकांचा रिकामा वेळ,हात असेल तर घरातील कामे त्या करत राहतात. स्त्रीने रिकामा वेळ उरला तर तो स्वतः साठी वापरला पाहिजे.'

स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृती,स्वधर्म आणि स्वत्व जपत प्रत्येक क्षेत्रात आजची स्त्री कार्यरत आहे. गरज आहे ती एकत्रित येणे, संघटित होऊन कृती करण्याची त्यासाठी आजच्या भोंडल्याचे आयोजन आहे असे प्रतिपादन सुजाता सातव यांनी त्यांच्या प्रास्ताविकात केले. योगिनी टिळक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर रुपाली केंढे यांनी आभार प्रदर्शित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले. त्यांनतर जमलेल्या महिलांनी फेर धरून भोंडल्याची गाणी म्हंटली. पुणे महानगराच्या विविध भागातून ८०० महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

# विद्या प्रसारिणी सभेचे हायस्कुलने जिल्हास्तरावर पटकाविला तृतीय क्रमांक

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान. तिन लाख रूपयाचे बक्षिस

पूर्णा,प्रतिनिधी/

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियान टप्पा दोन अंतर्गत व खाजगी व्यवस्थापन गटात जिल्हास्तरावर पूर्णा येथील विद्या प्रसारिणी सभेचे हायस्कूलने तृतीय कमांक पटकाविला आहे. सलग दूसऱ्या वर्षी या शाळेला तीन लाख रूपयाचे बक्षिस मिळाले आहे.

राज्य शासनाने मागील वर्षापासून हे अभियान सूरू केले असून यंदा ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात आले. पायाभूत सुविधा, शासनाच्या ध्येय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी व शैक्षणिक संपादणूक या मुख्य मुदयासह शाळा, शिक्षक, विद्यार्थी विकास विषयक विविध बाबी, समाज घटकांचे शालेय विकासात घेतलेले सहकार्य आदींचे मुल्यांकन करण्यात आले. केंद्र व तालूकास्तर मुल्यांकनात अव्वल स्थान प्राप्त केल्यानंतर ही शाळा शाळा जिल्हास्तरीय मूल्यांकनास प्रात्र ठरली होती. त्यात या शाळेला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. मागील वर्षी या शाळेने तालुका स्तरावर प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळविले होते. अशी माहिती मुख्याध्यापक देविदास उमाटे यांनी दिली. सांघीक प्रयत्न, शालेय व्यवस्थापन व प्रशासकीय यंत्रणेच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगीतले.

या यशाबददल शिक्षणाधिकारी माध्यमिक, आशा गरूड, शिक्षणाधिकारी प्राथमिक सुनील पोलास, उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे,येरमाळ, गटशिक्षणाधिकारी बालाजी कापसीकर, संस्थाध्यक्ष डॉ. दत्तात्रय वाघमारे, उपाध्यक्ष भिमराव कदम, श्रीनीवास काबरा, विजयकुमार रूद्रवार, उत्तमराव कदम, साहेबराव कदम, के.एल. काकडे,बी.बी.मोरे, सौ. विद्या पवार, डॉ. प्रेमचंद सोनी, ज्ञानदेव रणमाळ, डॉ. हरीभाऊ पाटील, सर्व संचालक मंडळ, पालकसंघ, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

# दारूची चोरटी विक्री करणाऱ्यास पकडले

छत्रपती संभाजीनगर : अवैधरित्या दारुची विक्री करणारा अजय बबन काळे (२६, रा. नवनाथनगर) याला पोलिसांनी पकडले असुन त्याच्या ताब्यातून १७५० रुपये किंमतीची दारु हस्तगत करण्यात आली आहे. ही कारवाई १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्यासुमारास गारखेडा परिसरात करण्यात आली. प्रकरणात पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अपघातात जखमी व्यक्तीचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर : अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दिगंबर ज्ञानोबा तखवारे (वय ४२, रा. नायगाव ) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. दिगंबर तखवारे हे १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी धुळे सोलापूर मार्गावरील जामखेड जवळ अपघातात गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करून घाटीत दाखल करण्यात आले होते.

# तालुक्यात मुसळधार पाऊस ! अंबाडी मध्यम प्रकल्पात आवक वाढली






कन्नड- सोलापूर-धुळे महामार्गा लगत अंधानेर फाटा येथे इंद्रधनुष्याचे मनमोहक चित्र ( छाया- सहयोग प्र.जावळे)

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ ऑक्टोबर - तालुक्यात रविवार रोजी रात्री झालेल्या पावसाने अंबाडी मध्यम प्रकल्पात पाण्याची आवक वाढली आहे तर काढणीला आलेल्या पिकांचे मात्र नुकसान झाले आहे

रविवार रोजी तालुक्यात ३७६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे, कन्नड मंडळ,चिंचोली मंडळ, नागद मंडळात काढणीला आलेल्या पिकांचे मात्र नुकसान झाले आहे तर रब्बीच्या पिकांना मात्र परतीच्या पावसाचा फायदा झाला आहे,रविवारी रात्री कन्नड मंडळात मुसळधार पाऊस झाल्याने अंबाडी मध्यम प्रकल्पात ५९.६६ टक्के इतकी वाढ झाली आहे सोमवार रोजी सुद्धा पाण्याची आवक सुरू होती

काढणीला आलेल्या मक्का,सोयाबीन या पिकांना पावसाचा फटका बसला तर कापसाला या पावासाचा फायदा झाला आहे,तालुक्यातील काही मंडळात शेतकरी सुखावला तर काही मंडळात मात्र नुकसान झाले आहे,सोमवार रोजी सुद्धा काही मंडळात पावसाने हजेरी लावली होती.

# पत्नीपीडित आश्रमात शूर्पणखावृत्तीचे दहन

वाळूज महानगर: विजयादशमी सणाचे औचित्य साधून शनिवार करोडी येथील आश्रमात पत्नी पीडितांनी अभंग व गाणी गात अनोख्या पद्धतीने शूर्पणखावृत्तीचे दहन करत पतीला सतत छळणाऱ्या भांडखोर पत्नीचा निषेध व्यक्त करण्यात आला. सोलापूर-धुळे महामार्गावरील करोडी येथे ॲड. भारत फुलारे यांनी पत्नी पीडितांसाठी आश्रम सुरु केला आहे. दरवर्षी पत्नीपीडितांकडून वट पौर्णिमेला उलटया प्रदक्षिणा मारुन व विजयादशमीला शूर्पणखावृत्तीचे दहन करुन विविध कारणावरून पतींचा छळ करुन त्यांना जगणे



असहाय करणाऱ्या पत्नीचा निषेध करण्यात येतो.

यंदाच्या विजयादशमीच्या मुहूर्तावर पत्नीपीडितांनी आश्रमातील कावळा, शूर्पणखा व नारदमुनी यांच्या प्रतिमेचे मनोभावे पुजन करत अभंग व विविध गाणी गात भांडखोर पत्नीचा निषेध करत शूर्पणखावृत्तीचे आगळ्या-वेगळ्या पद्धतीने दहन केले.

यावेळी ॲड. भारत फुलारे, ॲड. मुकेश प्रसाद, जगदीश शिंदे, विशाल नांदेडकर, भाऊसाहेब साळुंके, प्रमोद ठोकळ, विजय फाळके, सोमनाथ मनाळ, सुरेश फुलारे, रामेश्वर नवले, एकनाथ राठोड, चरणिसंग घुसिंगे, गौतम जोगदंड, विक्रम कापसे, सुभाष काळे, डॉ. निलेश साळे, अमोल हातकंगणे, संजय भांड, मदन पापडकर, वैभव घोळवे, डॉ. रविंद्र देवकर, प्रविण कांबळे आदी पत्नीपीडितांनी शूर्पणखावृत्तीचे दहन करत पतीला छळणाऱ्या पत्नीला सुबुध्दी देवो, अशी देवाकडे प्रार्थना केली.

# बजाजनगर घेणार मोकळा श्वास; अतिक्रमणावर हातोडा

वाळूज महानगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौकादरम्यान असणाऱ्या एका धार्मिक स्थळासमोरील अतिक्रमणे काढण्याबाबत वारंवार अर्ज, उपोषण, आंदोलन केले जात असल्याने अखेर एमआयडीसी प्रशासनाच्या वतीने रहदारीला अडथळा ठरणारे अतिक्रमण जेसीबीच्या मदतीने काढण्यास सुरुवात केली. शिवाय लवकरच पोलिस बंदोबस्तामध्ये उर्वरित अतिक्रमणे काढली जाणार आहेत.

औद्योगिक व रहिवासी परिसरातील वाढत्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, रहदारीला अडथळा, अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. एमआयडीसी प्रशासनाचे अतिक्रमणांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत अतिक्रमणे काढण्याकरिता



अनेक वर्षांपासून परिसरातील माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करीत होते. अतिक्रमणे काढण्यासाठी एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण केले होते. वारंवार येणाऱ्या तक्रारींची एमआयडीसी प्रशासनाने दखल घेऊन शुक्रवारी सायंकाळी मुख्य मार्गाच्या मध्यापासून दोन्ही बाजूंनी मोजणी करून मार्किंग करून रहदारीला अडथळा ठरणारी अतिक्रमण हटविण्यात आली. शिवाय लवकरच पोलिस बंदोबस्तामध्ये औद्योगिक व रहिवासी परिसरातील अतिक्रमणे मोठ्या हटवली जाणार असल्याचे एमआयडीसीचे गणेश मुळीकर यांनी सांगितले. ही कारवाई प्रशांत सरोदे सुरक्षारक्षक भारत साळे, गौतम मोरे, किसन देहाडे यांनी पार पाडली.

# यांत्रिकी विभागामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या ४० अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव

छत्रपती संभाजीनगर : महानगर पालिका प्रशासनामध्ये शहराचा गाडा संभाळण्यामध्ये यांत्रिकी विभागाचे महत्वाचे योगदान आहे. - मनपा आयुक्तांच्या गाडीपासून ते कचरा जमा करणाऱ्या गाडी पर्यंत सर्वच वाहनांची देखरेख करण्याचे काम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. मागील दोन वर्षात वाहनांच्या बाबतीत महानगर - पालिका अत्यंत सक्षम झाली असून आवश्यक असलेली सर्वच - वाहने मनपाच्या ताफ्यात आहेत. - या सर्व वाहनांची योग्य रीतीने मॅनेजमेंट यांत्रिकी विभागातील अधिकारी कर्मचाऱ्याकडून करण्यात आली असून अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या तब्बल चाळीस अधिकारी कर्मचाऱ्यांचा मनपातर्फे विजयादशमीच्या दिवशी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, शहर अभियंता ए बी देशमुख, यांत्रिकी विभागप्रमुख अमोल कुलकर्णी, उप अभियंता सचिन वाईकर आदींची उपस्थिती होती. या पुरस्कारांमध्ये प्रामुख्याने नालेसफाई मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा, गणेशोत्सव दरम्यान मूर्ती कलेक्शन आणि दान करण्यासह उत्कृष्ट काम करणाऱ्या ६ पथकांचा गौरव करण्यात आला.

तसेच खाम नदीला पुरस्कार मिळण्यात वाटा असलेला २ कॉकलेन चालकाचा गौरव करण्यात आला. तसेच नवीन वाहने खरेदी करणारे इंजिनिअर, आरटीओ व वाहनासंबंधित काम करणारे इंजिनिअर, प्रगती पेट्रोल पंप व नवीन सुरु झालेल्या पंप वर उत्कृष्ट काम करणारे मॅनेजर आदी ४० अधिकारी कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आले

# सिट्रोएन बेसाल्ट ने भारत एनसीएपी सुरक्षा चाचणीत ४ स्टार रेटिंग मिळवले

छत्रपती संभाजीनगर, १४ ऑक्टोबर : सिट्रोएन इंडिया ने जाहीर केले आहे की भारतातील त्यांची पहिली मुख्य प्रवाहातील आयसीई एसयूव्ही कूप, सर्व-नवीन बेसाल्ट, ने भारत न्यू कार असेसमेंट प्रोग्राम (भारत-एनसीएपी) मध्ये ४ स्टार रेटिंग प्राप्त केले आहे. सिट्रोएन बेसाल्ट ही उत्कृष्ट सुरक्षा वैशिष्ट्ये आणि ठळक, कमांडिंग स्टेन्स, प्रशस्त जागा आणि एक उत्तम ड्रायव्हिंग अनुभव देणारी वायुगतिशास्त्रीय सिल्हूट यासह उत्कृष्ट अष्टपैलू एसयूव्ही बनली आहे. हे रेटिंग सिट्रोएन बेसाल्ट च्या मजबूत सुरक्षा मानकांचे प्रमाणीकरण करते आणि त्याच्या सर्व प्रकारांमध्ये उच्च सुरक्षा वैशिष्ट्ये प्रदान करण्यासाठी सिट्रोएन ची वचनबद्धता देखील प्रदर्शित करते.

सिट्रोएन बेसाल्ट एक मजबूत आणि बुद्धिमान शरीर रचना डिझाइनसह अंतिम टक्कर संरक्षण देते. बेसाल्ट लाँच झाल्यापासून, कार प्रेमी आणि प्रथमच कार खरेदी करणारे याकडे आकर्षित होत आहेत आणि यामुळे बाजारपेठेत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

शिशिर मिश्रा, ब्रँड डायरेक्टर, सिट्रोएन इंडिया म्हणाले, सिट्रोएन बेसाल्ट ला भारत एनसीएपी द्वारे ४ स्टार रेटिंग प्रदान केल्याबद्दल आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. आमच्या डिझाईन्समध्ये सुरक्षेला अग्रस्थानी ठेवण्याची आमची बांधिलकी हे प्रतिबिंबित करते. आमचे ग्राहक आता बेसाल्ट च्या मजबूत सुरक्षा वैशिष्ट्यांसह आत्मविश्वासाने आणि सुरक्षिततेने वाहन चालवण्याचा आनंद घेऊ शकतात. भारतातील कार खरेदीदारांमध्ये सुरक्षिततेबद्दल संभाषण वाढत आहे, ज्यात आघाडीवर असल्याचा आम्हाला अभिमान वाटतो आणि आमच्या ग्राहकांची सुरक्षितता सर्वोपरि आहे. आम्हाला आशा आहे की या रेटिंगमुळे बेसाल्ट ची प्रतिष्ठा वाढेल आणि ती बाजारपेठेतील पसंतीची एसयूव्ही म्हणून स्थापित होईल. कठोर चाचणी प्रक्रियेमध्ये बेसाल्ट च्या अनेक कठोर क्रॅश चाचण्यांचा समावेश होता, ज्यामुळे त्याच्या प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांचे प्रदर्शन होते. प्रत्येक प्रकारात ४० हून अधिक सक्रिय आणि निष्क्रिय सुरक्षा वैशिष्ट्यांसह, बेसाल्ट हाय स्ट्रेंथ स्टील, प्रगत हाय स्ट्रेंथ स्टील (एएचएसएस) आणि अल्ट्रा हाय स्ट्रेंथ स्टील (यूएचएसएस) सह मजबूत फ्रंटल आणि साइड टक्कर संरक्षण देते, यासह केबिन आत जास्त दाबत नाही.

याव्यतिरिक्त, सर्व प्रकारांमध्ये सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्थिरता कार्यक्रम (ईएसपी), हिल होल्ड कंट्रोल, सीट बेल्ट रिमाइंडरसह सर्व सीटसाठी ३-पॉइंट सीट बेल्ट आणि आय एसओएफआय एक्स चाइल्ड सीट अँकर यासारख्या प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहेत. त्यामुळे ग्राहकांना आत्मविश्वासाने सुरक्षित ड्रायव्हिंगचा आनंद घेता येईल. ही वैशिष्ट्ये प्रत्येक प्रवासात उच्च सुरक्षा वैशिष्ट्ये प्रदान करण्यासाठी सिट्रोएन ची वचनबद्धता दर्शवतात.

सिट्रोएन बेसाल्ट भारतीय ऑटोमोटिव्ह मार्केटमध्ये सुरक्षा मानके परिभाषित करत आहे. हे ४ स्टार रेटिंग त्याच्या उत्कृष्ट अभियांत्रिकीची साक्ष देते. सिट्रोएन इंडिया तिच्या प्रत्येक वाहनात सर्वात आनंददायक आणि सुरक्षित ड्रायव्हिंग अनुभव देण्यासाठी नावीन्यपूर्ण आणि दर्जे दार ध्येयाचा पाठपुरावा करत आहे.

# मांस विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : शहरात बेकायदेशीरपणे मांस विक्री करणाऱ्यांवर मनपाने कारवाईचा बडगा उगारला असून, सेन्ट्रल नाका बायजीपुरा भागात उघड्यावर बेकायदेशीर मांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई करण्यासाठी गेलेल्या मनपा कर्मचाऱ्यांच्या अंगावर दुकानदाराने धावून जात धक्काबुक्की व शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मनपाचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शाहेद शेख यांनी दिली.

महानगरपालिकेच्या अनधिकृत कत्तल विरोधी पथकामार्फत शहरात उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या विरूध्द कार्यवाही करण्यासाठी पथक प्रमुख लक्ष्मण संतोष फुले, वाहनचालक दिपक साळवे, रमेश शिरसाट, रामकुमार जैस्वाल, स्व.नि. सय्यद मो. तल्हा, सुरक्षा रक्षक बाळनाथ तुपे, मजुर अब्दुल वाहेद शेख वजीर, फेरोज खान शौकत खान असे सेन्ट्रल नाका बायजीपुरा भागात गस्त घालत असतांना मेन रोडवर आसेफ अब्दुल मजीद, आरेफ अब्दुल मजीद चिकन शॉप नामे. माशाअल्लाह नाज चिकन शॉप सर्व रा. गल्ली नं.२५ बायजीपुरा यांनी चिकन शॉप समोर रोडवर चिकन मांस विक्री करण्याकरीता टेबल लावण्यात होता. पथकातील कर्मचारी टेबल उचलण्यासाठी गेले असता वरील आरोपींनी मनपा कर्मचारी फेरोज खान शौकत खान यांच्या अंगावर धावून धक्काबुक्की व शिवीगाळ करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणून फेरोज खान शौकत खान पशुधन मजुर यांच्या फिर्यादीने जिन्सी पोलीस स्टेशन येथे विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अशी माहिती प्र. पशू वैद्यकीय अधिकारी यांनी दिली आहे

# जगप्रसिद्ध पितळखोरा लेणी येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन संपन्न



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि. १४ ऑक्टोबर - धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच निमित्ताने व अशोका विजयादशमी च्या निमित्ताने भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांचे संयुक्त विद्यामाने पितळखोरा येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन संपन्न झाला.

भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय समितीच्या आदेशाने लेणी संवर्धन व संगोपन या आशियाखाली संपूर्ण राज्यात बैठकीचे आयोजन केले होते. त्या अनुषंगाने कन्नड तालुका च्या वतीने पितळखोरा लेणी येथे कार्यकारणीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्याचे संघटक राजेंद्र पगारे यांनी मार्गदर्शन केले. अशोक सम्राट यांनी लेणींचे उत्खनन व निर्माण केले आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी केलेले हे काम आजही अद्वितीय असल्याचे लेणीतून बघावयास मिळते.

पितळखोरा ही लेणी आशिया खंडातील सर्वात पहिली लेणी आहे. त्या लेणीकडे पुरातत्त्व विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. विनोद अंभोरे, डॉक्टर नितीन सरवदे, अनिल शिरसाट, गणेश मोरे, कडूबा पवार यांनी मार्गदर्शन पर भाषणे केली या कार्यक्रमासाठी शंकर काबंळे, रमेश धनेधर,प्रविण गायकवाड, सतीश धनेधर, अमोल साळवे, अभिजीत सिरसाट, अश्वजीत सिरसाट, प्रतिभा पगारे, कांचन धनेधर, शैलेजा कांबळे, अजय सिरसाट, सम्यक सिरसाट, विलास साबळे , सह धम्म बांधव मोठया संख्येने उपस्थित होते प्रस्ताविक सी. बी.पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन गौतम जाधव यांनी मानले.

# साजापुर जि प मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम रंगले

वाळूज महानगर :- ( प्रतिनिधी ) प्रसिध्द साहित्यिक तथा सहशिक्षक अय्युब पठाण लोहगावकर यांनी साजापूर येथील जि.प. उच्च प्राथमिक शाळेत मुले रंगली काव्यात हा धमाल विनोदी एकपात्री आणि संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

अय्युब पठाण यांनी मधुर आवाजात देशभक्तीपर गीते, भारूड, पोवाडे, पाळणे, शालेय गीते,बोधात्मक विनोदी नकला सादर केल्या. तर बिडकीन येथील शालीमन शिंदे यांनी अय्युब पठाण यांना ढोलकीवर उत्कृष्ट साथ देऊन कार्यक्रमात रंगत आणली. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक धनंजय नागमवाड हे होते तर प्रमुख पाहुणे



म्हणून प्रख्यात साहित्यिका तथा उपक्रमशिल शिक्षिका अलकनंदा घुगे- आंधळे या होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यास शिक्षक- अनिल जाधव, भास्कर गोपाल, देविदास काळे तसेच शिक्षिका- ज्योती ढोमणे, अश्विनी मोरे, प्रिती गंगवाल, सोनाली रेसवाल यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# पूर्वेश सरनाईक यांनी साधला युवासंवाद !

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.१४ ऑक्टोबर - तालुक्यात युवा सेनेचे संघटन मजबूत करण्यासाठी युवसेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी रविवार रोजी संवाद साधला आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा सेनेची ताकत वाढवण्यासाठी युवा संवाद दौरा आयोजित करण्यात आला होता त्या अनुषंगाने तालुक्यातील युवासंवाद अभियानांतर्गत संवाद साधत मार्गदर्शन केले यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत,तालुका प्रमुख केतन काजे,युवासेना सचिव आनंद साळी, युवासेना सचिव निलेश शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख भरत कदम, युवासेना उपजिल्हाप्रमुख अक्षय शिरसाठ तालुकाप्रमुख रवींद्र जाधव युवा सेना शहर प्रमुख यश गायकवाड शिवसेना शहर प्रमुख योगेश देशमुख, विकासजी नांगुर्ड, आकाश झिमन यांच्यासह युवसेना पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# अनोळखी पदार्थाने मृत्यू

छत्रपती संभाजीनगर,: अनोळखी पदार्थाचे सेवन केल्याने तरुणाचा घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. रवी काशिनाथ गायकवाड (व्य २७, रा. जवळखी, ता. नांदगाव, जि. नाशिक) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. रवी गायकवाड यानी १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे सात वाजेच्या सुमारास घरी अनोळखी पदार्थाचे सेवन केले होते. ही बाब कुटुंबियांच्या लक्षात आल्याने त्यानी खीला घाटी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचार सुरु असताना रात्री पावणे अकरा वाजेच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.